ऑगस्ट, २०२६

# आपलं मंत्रालय

एक सुसंवाद



*अतिथी संपादक*
**सुरेश काकाणी**
सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य

# मतदार याद्यांचे
# विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) २०२६

## प्रारूप मतदार यादीच्या प्रकाशनानंतरचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| दावे आणि हरकतींचा कालावधी | : | ३१ ऑगस्ट २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ |
| नोटीस तसेच दावे आणि हरकती निकाली काढण्याचा कालावधी | : | ३१ ऑगस्ट २०२६ ते २९ ऑक्टोबर २०२६ |
| अंतिम मतदार यादीचे प्रकाशन | : | ०४ नोव्हेंबर २०२६ |

नमुना क्र. ६ (घोषणापत्रासह)

### मतदार नोंदणीसाठी

**१ ऑक्टोबर २०२६** या अर्हता दिनांकास १८ वर्षे पूर्ण झालेले नवमतदार तसेच प्रारुप मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट नसलेल्या पात्र व्यक्ती

नमुना क्र. ८

### मतदार यादीतील तपशीलातील दुरूस्त्या तसेच दिव्यांगत्वाची नोंद करण्यासाठी

- मतदार यादीमधील आपल्या तपशीलात दुरूस्ती / दिव्यांग नोंद यासाठी **नमुना क्र. ८**
- इतर राज्यांतून स्थलांतरीत मतदारांसाठी **नमुना क्र. ८ (घोषणापत्रसह)**

नमुना क्र. ७

### मतदार यादीतील नाव वगळण्यासाठी

मृत किंवा इतर कारणांसाठी

नमुना अर्जातील माहिती तसेच आक्षेप चुकीचे असल्याचे आढळल्यास, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम ३१ नुसार १ **वर्षापर्यंत शिक्षा किंवा दंड किंवा दोन्ही होऊ शकतात.**

**ऑनलाईन अर्जासाठी**

voters.eci.gov.in

ECINET मोबाईल

**ऑफलाईन अर्जासाठी**

आपल्या मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाला भेट द्या.

अधिक माहितीसाठी १८०० २२ १९५० या मदत क्रमांकावर संपर्क साधा.

**मतदार हाच लोकशाहीचा शिलेदार**

Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO Maharashtra | CEO_Maharashtra

# अंतरंग

## ६ विशेष सखोल पुनरीक्षण – (SIR) २०२६

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या कलम २१ मधील तरतुदीनुसार सध्या देशभरात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यापूर्वी सन २००२ ते २००४ या कालावधीत देशात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण करण्यात आले होते. त्यानंतर वाढते शहरीकरण, नागरिकांचे स्थलांतर, मतदारांचा मृत्यू, दुबार नावे तसेच इतर कारणांमुळे मतदार याद्या अधिक अचूक, अद्ययावत व दोषविरहित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

## १४ शेगाव दर्शन ते ज्ञानगंगा सफर

शेगाव परिसरातील पर्यटनस्थळांचा शोध घेत असताना ज्ञानगंगा वन्यजीव अभयारण्य लक्ष वेधून घेणारे ठरले. शेगावपासून साधारण ६० किलोमीटरच्या परिसरात असलेल्या या अभयारण्याची माहिती घेतली. येथे वन्यजीव आणि निसर्ग अनुभवण्याची संधी मिळू शकते, हे समजल्यानंतर ज्ञानगंगा सफारीला जाण्याचा निर्णय झाला.

## १९ लोककल्याणाची तेजस्वी परंपरा

लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचे जीवनकार्य हे भारतीय इतिहासातील एक उज्ज्वल पर्व मानले जाते. त्यांनी सत्ता ही विशेषाधिकाराची नव्हे, तर लोकसेवेची जबाबदारी आहे, हे आपल्या कृतीतून सिद्ध केले. न्याय, समता, लोककल्याण आणि सांस्कृतिक संवर्धन या मूल्यांवर आधारलेला त्यांचा राज्यकारभार आजच्या काळातही मार्गदर्शक ठरतो.

## २२ परंपरेचा धागा : अभिमानाचा वारसा!

आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पारंपरिक कलेची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा उपक्रम लक्षवेधी ठरतो. प्रदर्शनातील प्रत्येक फलक एक वेगळी गोष्ट सांगतो. करवत काठी साडीची वैशिष्ट्यपूर्ण वीण, हिमरू शालीची मऊ पोत, नारायण पेठ साडीची पारंपरिक ओळख आणि खणाच्या आकर्षक नक्षीमागची कारागिरी. या सर्व वस्त्रांमधून महाराष्ट्राच्या विविध भागांतील कला, संस्कृती आणि कौशल्याचा परिचय होतो.

## २४ रोबोटिक्स आणि एआय : जेव्हा बुद्धिमत्तेला 'शरीर' मिळते!

रोबोटिक्स आणि AI च्या या मिलनाने मानवाचे श्रम कमी करण्याचे स्वप्न सत्यात उतरवले आहे. बुद्धिमत्तेला जेव्हा शरीर मिळते, तेव्हा ती केवळ विचार करत नाही, तर ती सृजनाचे काम करते. आपण अशा भविष्यात आहोत जिथे यंत्रे केवळ आपले काम करत नाहीत, तर ती आपल्याला आपल्या स्वतःच्या क्षमतांच्या पलीकडे नेण्यास मदत करत आहेत.

## ३२ पक्षी आपले सोबती...

माणूस आधी की, पक्षी आधी? या प्रश्नाचे उत्तरदेखील कोंबडी आधी की, अंडे आधी? याप्रमाणेच कदाचित असावे. माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. निसर्गाचा तो एक घटक आहे आणि पक्षी हे त्याचे सोबती आहेत. बालपणापासून एक घास चिऊचा या आईच्या भरविण्यापासून माणसाची पक्षांबरोबरची ओळख सुरू होते.


विशेष सखोल पुनरीक्षण – (SIR) २०२६ ... ६
भुलेश्वर मंदिर आणि वेरूळच्या कैलास मंदिराचे नाते काय? ... ९
स्वच्छता ... १०
सेवानिवृत्ती म्हणजे वेळेचे स्वातंत्र्य... ... ११
'स्वदेशी'चे रंग ... १२
स्वत: मुंबई होणं! ... १३
शेगाव दर्शन ते ज्ञानगंगा सफर ... १४
लॉकडाऊन डायरी ... १६
वडिलांसाठी लेक बनली जीवनदायिनी! ... १८
लोककल्याणाची तेजस्वी परंपरा ... १९
कविता ... २०–२१
परंपरेचा धागा : अभिमानाचा वारसा! ... २२
द मेटामॉर्फोसिस ... २३
रोबोटिक्स आणि एआय : जेव्हा बुद्धिमत्तेला 'शरीर' मिळते! ... २४
चंद्रप्रकाशातील जंगलरात्र ... २६
फरमॅटचे अंतिम प्रमेय ... २७
माझे आजोळ : एक प्रतिकात्मक पंढरपूर ... २८
वेध मनाचा... ... २९
त्रिशुली आणि गंडकीच्या प्रलयाच्या निमित्ताने... ... ३१
पक्षी आपले सोबती... ... ३२
कराओके म्हणजे काय? ... ३७
संवाद वार्ता ... ३८

वर्ष ४ थे । अंक ५ । ऑगस्ट २०२६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# आपलं मंत्रालय

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी
- संपादक — जगदीश मोरे
- सहसंपादक — अर्चना देशमुख, शैलजा पाटील
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — वृंदावन एंटरप्रायजेस प्रा. लि., सिडको बस स्टॉप, ठाणे (प.)

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

**प्रतिक्रियांचे स्वागत**

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**

## 'महा ई-एचआरएमएस'

# प्रशासनाची डिजिटल नवी वाटचाल

महाराष्ट्र शासनाच्या 'महा ई-एचआरएमएस', 'महा-आयएएस' आणि 'मेंटॉर मेंटी पोर्टल' या डिजिटल मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालींचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री राज्य अतिथीगृह, मुंबई येथे करण्यात आला. यावेळी 'जिज्ञासा' या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साहाय्यकासह देशातील पहिले स्वयंचलित मॉड्यूलही कार्यान्वित करण्यात आले.

### सेवापुस्तके होणार डिजिटल



'महा ई-एचआरएमएस'मुळे १९३५ पासून प्रचलित असलेल्या भौतिक सेवापुस्तकाऐवजी संरचित डिजिटल ई-सेवा पुस्तक उपलब्ध होणार आहे. ई-ऑर्डर मॉड्यूलमधून निर्गमित होणाऱ्या प्रत्येक आदेशाच्या आधारे संबंधित सेवाविषयक नोंदी स्वयंचलितपणे अद्ययावत होतील. संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना एसएमएस अथवा ई-मेलद्वारे सूचना मिळतील. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण सेवाकालातील आदेशांनुसार डिजिटल सेवापुस्तक सातत्याने अद्ययावत राहील.

### जिज्ञासा, 'मेंटॉर मेंटी' पोर्टल आणि मोबाइल ॲप

'जिज्ञासा' हा स्वदेशी आणि सार्वभौम स्वरूपाचा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित स्मार्ट साहाय्यक आहे. आयएएस तसेच एआयएस सेवांशी संबंधित नियमांच्या आधारे तो प्रशिक्षित करण्यात आला आहे. त्याद्वारे अधिकाऱ्यांना सेवाविषयक नोंदी, लागू सेवा नियम, अनुज्ञेय हक्क आणि अन्य सेवाविषयक बाबींची माहिती व मार्गदर्शन मिळू शकेल. 'मेंटॉर मेंटी' पोर्टलच्या माध्यमातून वरिष्ठ अधिकाऱ्यांचा क्षेत्रीय कामकाजाचा अनुभव, प्रशासकीय कौशल्ये आणि संस्थात्मक ज्ञान कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. ई-एचआरएमएस मोबाइल ॲपद्वारे अधिकारी आणि कर्मचारी कोणत्याही ठिकाणाहून वेतन पावती पाहणे, उपस्थितीची नोंद तपासणे; तसेच रजेचा अर्ज सादर करणे, अशा सेवांचा लाभ घेऊ शकतील.

### सर्व सेवा डिजिटली एकत्रित

राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्राच्या महाराष्ट्र राज्य घटकाने हा सुरक्षित, ओपन सोर्सवर आधारित, एकात्मिक आणि भविष्यवेधी डिजिटल मानव संसाधन प्लॅटफॉर्म विकसित केला आहे. 'परिचय' आणि ' नॅपिक्स' तंत्रज्ञानाचा त्यात वापर करण्यात आला असून, ई-ऑफिस, आयगॉट कर्मयोगी, महापार, सेवार्थ, एनपीएस, डिजिलॉकर, भाषिणी, ई-कॅबिनेट; तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अन्य प्लॅटफॉर्मशी त्याची जोडणी करण्यात आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेनसारख्या उद्योन्मुख तंत्रज्ञानाचाही या प्लॅटफॉर्ममध्ये समावेश आहे. 'जिज्ञासा', 'महा-एआय' आणि 'अनुभव एआय' यांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामासाठी बुद्धिमान साहाय्य उपलब्ध होईल.

# सुदृढ आरोग्य : सक्षम प्रशासनाची पायाभरणी

शासकीय सेवा ही केवळ कार्यालयीन जबाबदारी नसून समाजाच्या व्यापक हितासाठी कार्य करण्याची महत्त्वपूर्ण संधी आहे. शासनाच्या योजना, निर्णय आणि उपक्रमांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यात अधिकारी-कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे कार्यक्षम प्रशासनासाठी सक्षम मनुष्यबळ आणि त्यांचे सुदृढ आरोग्य आवश्यक आहे.

आजच्या गतिमान प्रशासकीय व्यवस्थेत कामाचे स्वरूप अधिक व्यापक आणि आव्हानात्मक झाले आहे. नागरिकांच्या अपेक्षा आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. चांगल्या आरोग्यामुळे सकारात्मकता वाढून कार्यक्षमता सुधारते. कार्यक्षमता वाढविण्यासोबतच बदलत्या काळाच्या गरजांनुसार प्रशासन अधिक सक्षम, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जात आहे.

तंत्रज्ञानामुळे शासनाच्या सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि नागरिककेंद्रित होत आहेत. ऑनलाइन सेवा आणि डिजिटल माध्यमांमुळे नागरिकांना माहिती; तसेच शासकीय सेवा जलद आणि सहज उपलब्ध होत आहेत. लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सहभागही अधिक सुलभ झाला आहे. मात्र, माहितीच्या या युगात उपलब्ध माहितीची सत्यता तपासणे, वाचन-चिंतनाची सवय जोपासणे आणि प्रत्येक बाबीकडे चिकित्सक दृष्टिकोनातून पाहणे तितकेच महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि जागरूक नागरिकांचा सहभाग यामुळे प्रशासन अधिक लोकाभिमुख होण्यास मदत होत आहे.

प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी तंत्रज्ञानासोबतच योग्य नियोजन आणि कार्यपद्धतीलाही महत्त्व आहे. कामांची उद्दिष्टे आणि प्राधान्यक्रम निश्चित करून कालमर्यादेत काम पूर्ण करण्याची सवय लावल्यास अनावश्यक ताण कमी करता येतो. उपलब्ध माहितीचे योग्य विश्लेषण, कामाचे सुयोग्य विभाजन आणि आवश्यकतेनुसार सहकाऱ्यांची मदत घेणे यामुळे कार्यक्षमता वाढते. नागरिकहिताला केंद्रस्थानी ठेवून निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास प्रशासन अधिक परिणामकारक होते.

या कार्यक्षमतेला बळ देण्यासाठी कार्यालयीन वातावरणात संवाद आणि परस्पर सहकार्य असणे आवश्यक आहे. वरिष्ठ, कनिष्ठ, सहकारी आणि क्षेत्रीय अधिकारी यांच्यात सकारात्मक संवाद असेल, तर अनेक प्रश्नांची उकल सहज होते. प्रत्येकाच्या अनुभवाचा आणि सूचनांचा आदर केल्याने निर्णय अधिक परिणामकारक होतात. सहकाऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना आवश्यक ते सहकार्य केल्यास परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण होते.

दैनंदिन कामकाजासोबतच शारीरिक आरोग्याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. व्यायामासाठी स्वतंत्र वेळ मिळत नसला तरी दैनंदिन कामकाजात छोटे बदल करून शारीरिक हालचाल वाढविता येते. शक्य असेल तेथे लिफ्टऐवजी जिन्यांचा वापर करणे, जवळच्या ठिकाणी चालत जाणे, दूरध्वनीवर बोलताना उभे राहणे किंवा चालत बोलणे अशा साध्या सवयी उपयुक्त ठरतात. संतुलित आहार, पुरेशी विश्रांती आणि नियमित शारीरिक हालचाल यांना जीवनशैलीचा भाग बनविले पाहिजे. त्याचबरोबर दररोज काही वेळ स्वतःसाठी राखून ठेवणेही आवश्यक आहे. ध्यान, वाचन, संगीत, नाटक, चित्रपट किंवा आवडता छंद यासाठी दिलेला वेळ ताणतणाव कमी करण्यास मदत करतो.

आरोग्य आणि कार्यक्षमतेसोबतच कार्यालयीन सुरक्षिततेलाही तितकेच महत्त्व आहे. आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याचे मार्ग, प्रथमोपचार सुविधा, आवश्यक सुरक्षा साधने आणि आपत्कालीन संपर्क यंत्रणा सज्ज असणे गरजेचे आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्राथमिक उपचार आणि सीपीआरसारख्या जीवनरक्षक उपायांचे प्रशिक्षण मिळाल्यास आपत्कालीन प्रसंगी तातडीने मदत करता येऊ शकते.

आरोग्य, कार्यक्षमता आणि तंत्रज्ञानासोबतच सामाजिक, सांस्कृतिक व बौद्धिक विश्वाकडे पाहणेही आवश्यक आहे. याच व्यापक दृष्टिकोनातून 'आपलं मंत्रालय'चा हा अंक विविध विषयांची विविधरंगी सफर घडवितो. या अंकात 'विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६' या मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेसह कुमार गंधर्वांचे संगीत, भुलेश्वर-वेरूळचे स्थापत्य वैभव, 'फरमॅटचे अंतिम प्रमेय', 'द मेटामॉर्फोसिस', 'स्वच्छता', 'सेवानिवृत्तीनंतरचे जीवन', 'ज्ञानगंगा सफारी', 'लॉकडाऊनमधील आत्मपरीक्षण', 'अवयवदान', 'मानसशास्त्रातील करिअरच्या नव्या वाटा', 'कराओके', 'पक्षीनिरीक्षण आणि महाराष्ट्राचा पशुधन वारसा' अशा विविध विषयांचा वेध घेण्यात आला आहे. हा अंक वाचकांना नवा दृष्टिकोन आणि समृद्ध अनुभव देईल, असा विश्वास आहे.

या विविध विषयांतून मिळणारा व्यापक दृष्टिकोन प्रशासनाच्या कार्यक्षमतेला नवी दिशा देतो. कारण सक्षम प्रशासन हे केवळ नियम, प्रक्रिया आणि तंत्रज्ञानावर नव्हे, तर कार्यरत माणसांच्या सकारात्मक आणि संवेदनशील दृष्टिकोनावरही अवलंबून असते. त्यामुळे स्वतःच्या व सहकाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत, संवाद व सहकार्याची भावना जपत आणि नागरिकहिताला प्राधान्य देत अधिक सक्षम प्रशासनाच्या दिशेने वाटचाल करू या..!

**सुरेश काकाणी**
(अतिथी संपादक)

# विशेष सखोल पुनरीक्षण – (SIR) २०२६

**मनोहर पारकर**

## भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात राबविण्यात येणारे विशेष सखोल पुनरीक्षण – २०२६

### मतदार याद्या तयार करणे व त्यांच्या पुनरीक्षणासाठीच्या संवैधानिक व वैधानिक तरतुदी

भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३२४ नुसार संसद; तसेच राज्य (विधानमंडळाच्या) निवडणुका संचालित करणे आणि त्यासाठी मतदार याद्या तयार करणे व त्यांचे पुनरीक्षण करणे या कामांचे नियंत्रण, निर्देशन आणि पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी भारत निवडणूक आयोगाकडे सोपविण्यात आली आहे. संविधानातील अनुच्छेद ३२६ नुसार विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी संबंधित व्यक्ती भारताची नागरिक असणे, तिचे वय १८ वर्षे पूर्ण असणे आणि कोणत्याही कायद्यानुसार ती व्यक्ती अपात्र नसणे आवश्यक आहे. या संवैधानिक तरतुदींच्या अनुषंगाने विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्या तयार करणे व त्यांचे वेळोवेळी पुनरीक्षण करण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० आणि मतदार नोंदणी नियम १९६० मध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५०च्या कलम २१ नुसार विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्या तयार करणे किंवा त्यांचे पुनरीक्षण करण्याचे निर्देश भारत निवडणूक आयोग देतो.

### महाराष्ट्रातील निवडणूक यंत्रणा

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या कलम १३ मधील तरतुदीनुसार भारत निवडणूक आयोगाच्या नियंत्रण, निर्देशन व पर्यवेक्षणाखाली राज्यातील मतदार याद्यांच्या कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यरत असतात. राज्याच्या जिल्हास्तरावर जिल्हा निवडणूक अधिकारी, विधानसभा मतदारसंघ स्तरावर मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि मतदान केंद्र स्तरावर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कार्यरत असतात. सध्या महाराष्ट्रातील मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळता अन्य ३४ जिल्ह्यांसाठी संबंधित जिल्हाधिकारी हे जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांसाठी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका हे जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी उपविभागीय अधिकारी दर्जाचे २८८ अधिकारी मतदार नोंदणी अधिकारी म्हणून कार्यरत असून, सुमारे ७,४०० सहायक मतदार नोंदणी अधिकारी; तसेच राज्यातील १,००,२१६ मतदान केंद्रांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे १,००,२१६ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (Booth Level Officers - BLOs) कार्यरत आहेत.

### विशेष सखोल पुनरीक्षण – २०२६

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या कलम २१ मधील तरतुदीनुसार सध्या देशभरात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यापूर्वी सन २००२ ते २००४ या कालावधीत देशात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण करण्यात आले होते. त्यानंतर वाढते शहरीकरण, नागरिकांचे स्थलांतर, मतदारांचा मृत्यू, दुबार नावे तसेच इतर कारणांमुळे मतदार याद्या अधिक अचूक, अद्ययावत व दोषविरहित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगामार्फत देशभरात विशेष सखोल पुनरीक्षणाचा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तयार करण्यात येणाऱ्या विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्या लोकसभा; तसेच विधानसभा निवडणुकांसाठी वापरण्यात येतात. याशिवाय, राज्य निवडणूक आयोगाकडून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीही या मतदार याद्यांचा वापर केला जातो.

### महाराष्ट्रातील SIR चा कार्यक्रम

भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरीक्षणाचा कार्यक्रम ३० जून ते ४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना प्रपत्र (Enumeration Form) भरून घेतले. त्यानंतर ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या. प्रारूप मतदार याद्यांबाबत दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ असा आहे. या कालावधीत प्राप्त दावे व हरकती; तसेच संबंधित प्रकरणांमध्ये आवश्यक पडताळणी व सुनावणीची प्रक्रिया ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

### SIR ची वैशिष्ट्यपूर्ण प्रक्रिया

या विशेष सखोल पुनरीक्षणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मतदार यादीतील मतदारांच्या सध्याच्या निवासाची खातरजमा करण्याबरोबरच मतदारांच्या नागरिकत्वासंदर्भातील आवश्यक पडताळणीची प्रक्रिया करण्यात येत आहे. यासाठी मतदारांच्या घरोघरी जाऊन सर्वेक्षण

करण्यात आले. त्याचबरोबर मागील विशेष सखोल पुनरीक्षणाच्या वेळी तयार करण्यात आलेल्या सन २००२–२००४ च्या मतदार याद्यांमधील मतदारांच्या नावांशी किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या नावांशी जुळवणी (Mapping) करण्यात आली. या प्रक्रियेमुळे विद्यमान मतदारांची मागील मतदार याद्यांशी सांगड घालून मतदार यादी अधिक अचूक व विश्वासार्ह करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## प्रारूप मतदार यादीतील सद्यस्थिती

३१ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांच्या प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या. SIR पूर्वी राज्यात एकूण ९,७८,५४,०४९ मतदार होते. त्यापैकी ७,७१,६५,५६२ मतदारांचा प्रारूप मतदार यादीत समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच जुन्या मतदार याद्यांमधील सुमारे ७.७१ कोटी म्हणजेच जवळपास ७९ टक्के मतदार प्रारूप मतदार यादीत समाविष्ट झाले आहेत. प्रारूप मतदार यादीत समाविष्ट न झालेल्या मतदारांची संख्या २,०६,८८,४८७ आहे. गणना प्रपत्र प्राप्त न झाल्यामुळे गैरहजर, स्थलांतरित, मृत, अन्यत्र नाव नोंदणी झालेली किंवा दुबार नोंदणी; तसेच इतर कारणांमुळे या मतदारांचा प्रारूप मतदार यादीत समावेश होऊ शकलेला नाही.

प्रारूप मतदार यादीत समाविष्ट झालेल्या मतदारांपैकी सुमारे ५९,७५,७२६ मतदारांची मागील SIR मधील नोंदीशी जुळवणी झालेली नाही. तसेच ६२,४८,२८१ मतदारांची मागील SIR मधील नोंदीशी जुळवणी झाली असली, तरी त्या जुळवणीमध्ये तार्किक विसंगती (Logical Discrepancy) आढळून आली आहे.

## प्रारूप मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांसाठी महत्त्वाची माहिती

प्रत्येक मतदाराने आपले नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट आहे किंवा नाही, याची पडताळणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या Search Your Name in Draft ERoll of SIR 2026 या सुविधेद्वारे मतदारांना आपले नाव तपासता येईल. प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट असलेल्या आणि मागील SIR मधील नोंदीशी योग्य प्रकारे जुळवणी झालेल्या सुमारे ६.४९ कोटी मतदारांना आता कोणतेही कागदपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. मात्र मागील SIR मधील नोंदीशी जुळवणी न झालेल्या किंवा जुळवणी होऊनही त्यामध्ये विसंगती आढळलेल्या सुमारे १.२२ कोटी मतदारांना नियमानुसार नोटिसा देण्यात येतील. संबंधित मतदारांनी आयोगाने विहित केलेल्या कागदपत्रांपैकी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर त्यांची आवश्यक पडताळणी व सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर संबंधित मतदार नोंदणी अधिकारी प्रकरणावर अंतिम निर्णय घेतील.

## प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट न झालेल्या मतदारांसाठी संधी

प्रारूप मतदार यादीत जुन्या मतदार यादीतील २,०६,८८,४८७ म्हणजेच सुमारे २१.१४ टक्के मतदारांचा समावेश झालेला नाही. यामध्ये गैरहजर, स्थलांतरित, मृत, अन्यत्र नाव नोंदणी झालेले किंवा दुबार नोंदणी झालेले; तसेच इतर कारणांमुळे गणना प्रपत्र प्राप्त न झालेले



मतदार यांचा समावेश आहे. अशा मतदारांची यादी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ASDD List (Absent, Shifted, Dead, Duplicate) SIR 2026 या सुविधेद्वारे पाहता येईल.

या यादीत नाव आढळल्यास संबंधित मतदाराने घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. विशेष सखोल पुनरीक्षणादरम्यान काही मतदार प्रत्यक्ष निवासस्थानी उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे गणना प्रपत्र प्राप्त झाले नसण्याची शक्यता आहे. विशेषतः राज्यातील किंवा संबंधित मतदारसंघातील अन्य भागात स्थलांतरित झालेल्या मतदारांच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

अशा मतदारांना दावे व हरकतीच्या कालावधीत म्हणजेच ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत ते सध्या ज्या ठिकाणी वास्तव्यास आहेत त्या ठिकाणाहून मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करण्यासाठी प्रपत्र–६ द्वारे अर्ज करता येईल. हा अर्ज ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने करता येतो. याशिवाय १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकास किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांनाही मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी प्रपत्र–६ दाखल करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या नव्या निर्देशांनुसार प्रपत्र–६ सोबत आवश्यक घोषणापत्रही सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त अर्जांची योग्य पडताळणी केल्यानंतर संबंधित मतदार नोंदणी अधिकारी त्यावर नियमानुसार निर्णय घेतील आणि पात्र मतदारांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट केली जातील.

त्यामुळे ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेली मतदार यादी ही केवळ प्रारूप मतदार यादी आहे. त्यामध्ये नाव समाविष्ट नसलेल्या, मात्र अन्यथा पात्र असलेल्या मतदारांना आपले नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट करून घेण्यासाठी पुरेशी संधी उपलब्ध आहे.

## मतदार याद्या सतत अद्ययावत ठेवण्याची सुविधा

मतदार यादी ही एक सतत अद्ययावत होणारी यादी आहे. अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतरही मतदारांना आपले नाव समाविष्ट करणे, नाव वगळणे किंवा मतदार यादीतील तपशिलांमध्ये दुरुस्ती करण्याची सुविधा उपलब्ध

असते. नाव, नातेवाईकाचे नाव, जन्मतारिख/वय, लिंग, पत्ता, दिव्यांगत्वाचे चिन्हांकन तसेच छायाचित्र यांसारख्या तपशिलांमध्ये आवश्यकतेनुसार दुरुस्ती करता येते. तथापि, एखाद्या निवडणुकीच्या कार्यक्रमाच्या कालावधीत ही सुविधा तात्पुरत्या स्वरूपात बंद केली जाऊ शकते.

## दुबार नोंदणी व चुकीच्या घोषणेबाबत कायदेशीर तरतुदी

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या कलम १७ व १८ नुसार कोणत्याही व्यक्तीला एकापेक्षा अधिक मतदारसंघांच्या मतदार यादीत किंवा एकाच मतदारसंघात एकापेक्षा अधिक वेळा नाव नोंदविता येत नाही. तसेच याच अधिनियमाच्या कलम ३१ नुसार मतदार यादीच्या पुनरीक्षणाच्या अनुषंगाने किंवा मतदार यादीतील नोंदीसंदर्भात चुकीचे विधान किंवा घोषणा करणाऱ्या व्यक्तीस एक वर्षापर्यंतचा कारावास किंवा दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक मतदाराने मतदार यादीतील आपली माहिती अचूक असल्याची खात्री करणे; तसेच कोणतीही चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती अथवा घोषणा सादर न करणे आवश्यक आहे.




## निर्णयाविरुद्ध अपिलाची तरतूद

मतदार यादीतील नोंदीमध्ये दुरुस्ती करण्यास किंवा मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासंदर्भात मतदार नोंदणी अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाविरुद्ध अपील करण्याची तरतूद लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या कलम २४ मध्ये करण्यात आली आहे.

त्यानुसार संबंधित व्यक्तीला मतदार नोंदणी अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा दंडाधिकारी/सहायक जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे अपील करता येते. त्यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे दुसरे अपील दाखल करण्याचीही तरतूद आहे.

## नागरिकांनी काय करावे?

विशेष सखोल पुनरीक्षण – २०२६ हा मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा उपक्रम आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपले नाव प्रारूप मतदार यादीत आहे किंवा नाही, याची पडताळणी करावी. नाव समाविष्ट असल्यास त्यातील तपशील योग्य आहेत का, याचीही खात्री करावी. नाव समाविष्ट नसल्यास किंवा काही दुरुस्ती आवश्यक असल्यास निर्धारित कालावधीत संबंधित अर्ज दाखल करावा. मतदारांनी अधिकृत माहिती व सुविधांसाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या संकेतस्थळाचा; तसेच भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत मतदार सेवा संकेतस्थळाचा वापर करावा.

अचूक मतदार यादी ही मुक्त, निष्पक्ष आणि विश्वासार्ह निवडणूक प्रक्रियेचा पाया आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग आणि प्रत्येक मतदाराने आपल्या नावाची व तपशिलांची पडताळणी करणे हे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

**(सहसचिव आणि सहमुख्य निवडणूक अधिकारी.)**

**विशेष सखोल पुनरीक्षण – २०२६ या मोहिमेंतर्गत जाहीर झालेल्या प्रारूप मतदार याद्या आणि मतदार याद्यांच्या अद्ययावतीकरणाच्या एकूण प्रक्रियेविषयी राज्याचे अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्त विभागाला दिलेल्या मुलाखतीत मार्गदर्शनपर माहिती दिली आहे. इथे दिलेला QR कोड स्कॅन करून आपण ही मुलाखत ऐकू शकता.**

# भुलेश्वर मंदिर आणि वेरूळच्या कैलास मंदिराचे नाते काय?

**युवराज पाटील**

डोंगरमाथ्यावर उभं असलेलं भुलेश्वर मंदिर (पुणे जिल्हा) आज पाहताना मनात वेगळाच आनंद निर्माण झाला. त्या कोरीव दगडात दडलेल्या इतिहासाचा मागोवा घ्यायची ओढ त्याहून वेगळी. आज जवळपास तीन तास त्या परिसरात घालवले, घाईगडबड न करता, प्रत्येक शिल्पाशी संवाद साधत, प्रत्येक कोरीव रेषेचा अर्थ शोधत. आणि मग नकळत डोळ्यांसमोर उभं राहू लागलं वेरूळचं कैलास लेणं (एलोरा, लेणं क्रमांक १६) आणि कृष्णाकाठचं कोपेश्वर मंदिर (खिद्रापूर, जि. कोल्हापूर).

पहिल्या नजरेला ही तिन्ही स्थळे वेगवेगळी वाटतात. एक पर्वत कोरून उभं केलेलं, एक नदीकाठचं शास्त्रीय मंदिर आणि एक किल्ल्याच्या आवरणात दडलेलं देवस्थान; पण जसं आपण त्यांच्याकडे थांबून, बारकाईने पाहतो, तसतसा एक धागा जोडला जातो. दख्खनच्या काळ्या दगडात कोरलेल्या एका अखंड स्थापत्यपरंपरेचा.



भुलेश्वरकडे पाहताना सर्वात महत्त्वाची गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे त्याची बहुपदरी रचना. बाहेरून तटबंदी, बुरूज, किल्ल्यासारखा आकार आणि आतमध्ये कोरीव मंदिर. अभ्यासकांच्या मते भुलेश्वरची मूळ उभारणी इ.स. ८व्या शतकातली असावी (राष्ट्रकूटकालीन प्रभाव), आणि पुढे यादव वंशाच्या काळात (१२वे–१३वे शतक) त्यात मोठ्या प्रमाणावर काम वाढवण्यात आलं. त्यामुळे हे मंदिर एका काळाचं नसून, अनेक टप्प्यांत घडलेलं आहे.

या मंदिराचा अनुभव घेताना एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठळकपणे जाणवतो, शिवलिंगाची उंचावलेली मांडणी. भुलेश्वरमध्ये गाभाऱ्यातील शिवलिंग पाहण्यासाठी प्रत्यक्ष पायऱ्या चढून वर जावं लागतं. जणू दुसऱ्या मजल्यावर प्रवेश करतो आहोत, अशी अनुभूती येते. ही रचना पारंपरिक मंदिरांपेक्षा वेगळी आहे, कारण बहुतांश ठिकाणी गाभारा जमिनीच्या पातळीवर असतो. येथे मात्र उर्ध्वगामी प्रवास घडवला आहे. भक्ताला वर चढत जावं लागतं आणि मगच शिवदर्शन होतं (उन्नत गर्भगृह संकल्पना).

हीच बाब लक्षात घेतली की, कैलास लेण्याची आठवण अधिक ठळकपणे समोर येते. कैलास लेणं (८वे शतक, राष्ट्रकूट राजा कृष्ण पहिला) जरी पूर्णपणे एका खडकातून कोरलेलं असलं, तरी त्यातही स्तरांची मांडणी अत्यंत विचारपूर्वक केलेली आहे. नंदी मंडप, सभामंडप आणि मुख्य गर्भगृह. या सर्वांची उंची, अंतर आणि प्रवेश मार्ग एक विशिष्ट अनुभवात्मक प्रवास घडवतात. म्हणजेच कैलासमध्ये मजल्यांचा भास निर्माण केला आहे, तर भुलेश्वरमध्ये प्रत्यक्ष पायऱ्या चढून वर जाण्याची रचना दिसते. या दोन्ही ठिकाणी उंचावलेल्या शिवदर्शनाची कल्पना सामायिक आहे. ही केवळ स्थापत्याची नाही, तर धार्मिक अनुभूतीची सातत्यपूर्ण परंपरा आहे.

भुलेश्वरमध्ये फिरताना शिल्पांची एक वेगळीच दुनिया उलगडत जाते. एका भिंतीवर महाभारताच्या युद्धाचे दृश्यरथ, घोडे, योद्धे, संघर्षाची हालचाल (कुरुक्षेत्र युद्धाचे शिल्परूप). दुसरीकडे रामायणातील प्रसंगशापामुळे शिळा झालेली अहिल्या आणि रामाच्या स्पर्शाने पुन्हा मिळालेलं तिचं स्त्रीरूप (अहिल्या उद्धार). ही शिल्पं भव्य नाहीत; पण ती सूक्ष्म आहेत आणि म्हणूनच अधिक बोलकी वाटतात.

याच कथांची भव्य, नाट्यमय आवृत्ती आपल्याला कैलास लेण्यात दिसते. तिथे रावणाने कैलास उचलण्याचा प्रसंग, शिवतांडव... यात सर्वांत प्रचंड ऊर्जा आहे. भुलेश्वरमध्ये मात्र तीच कथा शांत, तुलनेनी छोटी आणि अधिक जवळची वाटते. जणू एखाद्या विशाल महाकाव्याची सूक्ष्म आवृत्ती.

या दोन टोकांमध्ये कोपेश्वर मंदिर एक महत्त्वाचा दुवा ठरतो. शिलाहारांच्या आश्रयात (राष्ट्रकूटांचे मांडलिक) उभारलेले आणि पुढे यादव काळात विकसित झालेले हे मंदिर स्थापत्याच्या संक्रमणाचा पुरावा आहे. ४८ कोरीव स्तंभ, स्वर्गमंडपाची उघडी रचना आणि बाह्य शिल्पसंपदा, हे सर्व पाहताना कैलासची भव्यता आणि भुलेश्वरची सूक्ष्मता यांचा सुंदर समन्वय दिसतो. इतिहासाच्या प्रवाहात पाहिलं, तर राष्ट्रकूट काळात स्थापत्यशैलीचा उत्कर्ष झाला; शिलाहारांनी ती प्रादेशिक पातळीवर रुजवली आणि यादवांनी तिला अधिक अलंकारिक रूप दिलं. त्यामुळे ही तिन्ही मंदिरे वेगवेगळी असली, तरी एकाच परंपरेची आहेत.

आज भुलेश्वरमध्ये घालवलेले ते तीन तास केवळ पर्यटन नव्हतं; तो एका स्थापत्यभाषेचा मागोवा होता. पायऱ्या चढून वर जाऊन घेतलेलं शिवदर्शन, शिल्पांमध्ये जिवंत झालेल्या कथा, आणि मनात उभं राहिलेलं कैलास व कोपेश्वर... या सगळ्यांनी एकच गोष्ट पटवून दिली– दगड स्थिर असतो; पण त्यावर कोरला जाणारा काळ सतत उंचावत पुढे जात असतो. भुलेश्वरचा डोंगर हा माणदेशाच्या सीमेवर उभा असलेला प्रहरी आहे. नीरेच्या पलीकडे पसरणाऱ्या कोरड्या माणदेशाची चाहूल येथेच लागते.

**(जिल्हा माहिती अधिकारी, पुणे, महाराष्ट्र शासन.)**

# स्वच्छता

**मोहन काळे**

***'स्वच्छता असे जेथे, आरोग्य वसे तेथे' या म्हणीनुसार स्वच्छता म्हणजे काय तर हे सगळ्यांना ठाऊक आहेच; पण तरीही त्याची पुन्हा आठवण का करून द्यावी. आपल्या शरीराची, मनाची, परिसराची स्वच्छता हा आपल्या जीवनाचा रोजचा भाग आहेच. फक्त आपण त्यांचं पालन करतो ते महत्त्वाचं आहे.***

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर रोजी साजरी केली जाते आणि याच दिवशी २ ऑक्टोबर २०१४ रोजी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात केली. संत गाडगेबाबा यांनी स्वच्छतेचा मंत्र दिला. आपण तो शाळेत असताना अभ्यासला असेलही; पण तो आम्ही अमलात आणला नाही असं वाटतं. शासन त्यांच्या पद्धतीने विविध माध्यमातून स्वच्छतेचं महत्त्व सांगत असतंच. मग देशाला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरीही आपण अस्वच्छतेला आसपास राहू दिलं असं म्हणावं लागेल. एक गोष्ट लक्षात ठेवली की, जर आपला परिसर स्वच्छ राहिला तर आपलं शरीर स्वच्छ राहील आणि शेवटी मनही स्वच्छ राहील, हे सांगायला कुणा तज्ज्ञ माणसाची गरज नाही; पण हे सारं कळायला इतकी वर्षे लागली हे सगळ्यांच्या दृष्टीने घातक ठरतंय, हे आता कळू लागलं आहे. आपण पहिल्यापासून स्वच्छतेची सवय लावली नाही, तर मग त्याचे रूपांतर रोजच्या आचरणात कसे येईल. त्यामुळे स्वच्छतेची सवय प्रत्येकाने बाळगावी.



रस्त्यावर पान, तंबाखू खाऊन थुंकणे. सोसायटीच्या भिंती थुंकून रंगवणे, सार्वजनिक ऐतिहासिक वास्तूवर प्रेमाचे देखावे करणे, प्लास्टिकचा भरमसाठ वापर करणे, कचऱ्याची समस्या वाढवत आहे.

दुसरं म्हणजे कचरा कुठेही टाकण्याच्या वृत्तीमुळे सगळीकडे घाणीचं साम्राज्य पसरलेलं दिसतं. तुम्ही कुठल्याही ठिकाणी जा तुम्हाला कचरा, घाण, अस्वच्छता पावलोपावली दिसेल. कोण करतं हे सर्व, तर तुमच्या–आमच्यासारखे नागरिक. ते सर्व करताना त्यांना कोणता पराक्रम गाजवल्याचं समाधान मिळतं ते समजत नाही. कचऱ्याचं वर्गीकरण करून ते ग्रामपंचायत, नगरपालिका किंवा महानगरपालिकेच्या संबंधित कर्मचाऱ्यांकडे दिले की, शास्त्रशुद्ध पद्धतीने त्याची विल्हेवाट लावतात; पण त्यासाठी लोकांनी आपल्या घरात जमा होणारा कचरा योग्य ठिकाणी वर्गीकृत करून ठेवला तरच घाणीचं साम्राज्य दिसणार नाही. आपण परदेशातील नागरिक किती जागरूक असतात त्याबद्दल वर्तमानपत्रातून वाचलं असेलच. मग ते आपल्या देशात का शक्य नाही; पण मी का करू? या भावनेतून कुणीच काही करीत नाही.

देशभर स्वच्छतेची चळवळ सुरू झाली. स्वच्छता पंधरवडा साजरा होऊ लागला. देशभर एक जागरूकता निर्माण झाली आणि त्याचे परिणाम आपल्याला दिसू लागले आहेत. 'स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धा' देशपातळीवर सुरू झाली आणि आज सगळीकडे स्वच्छता आता सवय बनू पाहत आहे. ती टिकून राहावी, ही सर्वांच्या आरोग्याच्या दृष्टीने फार महत्त्वाची गोष्ट आहे. 'स्वच्छ भारत अभियान' हे 'जन जागृती अभियान' झाले आहे. ज्यासाठी लोकांनी जागृतपणे त्याला पाठिंबा दिला पाहिजे आणि हे अभियान लोकसहभागामुळे सतत सुरू राहायला हवे तरच एक दिवस सगळीकडे स्वच्छता दिसेल.

मोठ्या प्रमाणात जनजागृती होऊन प्रत्येकजण स्वच्छतेकडे डोळसपणे पाहू लागला आहे. आपला परिसर, आपलं कामाचं ठिकाण, शिक्षणाचं ठिकाण, रेल्वे स्टेशन, बस स्टेशन, विमानतळ, बगीचा, रस्ते, इमारती यांनी रूपडं पालटलं. अनेक शहरं 'स्वच्छ भारत' या अभियानात हिरिरीने सहभागी झाली. आता त्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत. ही बाब सर्वांच्या दृष्टीने आनंददायी आणि सुखकारकसुद्धा आहे. त्याची सवय लावून घेऊ या. आता प्लास्टिक बंदी येऊ घातली आहे. त्याचं आपण सगळ्यांनी स्वागत करून शासकीय यंत्रणेस साथ देऊ या. आपण एक जागरूक नागरिक नात्याने स्वच्छतेच्या चळवळीत भाग घेऊन मनापासून यंत्रणेला साथ देऊ या!

'स्वच्छ परिसर, स्वच्छ आरोग्य, स्वच्छ मन' हे आपल्या आरोग्यदायी जीवनाचं ब्रीदवाक्य करा. 'स्वच्छ भारत' ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी सर्वजण एकत्र येऊ या. मी माझ्यापरीने काम सुरू केलं आहे. तुम्ही या अभियानात सामील व्हा, असं सांगायला हवं, असं नाही. कदाचित तुम्ही अगोदरच सुरुवात केली असेलही. ही फक्त एक आठवण, स्वच्छतेसाठी आणि आपल्या आरोग्यासाठी!

'स्वच्छ भारत, स्वच्छ आरोग्य' यासाठी सर्वांनी एकत्र येऊ या आणि देशाचे नाव उज्ज्वल करू या!

**(साहाय्यक प्रशासकीय अधिकारी (निवृत्त), अणू ऊर्जा विभाग, भारत सरकार. मोबाइल क्र.: ९१३७९३५१४३.)**

# सेवानिवृत्ती म्हणजे वेळेचे स्वातंत्र्य...

**सुभाष नागप**

जोपर्यंत आपण आपल्या दैनंदिन कामकाजात गुंतलेलो असतो, तोपर्यंत आपल्याला आपल्या आयुष्यातले खरे वैयक्तिक स्वातंत्र्य मिळत नाही. जबाबदाऱ्या, कामाचे ओझे, वेळेचे बंधन आणि सततची धावपळ हे चालूच असते.

सेवानिवृत्तीनंतरही हे व्यस्त आयुष्य चालूच होते, विविध उपक्रम, लेक्चर्स, व्हिडिओ बनवणे, लिखाण करणे हे सर्व चालूच होते. नोकरीमध्ये माझ्या वेळेवर माझा अधिकार नव्हता; परंतु आता तर माझ्या वेळेवर माझा अधिकार का नाही? आणि आयुष्यभर एवढी व्यस्तता मी का ठेवली आहे आणि अजून किती वर्षे? हा विचार मला सतावत होता.

मी म्हटले, थोडे थांबून पाहू या, स्वतःशी संवाद करू या. फोन, व्हॉट्सॲप, सोशल मीडिया; तसेच इतर धावपळही थांबवू या. म्हणून माझ्या सर्व दैनिक संपर्कातील सर्वांना कळवून टाकले, मी आध्यात्मात आठ दिवस जात आहे, म्हणून मी फोन किंवा व्हॉट्सॲपवर उपलब्ध असणार नाही, सर्वांनी सहकार्य केले. महत्त्वाचे काही कोणाचे असेल तर मुलीला सांगितले, माझा अतिमहत्त्वाच्या दैनिक संपर्काचा मोबाइल तुझ्याजवळ ठेव; तसे काही असेल तरच मला सांग.



माझ्या दृष्टीने अध्यात्म म्हणजे बाहेरच्या सर्व जगापासून दूर होऊन मानसिक शांततेसाठी आपल्या आतल्या जगात डोकावणे व आपल्या आत्म्याशी संवाद साधणे आणि हे सर्व घरी राहूनच करायचे.

भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे, आपल्या मनाला समजून घेणे, त्याच्या आत डोकावणे, हीसुद्धा एक साधना आहे. आपल्या दैनंदिन आयुष्यात बहुतांशी बाह्य जग आपले आयुष्य चालवत असते, म्हणून मागील आठ दिवस स्वतःसाठी द्यायचे ठरवले.

सुदैवाने घरातच थांबून, शांत बसून, स्वतःशी, स्वतःच्या आत्म्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला; परंतु जाणवत होते ते असे की, बाहेरचा आवाज बंद करणे जेवढे सोपे आहे, तेवढे आतला आवाज थांबवणे सोपे नाही. सतत काहीनाकाही विचार येतच होते. आपले बालपण, आपला संघर्ष, आपल्याला प्रेम देणारी, घडवणारी, मदत करणारी माणसे, ठिकाणे, वास्तू. आपल्याला घडवणाऱ्या घटना आणि आपल्या नोकरीच्या आठवणी, विचारांची गर्दीच गर्दी. काय मिळाले? काय नाही मिळाले? असे कित्येक विचार. अशा सर्व परिस्थितीत मी ध्यान, वाचन, प्राणायाम, मौन इत्यादी सर्वांचा आधार घेतला.

संसाराच्या जबाबदाऱ्यांनी चिंताग्रस होणारे मन थोडे शांत केले. आता माझा वेळ माझ्या हातात होता. ऑफिसची धावपळ तर सेवानिवृत्तीने थांबली होतीच; पण व्हिडिओ बनवणे, लेक्चर देणे, लिखाण करणे, या सर्वांतून मी स्वतःसाठी वेळ दिला. यातून मला सापडलेल्या बाबी खालीलप्रमाणे :-

१) जगापासून बाजूला राहिल्याने जगाचे काहीही बिघडत नाही. जग आपल्या पद्धतीने चालूच राहते.

२) मी एवढी धावपळ करत असतो, ती आता या वयात नाही केली तरी फारसे बिघडणार नाही.

३) या वयात अति ताणतणाव, चिंता, काळजी करत राहण्यापेक्षा मानसिक शांतता व आनंद मिळेल, अशा कृती कराव्यात.

४) आपल्या चिंतेने कोणताही प्रश्न सुटणार नाही. काही प्रश्न वेळेवर सोडून द्यावेत.

५) आयुष्याच्या या टप्प्यात आरोग्य सांभाळणे ही सर्वात पहिली प्राथमिकता असली पाहिजे. पैशासाठी अतिधावपळ करत राहण्यापेक्षा आरोग्य सांभाळून कमी पैशात जगण्याची सवय लावावी.

६) आयुष्य जगणे म्हणजे आपल्या शरीरात, आपण जन्म घेत असताना एक आत्मा प्रवेश करतो, आपण व्यावहारिक जगात जगत असल्याकारणाने या आत्म्याच्या आवडीच्या विरोधीही काही बाबी आपल्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडताना कराव्या लागतात. उदा. कोणाला काही बनायचे असते; परंतु आर्थिक जबाबदाऱ्यांमुळे तो ते करू शकत नाही, तर आता सेवानिवृत्तीनंतर आत्म्याच्या आवडीच्या गोष्टी कराव्यात, कारण हे जीवन पुन्हा नाही. आयुष्यात मित्र व चांगले नातेसंबंध यांना जपावे.

थोडक्यात सेवानिवृत्ती म्हणजे वेळेचे स्वातंत्र्य. आपला वेळ आपल्या मनाप्रमाणे व्यथित करता येणे हीच खरी सेवानिवृत्ती.

आठ दिवस या जगापासून अलिप्त राहिल्याने मानसिक शांतता प्राप्त झाली, स्वतःच्या आत डोकावता आले व या वयात जीवन जगताना कोणते प्राधान्यक्रम असावेत ते शोधता आले. अर्थात हा माझा अनुभव आहे. या आठ दिवसांच्या प्रवासात सापडलेली सर्वात महत्त्वाची बाब, ती म्हणजे मानसिक शांतता...

**(माजी उपसंचालक (लेखा) तथा मोटिवेशनल स्पिकर आणि लाईफ कोच.)**

# ‘स्वदेशी’चे रंग

**संजीवनी जाधव-पाटील**

देशाच्या कानाकोपऱ्यातील कारागिरी, हातमागाचा पोत, संस्कृतीचे रंग आणि स्वदेशीचा अभिमान अनुभवताना सागर रिसॉर्टच्या प्रवेशद्वारातून आत पाऊल टाकताच जाणवले, हे केवळ वस्तूंचे प्रदर्शन नाही; भारताच्या विविध प्रांतांतील कला, संस्कृती, कौशल्य आणि श्रमांचा हा एक रंगीबेरंगी उत्सव आहे. कुठे हातमागाच्या वस्त्रांवर विणकरांची बोटे बोलत होती, कुठे चित्रांच्या रंगरेषांमधून पिढ्यान्पिढ्यांची परंपरा उमटली होती, तर कुठे एखाद्या छोट्याशा हस्तनिर्मित वस्तूमागे कारागिराच्या वर्षानुवर्षांच्या साधनेची झलक दिसत होती. ‘स्वदेशी – फॅशन ॲण्ड लाइफस्टाईल एक्स्पो २०२६’ अनुभवताना मला सर्वाधिक भावले ते या प्रदर्शनामागचे हेच जिवंतपण.

छत्रपती संभाजीनगरच्या चिकलठाणा परिसरातील सागर रिसॉर्ट येथे १४ ते १६ ऑगस्टदरम्यान भरलेल्या या तीन दिवसीय प्रदर्शनाला भेट देण्याचा योग आला. केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालयाच्या वतीने साकारलेल्या या प्रदर्शनाने ‘स्वदेशी’ या शब्दाला केवळ घोषणेपुरते मर्यादित न ठेवता त्याला प्रत्यक्ष अनुभवाचे रूप दिले होते. १४ ऑगस्ट रोजी केंद्रीय युवा कार्य व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले आणि पुढील तीन दिवस सागर रिसॉर्टचा परिसर जणू छोटेखानी भारतच बनला.



महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तेलंगणा, ओडिशा, बिहार, राजस्थान आणि उत्तराखंड अशा विविध राज्यांतून आलेल्या कारागीर व लघु उद्योजकांचे सुमारे ७५ स्टॉल्स येथे सजले होते. राष्ट्रीय ज्यूट बोर्डाचाही त्यात सहभाग होता. प्रत्येक स्टॉलची स्वतःची ओळख होती आणि प्रत्येक वस्तूमागे सांगण्यासारखी एक गोष्ट होती.

प्रदर्शनात फिरताना विविध राज्यांतून आलेल्या कारागिरांशी संवाद साधता आला. दूरवरून आपली कला घेऊन छत्रपती संभाजीनगरात आलेल्या त्यांच्या चेहऱ्यावर नागरिकांच्या प्रतिसादाचे समाधान दिसत होते. पश्चिम बंगालमधून आलेल्या एका कारागिराने हे प्रदर्शन नेहमीच्या प्रदर्शनांपेक्षा वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण असल्याची भावना व्यक्त केली. त्याच्या शब्दांपेक्षाही चेहऱ्यावरचे समाधान अधिक बोलके होते.

तीनही दिवस नागरिकांची गर्दी होती. कोणी पैठणी आणि हातमागाची वस्त्रे न्याहाळत होते, कोणी दागिने आणि गृहसजावटीच्या वस्तू निवडत होते, तर कुणाची पावले पारंपरिक चित्रकलेकडे वळत होती. नागरिकांशी संवाद साधताना, अशी प्रदर्शने पुन:पुन्हा भरायला हवीत, ही भावना आवर्जून ऐकायला मिळाली.

मात्र या प्रदर्शनातून कला, संस्कृती, मनोरंजन आणि कौशल्य यांची सुंदर गुंफण तीनही दिवस अनुभवायला मिळाली. कधी झुंबाच्या तालावर वातावरण उत्साही झाले, तर कधी संगीताच्या सुरांनी संध्याकाळ रंगली. हिबिस्कस वर्कशॉप, टॅलेंट हंट, रील मेकिंग, सेल्फी स्पर्धा, मेकअप आणि रांगोळी कार्यशाळांसारख्या उपक्रमांनी महिला, मुले आणि तरुणाईलाही या स्वदेशी उत्सवाशी जोडले.

### वस्त्रगाथाने सांगितली, भारतीय वस्त्रवैभवाची कहाणी...

या सगळ्यात मनात विशेष घर करून राहिला तो दुसऱ्या दिवसाचा ‘वस्त्रगाथा फॅशन शो’. पारंपरिक भारतीय वस्त्रे, हातमाग, स्वदेशी हस्तकला आणि आधुनिक फॅशन यांचा सुरेख संगम या फॅशन शोमधून साकारण्यात आला. रॅम्पवर एकामागून एक सादर होणारी वस्त्रे पाहताना असे वाटत होते की, भारताच्या विविध प्रांतांची वस्त्रसंस्कृतीच आपली कहाणी सांगत समोरून चालत येत आहे. परंपरेच्या धाग्याला आधुनिक कल्पकतेची जोड मिळाली की, ती किती देखणी आणि समकालीन होऊ शकते, याची सुंदर अनुभूती ‘वस्त्रगाथा’ने दिली.

भारतीय वस्त्रपरंपरेला आधुनिक फॅशनच्या माध्यमातून नव्या पिढीसमोर आणणारी ही ‘वस्त्रगाथा’ खऱ्या अर्थाने एक्स्पोचे प्रमुख आकर्षण ठरली.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर या प्रदर्शनाला आणखी एक भावनिक किनार लाभली होती. स्वदेशी उत्पादनांच्या स्टॉल्समधून फिरताना ‘स्वदेशी’ ही केवळ इतिहासातील संकल्पना नसून आजच्या अर्थव्यवस्थेलाही दिशा देणारा विचार आहे, कारागिराच्या हाताला काम देणे, आपल्या विणकराने विणलेले वस्त्र अभिमानाने परिधान करणे आणि महिला व लघुउद्योजकांच्या उत्पादनाला बाजारपेठ देणे, हेही देशाशी जोडले जाण्याचे एक अर्थपूर्ण रूप आहे. शेवटच्या दिवशीही उत्साह तसूभरही कमी नाही.

१६ ऑगस्टचा अंतिम दिवस उजाडला, तरी तीन दिवसांच्या उत्सवाचा उत्साह कुठेही ओसरलेला दिसला नाही. सकाळपासूनच सागर रिसॉर्ट येथे नागरिकांची मोठी गर्दी होती. कुटुंबासह आलेले नागरिक प्रत्येक स्टॉलवर थांबत होते, वस्तूंविषयी जाणून घेत होते आणि आवडलेल्या स्वदेशी व हस्तनिर्मित वस्तूंची खरेदी करत होते.

अंतिम दिवशी क्रोशे वर्कशॉप आणि गणेशजी आसन वर्कशॉप यांना विशेष प्रतिसाद मिळाला. हातातील धाग्याला कलाकृतीचे रूप देणारे क्रोशे असो किंवा श्रद्धा आणि हस्तकौशल्याचा मिलाफ घडविणारे गणेशजी आसन या कार्यशाळांनी पारंपरिक कौशल्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा सुंदर प्रयत्न केला. याच दिवशी भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्युरोच्या (CBC) सांस्कृतिक पथकाने सादर केलेल्या आकर्षक सांस्कृतिक कार्यक्रमाने वातावरण आणखी रंगतदार केले.

गीत, संगीत आणि कलाविष्कारातून भारतीय संस्कृतीचे विविध रंग उलगडत गेले. या उपक्रमांमधून पारंपरिक कला, हस्तकौशल्य आणि भारतीय सांस्कृतिक वारशाचा परिचय नागरिकांना एका वेगळ्या स्वरूपात अनुभवता आला. सायंकाळ जवळ येऊ लागली आणि तीन दिवस गजबजलेल्या स्टॉल्सकडे पाहताना आता समारोपाची वेळ जवळ येत असल्याची जाणीव होऊ लागली. हळूहळू स्टॉल्स आवरण्याची वेळ झाली. तीन दिवस गजबजलेला परिसर शांत होऊ लागला; पण हातमागाच्या वस्त्रांचे रंग, हस्तकलेतील नजाकत, 'वस्त्रगाथे'चा देखणा रॅम्प, सांस्कृतिक पथकाचे सूर, कार्यशाळांमधील उत्साह, ग्राहकांची लगबग आणि दूरदूरच्या राज्यांतून आलेल्या कारागिरांच्या चेहऱ्यावरील समाधान, हे सारे मनात; तसेच रेंगाळत राहिले. प्रदर्शन संपले होते; पण त्याने दिलेला संदेश संपलेला नव्हता.

'स्वदेशी खरेदी करा, कारागिरांच्या कलेला बळ द्या' हे आता केवळ एखाद्या फलकावरचे घोषवाक्य वाटत नव्हते. त्या तीन दिवसांत ते प्रत्यक्ष आकार घेताना पाहिले होते. सागर रिसॉर्टमधून बाहेर पडताना एक जाणीव मनात अधिक घट्ट झाली. स्वदेशी ही केवळ खरेदीची निवड नाही; ती आपल्या मातीशी, आपल्या माणसांशी आणि आपल्या संस्कृतीशी जोडलेली जाणीव आहे. आपण एखाद्या कारागिराच्या कलेला आपल्या घरात जागा देतो, तेव्हा त्या कलेच्या पुढच्या पिढीकडे जाणाऱ्या प्रवासात आपणही एक छोटासा धागा जोडत असतो. तीन दिवसांचा 'स्वदेशी एक्स्पो' संपला; पण मातीचा गंध, हातमागाचा पोत, 'वस्त्रगाथे'चे रंग आणि कारागिरांच्या हातातील स्वदेशीचा अभिमान मनात दीर्घकाळ रेंगाळत राहिला.

**(माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र शासन.)**

---

**प्रशांत देसले**




'येणार का?'

'हो, बसा..!'

बसं, या इवल्याशा दोन शब्दांच्या संवादाने मुंबईत प्रत्येकाचा टॅक्सी प्रवास सुरू होतो. मुंबईत दररोज घराबाहेर पडणं, हा जणू या मातीतला अलिखित नियमच आहे. मुंबईत प्रवासासाठी खूप साधने उपलब्ध आहेत. लोकल आहे, बेस्ट आहे, दक्षिण मुंबई वगळता उपनगरांमध्ये रिक्षा आहे, अलीकडे विविध ऑनलाइन ॲपच्या माध्यमातून निरनिराळ्या प्रवासी सेवा आहेत, मेट्रो आहे, भरीस भर दुचाकीही आहे

मात्र कोणत्याही लोकलने रेल्वे स्थानकाबाहेर पडल्यावर अनेकांचा हात उंचावतो, जोरात 'टॅक्सी!' असा आवाज दिला जातो, टॅक्सी जवळ येऊन थांबते आणि अर्ध्याहून अधिक मुंबईकरांचा पुढचा प्रवास सुरू होतो. मुंबईतला हा प्रवासी नवखा असला की, उंच इमारती, चकाकणारी दुकाने पाहत असतो आणि नित्याचा असेल, तर तो केवळ घड्याळाच्या कांट्यांचा प्रवास मोजत असतो.

प्रवासी आणि टॅक्सीचालक दोघे बोलके असले की, प्रवासाला संवादाची जोड लाभते; पण प्रवासी जर हातातल्या डिजिटल आरशात आपलंच आभासी रूप न्याहाळू लागला की मग 'येणार का', 'हो, बसा' इथपासून सुरू झालेला संवाद केवळ 'किती झाले', सुटे नाहीत का? ...इथपर्यंतच येतो आणि थांबतो. बोलका प्रवास खूप मजेशीर असतो. कधी प्रवाशाला चालकाची घुसमट समजून घेता येते, तर कधी चालक प्रवाशाची वणवण समजून दोन प्रेमाचे शब्द बोलतो. चालक समोरच्या मोठ्या काचेतून अन् प्रवाशी टॅक्सीच्या दोन्ही बाजूला असलेल्या दोन काचांतून असे दोघे मुंबई पाहू लागतात. मुंबईवर गप्पा होतात. गप्पांतून एकमेकांचे गाव-नाव विचारलं जातं. पावसा-पाण्यावर गप्पा होतात. राजकारण, समाजकारणापासून सुरू झालेला संवाद पुढे मुंबई किती बदलली ना..! इथपर्यंत येऊन थांबतो. कधी-कधी तर हा संवाद गल्लीपासून दिल्लीपर्यंतही पोहोचतो.

गप्पागप्पांमध्ये थांबा येतो. 'थांबा' हा खरं तर खूप छान शब्द. माणसाच्या जन्मापासून, तर अखेरच्या विसाव्यापर्यंत अनेक ठिकाणी आपण थांबत असतो. प्रत्येक थांब्यामागे एक गोष्ट असते आणि थांबण्यामागेही कारण असतं; पण मुंबईतील धावपळीत रोजच सुरू होणारा नवा प्रवास आणि अंतराअंतराने येणारे थांबे मुंबईतील जगणं समृद्ध करत असतात. या प्रवासात चालक आणि प्रवासी यांच्यातील माणुसकीच्या नात्यांची वीण घट्ट होत असते. नजरेचा संवाद होत असतो.

आज भेटलेले टॅक्सीचालक आणि प्रवासी या मायानगरीत पुन्हा कधीतरी; असेच एखाद्या थांब्यावर भेटतातही, तर काही कधीच भेटत नाहीत; पण त्यांचा रोजचा प्रवास सुरू असतो. चालक नवे असतात, प्रवासी नवे असतात, प्रवासाची साधनं नवी असतात आणि थांबेही नवे असतात; पण मुंबई मात्र तीच असते. इथे येणाऱ्या प्रत्येकासाठी ती थांबते. नवखा असेल तर त्याला चालायची, धावायची सवय होईपर्यंत मुंबईदेखील त्याच्यासोबत तशीच नवखी होते. एकदा का त्याला थांब्यांची, वाहनांची आणि धावायची सवय झाली, की मुंबई त्याच्या पायांमध्ये वेग भरते. या वेगासोबत आणि नव्या थांब्यांसोबत मुंबईचं जगणं जगता-जगता आणि धावता-धावता नवख्या प्रवाशाचं स्वत: मुंबई होणं खूप मजेशीर आहे, प्रेरणादायी आहे... *चला आपणही मुंबई होऊ या!*

**(सहायक जनसंपर्क अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका.)**

# शेगाव दर्शन ते ज्ञानगंगा सफर

**प्रदीप जेठवा**

१६ ऑगस्ट २०२६ रविवार. नेहमीच्या धावपळीच्या आणि कार्यक्रमांनी व्यस्त असलेल्या दैनंदिन जीवनातून थोडा वेळ स्वतःसाठी काढायचा, निसर्गाच्या सान्निध्यात रमायचे आणि मनाला प्रसन्न करणारा अनुभव घ्यायचा, असे ठरले.

शेगावला संत श्री गजानन महाराजांच्या दर्शनासाठी वर्षातून एकदा वेळ मिळेल तसे जाणे होत असते. त्यामुळे यावेळी शेगावच्या आध्यात्मिक प्रवासासोबतच जवळच्या निसर्गरम्य स्थळालाही भेट द्यावी, असा विचार मनात आला.

शेगाव परिसरातील पर्यटनस्थळांचा शोध घेत असताना ज्ञानगंगा वन्यजीव अभयारण्य लक्ष वेधून घेणारे ठरले. शेगावपासून साधारण ६० किलोमीटरच्या परिसरात असलेल्या या अभयारण्याची माहिती घेतली. येथे वन्यजीव आणि निसर्ग अनुभवण्याची संधी मिळू शकते, हे समजल्यानंतर ज्ञानगंगा सफारीला जाण्याचा निर्णय झाला.

कधी-कधी भक्तीपासून जंगलाच्या वाटेवर निघणेसुद्धा किती आल्हाददायक अनुभव देऊन जाते, याची प्रचिती या ज्ञानगंगा सफारीमधून आली.

## शेगावची भक्ती आणि ज्ञानगंगेचा निसर्गानुभव

शेगाव म्हटले की, सर्वप्रथम आठवण होते ती संत श्री गजानन महाराजांची. भक्ती, श्रद्धा आणि सेवाभावाने चैतन्यमय झालेले शेगाव हे विदर्भातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे.

महाराजांच्या दर्शनानंतर मनात निर्माण झालेली शांतता घेऊन जेव्हा निसर्गाच्या दिशेने प्रवास सुरू होतो, तेव्हा प्रवासाचे स्वरूपच बदलून जाते.

शेगावच्या धार्मिक वातावरणातून बाहेर पडत ज्ञानगंगेकडे जाणारा रस्ता आपल्याला हळूहळू शहराच्या गजबजाटापासून दूर घेऊन जात होता. शेती, मोकळी मैदाने, डोंगररांगा आणि हिरवाईचा परिसर दिसू लागला. पुढे जंगलाचा प्रदेश जवळ येत होता आणि मनात एक वेगळीच उत्सुकता निर्माण झाली होती.

आज जंगलात काय पाहायला मिळणार?

ज्ञानगंगा हा जैवविविधतेचा समृद्ध ठेवा आहे, ही वस्तुस्थिती येथे प्रत्यक्ष भेट देऊन अनुभवता आली.

## जैवविविधतेने समृद्ध ज्ञानगंगा अभयारण्य

बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा वन्यजीव अभयारण्य सुमारे २०५ चौरस किलोमीटर क्षेत्रात विस्तारलेले आहे. महाराष्ट्र इको टुरिझमच्या माहितीनुसार हे अभयारण्य बुलढाण्यापासून सुमारे २८ किलोमीटर आणि खामगावपासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर आहे.

ज्ञानगंगा नदीच्या परिसरातील हा वनप्रदेश असून येथे दोन तलावही आहेत. शेगाव हे या परिसरातील महत्त्वाचे रेल्वे स्थानक आहे.

अभयारण्यात प्रामुख्याने कोरड्या पानझडी जंगलाचा प्रदेश आढळतो. सागवानासह विविध वनस्पती या जंगलाचा भाग आहेत.

या वनराईत बिबट्या, अस्वल, रानडुक्कर, नीलगाय, चितळ, भेडकी, तडस, रानमांजर, कोल्हा यांसारखे वन्यजीव आढळतात. पक्षीप्रेमींसाठीही ज्ञानगंगा महत्त्वाचे ठिकाण असून येथे सुमारे १५० प्रजातींच्या पक्ष्यांची नोंद आहे.



## सफारी म्हणजे केवळ प्राणी पाहणे नव्हे...

सफारी म्हणजे केवळ प्राणी पाहणे नव्हे, तर निसर्गाचा मनमुराद आनंद घेणे हा उद्देश असला पाहिजे.

जंगल सफारी हा शब्द ऐकला की, आपल्या डोळ्यासमोर लगेच वाघ, बिबट्या किंवा अस्वल येते. मात्र प्रत्यक्ष जंगलात गेल्यावर सफारीचा अर्थ अधिक व्यापक असल्याचे जाणवते.

जंगलातील शांतता, पानांची सळसळ, पक्ष्यांचे आवाज, झाडांच्या फांद्यांमधून डोकावणारा सूर्यप्रकाश, रस्त्याच्या कडेला दिसणारे प्राण्यांचे ठसे आणि अचानक एखादा पक्षी उडून जाण्याचा क्षण या प्रत्येक गोष्टी सफारीचा भाग असतात. कुटुंबासमवेत या सर्व बाबींचा

अनुभव घेतला तर ती पर्यटनाची पर्वणीच ठरते.

जंगलात वन्यजीव दिसेलच याची खात्री नसते. उलट, वन्यजीव न दिसणे हेदेखील जंगलाच्या नैसर्गिक स्वातंत्र्याचेच लक्षण आहे.

आपण त्यांच्या अधिवासात पाहुणे म्हणून जातो. ते आपल्याला दर्शन देतील की नाही, हा निर्णय निसर्गाचाच असतो. जंगल सफारी करताना हा विचार मनात पक्का करणे गरजेचे असते. त्यामुळे प्राणी पाहायला न मिळाल्यास भ्रमनिरास होत नाही.

## ज्ञानगंगेत वाघाचे आगमन

ज्ञानगंगेत २०२६ मध्ये झालेल्या बुद्ध पौर्णिमा वन्यजीव गणनेत ४४ मचाणे आणि ४४ कॅमेऱ्यांच्या माध्यमातून निरीक्षण करण्यात आले. या गणनेत ६३५ वन्यजीव कॅमेऱ्यात नोंदले गेले.

त्यात बिबटे, अस्वल, रानडुक्कर, नीलगाय, मोर, चिंकारा, हरीण, सांबर यांसह विविध प्राण्यांचा समावेश होता. असे आम्हाला मंगेश गाईड यांनी सांगितले. यावरून ज्ञानगंगेच्या जंगलातील जैवविविधतेची कल्पना येते.

ज्ञानगंगा अभयारण्याची चर्चा २०२६ मध्ये आणखी एका कारणामुळे प्रकाशझोतात आली होती. जानेवारी २०२६ मध्ये पेंच व्याघ्र प्रकल्पातून सुमारे तीन वर्षांचा नर वाघ PKT7CP-1 ज्ञानगंगा अभयारण्यात आणण्यात आला.

या घटनेमुळे बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भातील वन्यजीवप्रेमींमध्ये उत्सुकता निर्माण झाली आणि त्यांना वाघ दर्शनाची संधी प्राप्त झाली. मात्र वाघ आला म्हणून प्रत्येक सफारीत वाघाचे दर्शन होईल, अशी अपेक्षा ठेवणे योग्य नाही. जंगल सफारीचे खरे सौंदर्य म्हणजे वन्यजीवांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात, कोणताही त्रास न देता पाहण्याची संधी अनुभवणे हे आहे.

## पावसाळ्यातील ज्ञानगंगेचे सौंदर्य

१६ ऑगस्टचा काळ म्हणजे पावसाळा. त्यामुळे ज्ञानगंगेचा परिसर उन्हाळ्यातील तप्त आणि कोरड्या रूपापेक्षा पूर्णपणे वेगळा अनुभव देतो. पावसाच्या सरींनी धुतलेली झाडे, ओलसर मातीचा सुगंध, हिरवीगार गवताची चादर आणि ढगांनी व्यापलेले आकाश जंगलाला जणू नवजीवन देत असते.

अलीकडेच पावसाळ्यात ज्ञानगंगा अभयारण्यात अस्वलाचा वावर वन विभागाच्या गस्ती पथकाला दिसून आला होता. या परिसरात अस्वल, बिबट्या आणि मोर यांचा मुक्त वावर सुरू असतो. त्यामुळे पावसाळ्यातील सफारीचा अनुभव हा वन्यजीवांच्या दर्शनाइतकाच निसर्गाच्या बदलत्या रूपाचा अनुभव ठरतो.

## निसर्गाचा आदर हाच सफारीचा खरा आनंद...

जंगल आपले नाही, आपण जंगलाचे पाहुणे आहोत, या उक्तीप्रमाणे वागल्यास जंगल सफारीचा आनंद द्विगुणित होतो.

ज्ञानगंगा सफारीचा सर्वात महत्त्वाचा संदेश म्हणजे निसर्गाचा आदर करा. जंगलात मोठ्याने आवाज करणे, प्राण्यांना खाण्याचे पदार्थ देणे, कचरा टाकणे, प्राण्यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करणे किंवा केवळ फोटो मिळावा म्हणून त्यांच्या हालचालींमध्ये व्यत्यय आणणे पर्यटकांनी टाळले पाहिजे.

वन्यजीव पर्यटनाचा उद्देश प्राण्यांना आपल्या जवळ आणणे नसून, आपण त्यांच्या जगाचा आदर करायला शिकणे हा आहे.

## श्रद्धा आणि निसर्गाचा सुंदर संगम

आम्हाला एकाच प्रवासात श्रद्धा आणि निसर्ग या दोन्ही गोष्टींचा आनंद घेता आला. तसेही मानवाचा स्वभाव गुण म्हणजे एकावर एक फ्री ही ऑफर तो नेहमीच स्वीकारतो आणि सुखावतो.

शेगावचा प्रवास नेहमीच भक्ती आणि श्रद्धेचा असतो. मात्र या वेळी त्या प्रवासाला ज्ञानगंगा अभयारण्यामुळे निसर्गाची सुंदर जोड मिळाली. एका बाजूला संत गजानन महाराजांचे दर्शन मनाला आध्यात्मिक समाधान देणारे, तर दुसऱ्या बाजूला ज्ञानगंगेच्या जंगलातील हिरवाई, पक्ष्यांचे आवाज आणि वन्यजीवांचा अधिवास मनाला निसर्गाशी जोडणारा अनुभव देणारा ठरला. हा अनुभव एक महत्त्वाचा विचार मनात सोडून गेला.

मंदिरात आपण देव शोधतो आणि जंगलात देवाने निर्माण केलेला निसर्ग अनुभवतो. आधुनिक जीवनात पर्यटनाची नवी दिशा आपल्याला नवचैतन्य निर्माण करण्यास उपयोगी ठरू शकते.

विदर्भात पर्यटनासाठी केवळ प्रसिद्ध धार्मिक स्थळांकडे पाहण्याची गरज नाही. धार्मिक पर्यटनासोबत निसर्ग, वन्यजीव, जैवविविधता आणि स्थानिक संस्कृती यांचा अनुभव देणाऱ्या ठिकाणांकडेही पर्यटकांनी वळले तर स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होऊ शकते.

शेगावला येणाऱ्या भाविकांनी वेळ आणि स्थानिक परिस्थितीनुसार ज्ञानगंगा परिसराची माहिती घेऊन निसर्गभ्रमंतीचा विचार करायला हरकत नाही. मात्र सफारीची उपलब्धता, प्रवेश नियम, मार्गदर्शक आणि वन विभागाच्या त्या दिवसाच्या सूचनांची खात्री करूनच ज्ञानगंगा सफारीचे नियोजन करणे योग्य ठरेल.

ज्ञानगंगा अभयारण्याची माहिती महाराष्ट्र इको टुरिझमच्या माहितीनुसार महाराष्ट्र वन विभागाच्या व्यवस्थापनाखालील वन्यजीव क्षेत्राशी संबंधित आहे. त्यामुळे प्रत्यक्ष भेटीपूर्वी अधिकृत वन विभागाकडून ताज्या नियमांची आणि प्रवेश व्यवस्थेची माहिती घेऊन नियोजन करावे.

१६ ऑगस्ट २०२६ चा रविवार हा आमच्यासाठी नेहमीच्या कार्यक्रमांपेक्षा वेगळा ठरला. शेगावच्या पवित्र भूमीत संत श्री गजानन महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर ज्ञानगंगेच्या निसर्गरम्य परिसराकडे वळलेला प्रवास मनात कायमचा ठसा उमटवून गेला.

शेगावने श्रद्धा दिली आणि ज्ञानगंगेने निसर्गाची अनुभूती. हीच या सहलीची फलश्रुती ठरली. कधी-कधी जीवनातील धावपळ थांबवून काही तास निसर्गाच्या सान्निध्यात घालवणे, हीसुद्धा एक प्रकारची अंतर्मुख यात्रा असते. ज्ञानगंगेच्या जंगलातून परतताना मनात एकच भावना होती.

'निसर्ग जपा, जंगल जपा', कारण पुढच्या पिढीला देण्यासारखी सर्वात मोठी संपत्ती म्हणजे हिरवे जंगल आणि मुक्तपणे विहरणारे वन्यजीव.

**(विशेष कार्य अधिकारी, उपमुख्यमंत्री कार्यालय. मोबाइल क्र. : ९३२४६३७८९८)**

# लॉकडाऊन डायरी

**केशव जाधव**

उजाडले असावे म्हणून जरा डोळे किलकिले केले तर अगदी डोळे दिपतील एवढा प्रकाश. समोरच्या बिल्डिंगच्या काचेवरून परावर्तित किरणे बेडरूमच्या खिडकींमधून आत शिरू पाहत होते, जणू सूर्य पश्चिमेलाच उगवलाय. अंथरूणातूनच डावा हात जरा ताणवला व मोबाइलमध्ये किती वाजले पाहिले. सव्वाआठ झालेले. आजही ब्रह्ममुहूर्त हुकला.

ब्रह्ममुहूर्ताला ओझोनस हवा असते, दैवी शक्तींचा वावर वातावरणात असतो, अशा आशयाची पोस्ट व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीच्या कोण्या ग्रुपवर वाचल्यापासून रोज त्याचाच ध्यास घेतला होता. पहाटे ब्रह्ममुहूर्तावर उठून शुचिर्भूत होऊन प्राणायाम करायचा, थोडावेळ तरी मेडिटेशन करून मन प्रसन्न ठेवायचे, हलकासा व्यायाम करून आयुर्वेदिक चहा घ्यायचा, असे रोज रात्री ठरवून चारचा अलार्म लावायचो. कर्कश ट्यूनमुळे वैतागून तरी उठवेल म्हणून मुद्दाम कर्णकर्कश ट्यून अलार्मला लावली होती; पण कूस बदलताना हात आपोआप ताणला जाऊन तो कधी बंद पडायचा याचा पत्ताच लागत नव्हता. लवकर उठण्यासाठी लवकर झोपायचे म्हणून किती ठरवले, तरी झोप लागेपर्यंत कधी एक/सव्वा झाला ते कळतच नव्हतं. मग झोपता-झोपता पुन्हा एकदा व्हॉट्सॲप मॅसेज चेक करायचे आणि मग नेहमी प्रमाणेच...*ये रे माझ्या मागल्या...*



कूस परतून जरा पडावं म्हटलं, तर किचनमधून कर्णकर्कश हाळी आली, ९ वाजले उठा आता. अंगाला आळोखे-पिळोखे देत अंथरूणातच उठून बसलो. घड्याळातील मोठा काटा खरंच १२ च्या पुढं गेला होता.

उठून तोंडावर पाणी मारले. सर्व आवरून लिव्हिंग रूममध्ये आलो. प्रतिक्षिप्तपणे टी.व्ही.जवळचा मास्क तोंडाला लावला व मोबाइल स्वाइप करून गुगल करोना अपडेट्स चाळले. टोल किती पाहून मनातल्या मनात काही आकडेमोड केली. ते झाल्यावर लोकसत्ता व मटा ऑनलाइन चाळत बसलो. चहा आला. शिवमला बिस्किटांचा डबा आणायला सांगितले व पतंजलीचा दूध बिस्किटाचा पुडा घेऊन फोडणार तोच आतून आवाज, ''आहो, आज मंडे आहे. नाही तर बिस्किट खाल. उपवास मोडेल.'' खरंच गेल्या १०/१५ दिवसांपासून ना वार माहिती पडतो, ना तारीख, ना वेळ. ना चहाची वेळ निश्चित असते, ना नाश्त्याची, ना जेवणाची, अंघोळीचीही तीच गत.

नुसताच चहा घेताना लक्षात आलं, आपण घरात असूनही व कमाल सोशल डिस्टन्सिंग पाळत असूनही, मास्क लावलाय. इकडे तिकडे पाहून मास्क काढला. सिक्युरिटीचा फोन होता, दूधवाला भय्या खाली आलायं. तेवढं दूध घेऊन या किचनमधून आदेश झाला. सोसायटीनेही बी.एम.सी.सारखेच कडक नियम लागू केले आहेत. दूध, भाजी, फळे आदी चीज वस्तू विक्रेते, साफसफाईच्या नियमांचे पालन करून, बिल्डिंगच्या कंपाऊंडमध्येच ठरावीक वेळी विक्रीसाठी येतील, अशी व्यवस्था होती. इतर काही फळं किंवा किराणा, औषधं, यासाठीच बाहेर जावे असा दंडक.

मास्क चढवले, सर्जिकल ग्लोव्हज घातले, बिन रिफिलच्या पेनचे टोपन काढून तो डेटॉलमध्ये बुडवून बरोबर घेतला. लिफ्टची बटणे दाबायचे अस्त्र! आणि बऱ्याच दिवसांनी मोहिमेवर निघालो. दूध घ्यायचे म्हणून खाली गेलो. अलीकडेच हा भय्या वरचेवर दिसायचा. पूर्वी बिल न्यायला कधी रविवारी आलाच तर त्याचे दर्शन व्हायचे. कारण तो ब्रह्ममुहूर्तालाच अडकवलेल्या पिशवीत दूध टाकून गुल व्हायचा.

भय्याकडून दूध घेतले. सिक्युरिटीच्या रजिस्टरमध्ये नोंद करून फ्रूट्स घ्यायला म्हणून बाहेर आलो. खरंच ४०/४५ वर्षांपूर्वीच्या काळात वावरतोय की काय, असं वाटलं. तेव्हा अशीच वर्दळ गोरेगावात असावी. आजच्यासारख्या बिल्डिंग्ज, रस्ते तेव्हा नसतीलही; पण वर्दळ अशीच असावी, ती श्वापदांची. कारण हा सगळा जंगल परिसर होता. आतासारखी कुत्री, मांजरं, घुशी हे प्राणी एवढ्या प्रमाणात नसावीत. कदाचित, पण सरपटणाऱ्या प्राण्यांसह जंगली प्राण्यांचा वावर इथे तेव्हा हमखास असावा. दंगलीच्या वेळी मुंबई बंद पडली होती, त्यापेक्षाही भयाण शांतता रस्त्यावर जाणवत होती. चिकन दुकानाच्या पुढं यापूर्वी नेहमी एकमेकांवर गुरगुरणारी कुत्री, मांजरं आता सात्त्विक भावानं परिपूर्ण वाटत होती. भूकेनं रोडावलेल्या एका कुत्र्याच्या कुशीत, रोडावलेलंच मांजर बघून मला ही सत्ययुगाची सुरुवात आहे की काय असा भास होऊ लागला. आकाशात मुक्त विहार करणाऱ्या घारींबरोबरच कावळ्यांचेही *आनंदी आनंद गडे* चालू होते.

मार्केटमध्येही फेरफटका मारायचा मोह झाला. भाज्या, कांदे बटाटेवाले व फळ विक्रेते दबा धरून बसल्यासारखे, घाबरून बसले होते. सकाळी दहानंतर विक्री बंद करायचे आदेश होते. रस्त्यावर घुशींचा मात्र सुळसुळाट वाढल्याचं जाणवलं. तो स्वच्छंद वावर होता की, त्यांनाही अन्नाची मात्रा कमी झाल्याने ती अस्वस्थता होती, हे मात्र कळत नव्हतं.

घरी परतलो. कंन्स्ट्रक्टिव्ह बरंच काही करायचं होतं. खरंतर ऑफिसच्या कामातून जीमसाठी वेळ मिळत नाही, हे शल्य नेहमी असायचं. त्यामुळेच पोटाचा घेर वाढला, वजन वाढलं, याची सल होती. आता लॉकडाऊनमध्ये हेवी वर्कआऊट करून पोटाची लेवल आणायची. वाचायचं बरंच राहून गेलंय, ते वाचायचं. दर पाच-सहा महिन्यांनी धूळ झटकून तळचा पेपर बदलून मायेनं ठेवलेली पुस्तकं/ग्रंथ आता वाचायचे, मुलाबाळात मिसळून पूर्वीचे खेळ खेळायचे, राहिलेले चांगले सिनेमे बघायचे, राजा शिवछत्रपती सिरियल क्रमाने पाहायची वगैरे-वगैरे... दिवसाचे २४ तास कसे घालवायचे, या समस्येवर उपाय सापडले होते. मनसोक्त झोपायचेही होते.

उपवास असल्याने चहाची ऑर्डर कोणत्याही कां कूं शिवाय ॲक्सेप्ट झाली. व्हॉट्सॲपवरील पोस्ट पाहत-पाहत चहा घेत असतानाच ऑफिसमधून क्लार्कचा फोन आला. मिटिंग के मिनिट्स तैयार हो चुके है सर, मेल कर दूँ? चेक कराके बताइए. करेक्शन करके फाइनल कर के फिर मेल करते है. ॲप्रुव्हल के बाद वेबसाइट पर अपलोड भी करना है. मी मोबाइलमध्ये वेळ बघितली. पावणेबारा होत आले होते. ओके, ॲथोरिटी मिटिंग का अजेंडा बना के भेजो. मै कल आ रहा हूँ. मी. अजून जीम, प्राणायाम, मेडिटेशन, अंघोळ, फराळ आदी सर्वच सोपस्कार बाकी होते. काही अर्जंट कामासाठी मी आज स्टाफला १० ला ऑफिसला बोलावले होते. जमले तर आज चक्कर मारायची असा माझा विचार होता; पण आताच बारा होत आलेले. गडबडीत फासफूस करून मी स्नानसंध्या आवरली. थोडावेळ मेडिटेशन केले व 'नर्मदे हर हर' पुस्तक वाचायला घेतले. माहिती नाही कधी; पण साधारण दोनेक पाने वाचून झाली असतील-नसतील, तर झोप लागली. खिचडी खाऊन मग झोपा. सौ.ने खिचडीची प्लेट घेऊन आल्यावर दिलेल्या आवाजाने जाग आली. तीन वाजत होते. लॅपटॉपवर नेहमीप्रमाणे राजा शिवछत्रपती ही सिरियल लावली होती. जेवण करताना ही सिरियल पाहणे नित्याचेच. सहकुटुंब ३ इपिसोड पाहिले. नियमानुसार ताट, कोशिंबिरीची वाटी व चमचा धुऊन ठेवला. 'वर्क फ्रॉम होम' लागू झाल्याने, स्वत:चे ताट-वाटी स्वत: धुणे व नेमलेल्या दिवसानुसार मुलांसह सर्वांनी झाडत केर काढत साफसफाई करणे, अशी आणीबाणी आमच्या घरातही लागू होती.

पुन्हा वाचन करायचे म्हणून चटई अंथरून पडलो. वाचता-वाचता पुन्हा एक डुलकी काढली. साडे सहाच्या ठोक्याला उठलो. चहा घेतला. वेदांतसोबत चेसचा एक गेम खेळला. आजकालची पोरं जरा जास्तच फास्ट झालीत. पंधरा एक मिनिटात त्यानं चेकमेट केलं. ऑनलाइन पेपर दिल्याने त्याला आता जरा रिलॅक्स करायचं होतं. बाबा, कोणती हिंदी फिल्म लावायची? मी म्हटलं, यहुदी, लागत असेल तर लाव. अं, जरा कॉमेडी हलका-फुलका सांगा हो. एकदम ट्रॅजीडीवाला, ब्लॅक-व्हाइटवाला नको. बरं, 'मालामाल विकली' लावू? हो, हो मस्त. लाव, चालेल. इति मी.

पिक्चर बघून चहा घेतला व आम्ही निघालो जी मार्टला. राशन भरायला. कागलहून आणलेल्या जुन्या कापडी पिशव्या काढल्या. मास्क, ग्लोव्हज आदी अस्त्र चढवली. मॅजिकल पेनही सोबत घेतला. आणि बाहेर पडलो. रजिस्टरमध्ये नोंद केली.

जी मार्टला प्रचंड गर्दी. यापूर्वीही झुंबड असायची; पण ही गर्दी भयाण वाटत होती. अडीच-तीन फुटांवर सर्कलं काढली होती. त्या रिंगणात एकेकाने उभे राहायचे. भली मोठी रांग होती. एकेक जण स्मशानात जाताना चालावे, तशा स्टाइलने चालताना दिसत होते. तब्बल, तास-सव्वा तासाने आम्हाला आत प्रवेश मिळाला. संगम टॉकिजला लक्ष्मीपुरीतून चालत जाऊन तासभर आधी लाइनमध्ये उभा राहून नसीबचे तिकीट मिळाल्यावर व थिएटरमध्ये एंट्री केल्यावर जो आनंद झाला होता, त्याचीच प्रचिती आज ४० वर्षांनंतर आली होती; पण त्यावर लागलीच विरजण पडले. जी मार्टची आजची अवस्था टायटॅनिकमधील हिरॉईन म्हातारपणी दिसते तशी वाटली. खचाखच भरलेले रॅक रिकामे पडले होते. ३/३ ;४/४ फुटांवर तुरळक गिऱ्हाईकं अगदी शोधून-शोधून वस्तू गोळा करत होती. एरव्ही गाईड करायला असलेल्या ४/४ ; ५/५ असिस्टंटस्पैकी एकही दिसत नव्हता. आमची भली मोठी लिस्ट, बऱ्याच वस्तू संपल्याने १५ मिनिटांत पूर्ण करावी लागली. बिलासाठीही तीच शिस्त. *'चार आण्याची कोंबडी नि बारा आण्याचा मसाला'* म्हणतात तशी गत झाली. बाहेर पडेपर्यंत पावणे नऊ झाले. बाजूच्या डी मार्टचीही तीच गत. बरं ९ ला कारभार गुंडाळायचा होता. उर्वरित कार्यक्रम उद्या उरकायचे ठरवून आम्ही निघालो.

घरी येताच सर्व सामान ड्राय बाल्कनीत चटई अंथरून ठेवून दिले. दोघांनीही स्वच्छ स्नान केले. सव्वा दहा होऊन गेले होते. मुले जेवायला बसली. नेहमीप्रमाणे राजा शिवछत्रपती सिरियल लावली. जेवण करता-करता पाहत होते. मीही थोडावेळ पाहिली व पोथी पारायणाला देवघरात गेलो. वाचन आवरले, तेव्हा पावणेबारा झाले होते. सौ. किचन आवरून आल्या. त्यांनी ताटं मांडली. आज उपवास होता, हे आता जाणवत होतं. मॅडमनी आत सिनेमा लावला. जेवण कधी झालं कळलंच नाही. मी सिनेमामध्ये चांगलाच रमून गेलो. तेथेच जरा पाय पसरले आणि थोडा आडवा झालो. अगदी एकरूप होऊन गेलो. डोळ्यावर येणाऱ्या झापडीला न्याय न देतां 'आन'ला न्याय दिला. 'द एंड'ची पाटी पडली नि मोबाइलमध्ये पाहिले. सव्वा एक होऊन गेला होता. उद्याचा ब्रह्ममुहूर्त साधायचा होता. गडबडीत उठलो. मोबाइल घेऊन बेडरूममध्ये आलो. पडल्या-पडल्या व्हॉट्सॲप मॅसेज चाळू लागलो. घड्याळातला मोठा काटा बाराची सीमा ओलांडून गेला होता. कसा बसा झोपलो. लॉकडाऊन घोषित झाल्यापासून कमी अधिक फरकानं हीच रोजची डायरी. सुरुवातीला दिवसाचे २४ तास या चार भिंतीच्या आत कसे घालवायचे, ही समस्या वाटायची; पण रात्री एक/दीड झाला तरी काहीतरी राहून गेलंय, असं आजही वाटतंय.

ही डायरी वैयक्तिक नाही. तर ती लॉकडाऊनमुळे स्थानबद्धतेत असणाऱ्या, अपवाद वगळता व विशेषत: मुंबई महानगरीत वास्तव्य करणाऱ्या प्रत्येकाची प्रातिनिधिक स्वरूपाची आहे. बहुतेकांना ही आपलीच रोजनिशी वाटावी, अशी अपेक्षा, हो नं... *सुचले ते मांडले...*

**(निवृत्त अवर सचिव, महाराष्ट्र शासन. मोबाइल क्र.: ९९६७४४१९६५.)**

# वडिलांसाठी लेक बनली जीवनदायिनी!

## अवयवदानाचा समाजासमोर ठेवला प्रेरणादायी आदर्श

**अनिल कुरकुटे**

ज्या हाताने बापाचे बोट धरून लेक चालायला शिकली, त्याच बापाच्या आयुष्याची वाट खडतर झाली; तेव्हा हीच लेक त्यांच्यासाठी जीवनदायिनी ठरली. गंभीर आजारामुळे वडिलांचे यकृत निकामी होण्याच्या मार्गावर असताना निकिता संजीवकुमार नांदगावकर यांनी क्षणाचाही विलंब न करता स्वतःच्या यकृताचा एक भाग वडिलांना दान करण्याचा निर्णय घेतला. शस्त्रक्रिया यशस्वी झाली आणि वडिलांना नवजीवन मिळाले. वडील–लेकीच्या नात्यातील प्रेम, त्याग आणि धैर्याची ही कहाणी आता अवयवदानाबाबत समाजाला प्रेरणा देणारी यशोगाथा ठरली आहे.

### संकटाच्या क्षणी लेकीने घेतला धाडसी निर्णय...

वाशिम शहरातील आययुडीपी येथील रहिवासी असलेल्या सेवानिवृत्त औषध निर्माण अधिकारी संजीवकुमार नांदगावकर यांना गंभीर आजाराने गाठले होते. यकृताची कार्यक्षमता खालावत गेल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक झाली. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या संकटामुळे संपूर्ण कुटुंबावर चिंतेचे सावट होते. उपचारांसाठी यकृत प्रत्यारोपणाची गरज असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कुटुंबासमोर मोठे आव्हान उभे राहिले.

या कठीण परिस्थितीत निकिता यांनी स्वतःच्या यकृताचा एक भाग वडिलांना दान करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय केवळ भावनिक नव्हता, तर त्यासाठी मोठे धैर्य आणि मानसिक तयारी आवश्यक होती. शस्त्रक्रियेची भीती, स्वतःच्या आरोग्याची चिंता या सगळ्यांवर मात करत त्यांनी वडिलांचे जीवन वाचविण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले. या कठीण काळात मुलानेही अत्यंत धैर्याने पुढाकार घेतला. वैद्यकीय उपचारांशी संबंधित बाबी; तसेच धास्तावलेल्या संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्याने समर्थपणे सांभाळली. त्यामुळे कुटुंबाला या संकटाचा सामना करण्याचे बळ मिळाले.



### यशस्वी शस्त्रक्रियेनंतर घरात पुन्हा आनंद...

अखेर प्रतीक्षेचा क्षण संपला. दिनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणे येथे १ मे २०२६ रोजी यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी झाली. निकिताने दान केलेल्या यकृताच्या भागामुळे वडिलांना नवजीवन मिळाले. काही दिवसांपूर्वी गंभीर आजाराशी झुंज देणारे वडील पुन्हा कुटुंबीयांसोबत हसताना दिसू लागले.

घरातील वातावरणच बदलून गेले. चिंतेची जागा समाधानाने घेतली. आईच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलले. पत्नीला तिचा जीवनसाथी पुन्हा मिळाला. सुनेला घरातील आधारस्तंभ परत मिळाल्याचा दिलासा मिळाला. नातवाच्या आयुष्यात पुन्हा प्रेमळ आजोबांचे अस्तित्व आले. एका लेकीच्या धाडसी निर्णयामुळे संपूर्ण कुटुंबाच्या आयुष्यात पुन्हा आनंद फुलला.

### 'लेक' या नात्याचा अर्थ कृतीतून दाखवून दिला...

मुलगी म्हणजे केवळ माहेरातून सासरी गेलेले नाते नाही, तर गरजेच्या वेळी आपल्या माणसांसाठी सर्वस्व पणाला लावणारी शक्ती आहे, हे निकिताने कृतीतून दाखवून दिले. वडिलांनी आयुष्यभर तिच्यासाठी केलेल्या त्यागाची परतफेड तिने आपल्या परीने केली.

स्वतःच्या शरीरातील यकृताचा एक भाग वडिलांना दान करून त्यांना जीवनदान देणे ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नव्हती; त्यामागे होते निस्सीम प्रेम, कुटुंबाप्रति असलेली जबाबदारी आणि संकटावर मात करण्याचे अदम्य धैर्य.

### अवयवदानाचा समाजाला मोलाचा संदेश...

निकिता नांदगावकर यांच्या या निर्णयामुळे एका कुटुंबात आनंद परतला असला, तरी त्यातून समाजासाठीही महत्त्वाचा संदेश पुढे आला आहे. अवयवदानाबाबत जनजागृती होणे आणि त्यासंदर्भातील गैरसमज दूर होणे आवश्यक आहे. योग्य वैद्यकीय मार्गदर्शन आणि निर्धारित प्रक्रियेतून केलेले अवयवदान एखाद्या गरजू व्यक्तीसाठी जीवनाची नवी आशा ठरू शकते.

निकिता यांनी आपल्या कृतीतून अवयवदानाचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. त्यांच्या या धैर्यामुळे एका वडिलांना नवजीवन मिळाले आणि संपूर्ण कुटुंबाच्या आयुष्यात पुन्हा आशा, आनंद आणि हसू परतले.

या अवघड प्रसंगी आप्तस्वकीय, मित्रमंडळी आणि हितचिंतकांनी दिलेल्या शुभेच्छा, सदिच्छा; तसेच ईश्वरचरणी केलेल्या प्रार्थनाही कुटुंबासाठी मोठा आधार ठरल्या. शस्त्रक्रिया यशस्वी होऊन वडिलांना नवजीवन मिळाल्यानंतर नांदगावकर यांनी या कठीण काळात साथ, धीर आणि प्रार्थनेच्या माध्यमातून बळ देणाऱ्या सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. वडिलांसाठी स्वतःच्या शरीराचा एक भाग देणारी ही लेक केवळ आपल्या कुटुंबाची नव्हे, तर समाजाच्या स्मरणात राहणाऱ्या माणुसकीची यशोगाथा ठरली आहे. निकिता नांदगावकर यांच्या धैर्याला आणि त्यागाला मनःपूर्वक सलाम!

**(जिल्हा माहिती कार्यालय, वाशिम. मोबाइल क्र.: ९५५२२७९२२७.)**

# लोककल्याणाची तेजस्वी परंपरा

**तृप्ती सबनीस**

भारतीय इतिहासातील अनेक राजसत्तांनी आपल्या पराक्रमाचा ठसा उमटविला; परंतु जनकल्याण, न्यायनिष्ठा आणि मानवी मूल्यांच्या आधारे राज्यकारभार करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची संख्या तुलनेने कमी आहे. अशा थोर विभूतींमध्ये लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. वैयक्तिक आयुष्यातील संकटांना धैर्याने सामोरे जात त्यांनी राज्यकारभाराची धुरा सांभाळली आणि प्रशासनाला लोकसेवेचे प्रभावी साधन बनविले. त्यांची कार्यपद्धती ही केवळ राजकीय नेतृत्वाची नव्हे, तर सामाजिक बांधिलकी, धार्मिक सहिष्णुता आणि न्यायप्रियतेची आदर्श अभिव्यक्ती होती. प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांनी उभारलेले कार्य आजही सुशासनाच्या संकल्पनेला प्रेरणा देणारे ठरते.

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले जात नव्हते; परंतु माणकोजी शिंदे यांनी आपल्या कन्येला शिक्षण दिले. लहानपणापासूनच अहिल्याबाई बुद्धिमान आणि कर्तव्यदक्ष होत्या. त्यांच्यातील गुणांची ओळख मराठा साम्राज्यातील प्रसिद्ध सरदार मल्हारराव होळकर यांनी केली. त्यांनी त्यांचा पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी इ.स. १७३३ मध्ये अहिल्याबाईंचा विवाह लावून दिला. विवाहानंतर अहिल्याबाई, होळकर घराण्यात आल्या आणि त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सर्वांचे मन जिंकले; परंतु त्यांच्या आयुष्यात अनेक दुःखद प्रसंग आले. इ.स. १७५४ मध्ये कुंभेरच्या युद्धात त्यांचे पती खंडेराव होळकर यांचे निधन झाले. त्यानंतर काही वर्षांतच सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. या संकटांनंतरही अहिल्याबाई खचल्या नाहीत. त्यांनी धैर्याने परिस्थितीचा सामना केला आणि राज्यकारभाराची जबाबदारी स्वीकारली.

अहिल्याबाई इ.स. १७६७ मध्ये मालवा राज्याच्या शासक बनल्या. अहिल्याबाईंच्या राज्यकारभाराचा मुख्य आधार होता – न्याय, लोककल्याण आणि प्रामाणिक प्रशासन. त्या दररोज जनतेच्या तक्रारी ऐकत असत आणि त्यांचे निराकरण करत असत. त्यांच्या दरबारात सामान्य माणसालाही आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळत असे. न्याय देताना त्या कोणताही पक्षपात करत नसत. राजधर्माचे पालन करताना त्यांनी नातेसंबंध किंवा व्यक्तिगत भावना बाजूला ठेवून न्यायाला प्राधान्य दिले. त्यामुळे त्यांची ओळख एक न्यायप्रिय आणि लोकाभिमुख शासक म्हणून निर्माण झाली. अहिल्याबाईंच्या प्रशासनात आर्थिक शिस्त आणि विकासाला विशेष महत्त्व होते. त्यांनी शेती, व्यापार आणि उद्योग यांना प्रोत्साहन दिले. नर्मदा नदीच्या तीरावर वसलेल्या महेश्वर शहराचा विकास करून ते व्यापार आणि सांस्कृतिक केंद्र बनविले. महेश्वरी साड्यांच्या उद्योगाला त्यांनी चालना दिली. त्यामुळे हजारो कुटुंबांना रोजगार उपलब्ध झाला. त्यांच्या कारकिर्दीत राज्यात आर्थिक समृद्धी निर्माण झाली आणि जनतेचे जीवनमान उंचावले. अहिल्याबाई होळकर या धार्मिक वृत्तीच्या असल्या तरी त्यांची धार्मिकता व्यापक आणि सर्वसमावेशक होती. त्यांनी संपूर्ण भारतभर अनेक मंदिरे, घाट, विहिरी, धर्मशाळा आणि यात्रेकरूंसाठी निवासस्थाने बांधली. वाराणसी येथील काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीत त्यांचे मोठे योगदान आहे. तसेच सोमनाथ, गया, अयोध्या, उज्जैन, द्वारका, हरिद्वार आणि इतर अनेक तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी त्यांनी उदारपणे मदत केली. त्यांनी केवळ धार्मिक स्थळे उभारली नाहीत, तर भारतीय संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे स्त्रियांच्या सन्मानाबद्दलची त्यांची जागरूकता. स्त्रियांना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. विधवा स्त्रियांच्या हक्कांचे संरक्षण, मालमत्तेवरील अधिकार आणि सन्मानपूर्वक जीवन, यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. आजच्या महिला सक्षमीकरणाच्या संकल्पनेचे मूळ त्यांच्या कार्यात दिसून येते. अहिल्याबाई या केवळ प्रशासक नव्हत्या, तर एक कुशल सेनानायिकाही होत्या. राज्यावर संकट आले असता त्यांनी स्वतः सैन्याचे नेतृत्व केले. त्यांनी राज्याच्या संरक्षणासाठी सक्षम लष्करी व्यवस्था उभारली. त्यांच्या धैर्यामुळे आणि दूरदृष्टीमुळे मालवा राज्य सुरक्षित आणि स्थिर राहिले. त्या काळातील पुरुषप्रधान व्यवस्थेत एका स्त्रीने इतक्या प्रभावीपणे राज्यकारभार सांभाळणे ही अत्यंत उल्लेखनीय बाब होती. अहिल्याबाईंचे वैयक्तिक जीवन अत्यंत साधे होते. राज्याच्या संपत्तीचा त्यांनी कधीही वैयक्तिक सुखासाठी उपयोग केला नाही. त्या साधेपणा, संयम आणि सेवाभाव यांचे मूर्तिमंत प्रतीक होत्या. राजवैभव असूनही त्यांनी सामान्य जनतेच्या दुःखाशी स्वतःला जोडून ठेवले. जनतेला आपल्या कुटुंबाप्रमाणे वागविल्यामुळे त्यांना लोकमाता हा सन्मान प्राप्त झाला. हा सन्मान त्यांच्या जनसेवेची आणि लोकप्रेमाची साक्ष देतो. इतिहासकारांच्या मते, त्यांचा न्यायनिष्ठ राज्यकारभार आणि जनकल्याणकारी कार्यामुळे संपूर्ण भारताने त्यांना आदराने पुण्यश्लोक लोकमाता अहिल्याबाई होळकर म्हणून गौरविले. ही उपाधी लोकांच्या श्रद्धा आणि सन्मानातून निर्माण झाली. अहिल्याबाई होळकर यांचे १३ ऑगस्ट १७९५ रोजी निधन झाले; परंतु त्यांचे कार्य, विचार आणि आदर्श आजही समाजाला प्रेरणा देत आहेत. त्यांच्या स्मरणार्थ अनेक संस्था, विद्यापीठे, विमानतळ आणि सार्वजनिक ठिकाणांना त्यांचे नाव देण्यात आले आहे.

लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचे जीवनकार्य हे भारतीय इतिहासातील एक उज्ज्वल पर्व मानले जाते. त्यांनी सत्ता ही विशेषाधिकाराची नव्हे, तर लोकसेवेची जबाबदारी आहे, हे आपल्या कृतीतून सिद्ध केले. न्याय, समता, लोककल्याण आणि सांस्कृतिक संवर्धन या मूल्यांवर आधारलेला त्यांचा राज्यकारभार आजच्या काळातही मार्गदर्शक ठरतो. स्त्री नेतृत्वाची सामर्थ्यवान परंपरा निर्माण करत त्यांनी प्रशासनात संवेदनशीलता आणि कार्यक्षमतेचा उत्कृष्ट समन्वय साधला. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व इतिहासाच्या पानांपुरते मर्यादित न राहता समाजजीवनाला दिशा देणारे प्रेरणास्थान म्हणून सदैव स्मरणात राहील. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणेचा अखंड स्रोत राहील, यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ :-** १.**कर्मयोगिनी (अहिल्याबाई होळकर)** – विजया जहागीरदार, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९१. २) **तेजस्विनी अहिल्याबाई होळकर** – महाराष्ट्र शासन साहित्य व संस्कृती मंडळ, २००४.३) **लोकराज्ञी अहिल्याबाई होळकर** – मुक्ता केणेकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २०१३.

**(लेखाअधिकारी, पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई.)**

कविता

## बहिणी माहेरी का येतात?

बहिणी माहेरी येतात, बालपणीच्या शोधात,
जिथे हिरव्या फांदीवर झुला असतो झुलत...

भावासवे तो झुला होता हसत-खेळत,
त्या खिदळत्या फांदीवर आठवणी झुलतात...

हिरव्या पानावरची जाते, शाई सुकत-सुकत,
बहीण-भावाचे प्रेम जाते आटत-आटत...

बहीण शोधत राहते, आटलेला तो झरा,
भाऊ मिरवत राहतो धनसंपत्तीचा तोरा...



बहीण पुसत राहते, पापण्यांच्या कडा,
माहेराच्या अंगणी तिच्या मायेचा सडा...

बहीण प्रेम शोधते, नाळेच्या ओढीने,
बहीण परत जाते, रित्या हाताने मुक्याने...

माहेरी गोकुळ नांदावे, माय बापाच्या अंगणी,
बहीण सुखच चिंतते भावासाठी रातंदिनी...
बहीण सुखच चिंतते भावासाठी रातंदिनी...

**– स्वप्ना चव्हाण,**
**अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन.**

## पुस्तकाला करा मित्र...

पुस्तकाला करा रोज
तुमचा जिवलग मित्र,
कधीतरी त्यालाच
पाठवा एखादं पत्र!

पुस्तकात मिळेल
तुम्हाला जगाचे ज्ञान,
दूर होईल तुमचे
सगळे अज्ञान!

गोष्टी नि कथेत
नवी पात्र भेटतील,
कधी तरी आपल्या
आजूबाजूची वाटतील!

विज्ञानामुळे कळेल
नवे-नवे शोध,
त्यापासून घ्यावा
थोडा-थोडा बोध!

इतिहास नि भूगोलात
सारे जुने कळते,
भूतकाळात तुमचे मन
आपसूक मागे वळते!

मोठे लेखक नि कवी
पुस्तकात भेटतात,
एवढं काही देतात की
ते आपले गुरू वाटतात!

शिक्षक सांगतात
अवघड शब्दांचे अर्थ,
पुस्तक वाचनाने
नाही जात वेळ व्यर्थ!

पुस्तक म्हणजे असे
सखा नि मित्र
मनापासून लिहा
त्याला एक पत्र !

**– मोहन काळे,**
**साहाय्यक प्रशासकीय अधिकारी (निवृत्त),**
**अणू ऊर्जा विभाग, भारत सरकार.**

## गावाकडचा मुंबईकर...

मुंबईकर लढवय्या मी, अर्थव्यवस्थेचा कणा वगैरे,
प्रत्येक भूमिका निभावत आहे.
लोकलची बेडी घेऊन आयुष्याचा प्रवास करतो आहे.
मदारीच्या या खेळात मी तोल माझा सावरतो आहे.
भाकरीच्या त्या चंद्रासाठी भास्करासम पळतो आहे.

लोकलमध्ये मार्गक्रमणाची भीती आता वाटत नाही,
वाटाड्या छे, शेर्पा मी मुंबईतील रहदारीचा अचूक मार्ग निवडतो आहे.
मदारीच्या या खेळात मी तोल माझा सावरतो आहे.
भाकरीच्या त्या चंद्रासाठी भास्करासम पळतो आहे.



काहीतरी नवीन आणा हो, मेट्रो, लोकल, बस अन् ही रिक्षा-बिक्षा,
प्रवास यातून माझा रोजचाच आहे.
एवढी ऊर्जा कुठून येत असेल या गुपिताचा पत्ता लागेना,
स्मित हास्य बघून माझे बायकोला शंका येत आहे.
मदारीच्या या खेळात मी तोल माझा सावरतो आहे.
भाकरीच्या त्या चंद्रासाठी भास्करासम पळतो आहे.

मुंबई म्हणजे मायानगरी, हक्काची भाकरी आहे.
कळेल तुला मुंबई जेव्हा, असेल ती वामनाचा पाय वगैरे,
समजून घेशील मुंबई विषयी, कळेल तुला तू कोण आहे.
मदारीच्या या खेळात मी तोल माझा सावरतो आहे.
भाकरीच्या त्या चंद्रासाठी भास्करासम पळतो आहे.

- आशिष वानखडे,
**सहायक कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन.**

## तुमचं मन...

तुम्ही आदळले जाता जिवंत सापळ्यांवर
आत-बाहेरून होत जाता खिळखिळे
तुमचं मढंही हाती लागेल अंत्यविधीसाठी
याची नाहीये कुठलीच शाश्वती

तुम्ही करू शकत नाही प्रेम कुणावर
नपुंसकत्व वाढत जातं भयाण वेगानं
कुणाकडून प्रेमाची अपेक्षाही ठेवणं व्यर्थ

तुम्ही निगराणीत असता छुप्या डोळ्यांच्या
तुमची कैद भोगत असता तुम्ही निमूटपणे
तुमची हालचाल राहत नाही नैसर्गिक

तुम्ही बनत जाता मशीन
जिची सूत्रं असतात तिसऱ्याच हाती
अन् मेंदूतली तबकडीही
घासून-घासून होत जाते रिकामी

तुम्ही कुठे बोलू शकता पूर्वीसारखं
तुमची बोलती बंद झालेली गोंगाटात
तुमचं मनही नसतं आसपास...
ते तर पोखरत बसतं भूतकाळ
भटकत राहतं राना-वनात,
जाऊन बसतं खोल महिऱ्या डोहाच्या तळाशी...

- नामदेव कोळी,
**अनुवादक, भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन.**
**मोबाइल क्र. :- ९४०४०५११५४३.**

# परंपरेचा धागा : अभिमानाचा वारसा!

## राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त मंत्रालयात महाराष्ट्राच्या वस्त्रवैभवाचे दर्शन

**सिद्धी बोबडे**

महाराष्ट्राची ओळख केवळ गडकिल्ले, संतपरंपरा किंवा लोककलेपुरती मर्यादित नाही. राज्याच्या सांस्कृतिक वैभवाचा एक महत्त्वाचा धागा म्हणजे हातमाग परंपरा. या परंपरेचा गौरव आणि हातमाग विणकरांच्या कलेला योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त मंत्रालयात वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने विशेष हातमाग प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रदर्शनात प्रवेश करताच परंपरेचा धागा, अभिमानाचा वारसा हा संदेश लक्ष वेधून घेतो. माहितीपूर्ण फलक, पारंपरिक वस्त्रांचे नमुने





आणि विणकरांच्या कलेची ओळख करून देणारी मांडणी यामुळे प्रत्येक स्टॉल महाराष्ट्राच्या समृद्ध वस्त्रसंस्कृतीची कहाणी सांगताना दिसतो.

या प्रदर्शनातील सर्वाधिक आकर्षण म्हणजे पैठणी. आकर्षक रंगसंगती, रेशमी पोत, नाजूक नक्षीकाम आणि देखणा पदर यामुळे पैठणीला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक मानले जाते. अनेक पिढ्यांपासून कुशल विणकरांनी जपलेली ही कला आजही तितक्याच अभिमानाने पुढे नेली जात आहे.

यासोबतच खण, नारायण पेठ साडी, करवत काठी साडी, हिमरू शाल आणि घोंगडी यांसारख्या पारंपरिक हातमाग उत्पादनांची माहितीही प्रदर्शनातून मिळते. प्रत्येक वस्त्रप्रकाराची वेगळी ओळख, त्यामागील विणकामाची शैली आणि संबंधित भागातील सांस्कृतिक वारसा माहितीफलकांद्वारे प्रभावीपणे मांडण्यात आला आहे.

विशेष म्हणजे प्रदर्शनात 'घरीसहर Documentary Series' सादर करण्यात आली आहे. QR कोडच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पारंपरिक वस्त्रकला, विणकरांचे जीवन आणि त्यांच्या कौशल्यावर आधारित माहितीपट पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पारंपरिक कलेची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा उपक्रम लक्षवेधी ठरतो. प्रदर्शनातील प्रत्येक फलक एक वेगळी गोष्ट सांगतो. करवत काठी साडीची वैशिष्ट्यपूर्ण वीण, हिमरू शालीचा मऊ पोत, नारायण पेठ साडीची पारंपरिक ओळख आणि खणाच्या आकर्षक नक्षीमागची कारागिरी. या सर्व वस्त्रांमधून महाराष्ट्राच्या विविध भागांतील कला, संस्कृती आणि कौशल्याचा परिचय होतो.

बदलत्या काळात यंत्रमागाच्या स्पर्धेतही हातमागाची परंपरा टिकून आहे, ती या कुशल कारागिरांच्या चिकाटीमुळेच मंत्रालयात भरविण्यात आलेले हे प्रदर्शन केवळ वस्त्रांचे प्रदर्शन नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवणारा एक समृद्ध अनुभव आहे. आपल्या परंपरेचा धागा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि स्थानिक विणकरांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आज अधिक आहे. हातमागाची ही परंपरा जपणे म्हणजे आपल्या संस्कृतीचे आणि ओळखीचे जतन करणे होय.

**(जनसंपर्क अधिकारी, मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास व पंचायत राज.)**

# द मेटामॉर्फोसिस

**अजय भोसले**

सहज भ्रमणध्वनी status tour करत असताना म्हणजे सर्वांच्या भ्रमणध्वनी status मध्ये डोकावून पाहत असताना एका status ने माझे लक्ष वेधले. ती वाक्य अशी होती.

*Kafka spoke to all of us when he said;*
*when Gregor Samsa discovered that*
*he had turned into an insect,*
*his first concern was not to be*
*late for work..*

**Kafka spoke to all of us when he said; "When Gregor Samsa discovered that he had turned into an insect, his first concern was not to be late for work.."**



अशी वाक्यं माझ्यासारख्या नोकरदार व्यक्तीच्या अंतरंगात खोलवर रुततात. जणू काय हे वाक्य माझ्यासाठीच लिहिलेलं आहे, असं वाटलं. मग कुतूहल जाग झालं. कोण हा काफ्का याचा शोध सुरू झाला. फ्रान्झ काफ्का (Franz Kafka) हा विसाव्या शतकातील जर्मन भाषेतील लेखक. ३ जुलै १८८३ रोजी प्राग (सध्याचे झेक प्रजासत्ताक) येथे जन्मलेला काफ्का त्याच्या मृत्यूनंतर जगभर प्रसिद्ध झाला. मानवी भावनांची गुंतागुंत, समाजाचे वास्तव चित्रण सहजसोप्या; परंतु प्रभावी शैलीत मांडणं हे त्याचं वैशिष्ट्य. किंबहुना आंतरिक गरज असावी, असे त्याचे चरित्र वाचल्यावर लक्षात येईल.

अशा या फ्रांझ काफ्काची १९१५ मध्ये प्रसिद्ध झालेली 'द मेटामॉर्फोसिस' (The Metamorphosis) ही एक लघुकथा आहे. यात ग्रेगर साम्सा नावाचा तरुण एके दिवशी सकाळी स्वतःला एका महाकाय कीटकाच्या रूपात बदललेलं पाहतो. हे रूपक आहे, त्याच्या आयुष्यात आलेल्या नैराश्याचं; परंतु त्याचं हे स्वरूप बदलल्यानंतर घरातील सर्वांचे त्याच्या प्रति नेहमीचे व्यवहार बदलू लागतात. अशी साधी कथा आहे. ही कथा मानवी एकाकीपण, नातेसंबंधांमधील बदल आणि अस्तित्वाचा अर्थ याची प्रभावी मांडणी करते.

'द मेटामॉर्फोसिस' (The Metamorphosis) ची मूळ कथा जर्मन भाषेत आहे. याची अनेक इंग्लिश भाषांतर उपलब्ध आहेत. तथापि, विला आणि एडविन मुइरचं भाषांतर विशेष प्रसिद्ध आहे. याचा मराठीत अर्थ रूपांतर किंवा रूपांतरण असा आहे. काफ्काचे रूपांतरण हे नोकरशाही आयुष्यात आलेला नैराश्याचा एक भाग असू शकतो; परंतु आपल्या कुटुंबासाठी आधार असलेला काफ्का कुटुंबाला ओझ वाटू लागतो. काफ्काने हा बदल संथपणे चित्रित केला आहे. तो इतका संथ आहे की, आपल्याला तो रटाळ वाटू शकतो, किंबहुना तो वाटावा असाच काफ्काचा प्रयत्न दिसतो. काफ्का यातून नोकरदार माणसाचे संथ आणि दिशाहीन आयुष्य चित्रित करतो.

सर्वसाधारण नोकरदार माणसाचे आयुष्य म्हणजे सकाळी उठणे, नाष्टा करणे, ट्रेनसाठी धावपळ करणे, कार्यालय गाठून स्वतःला कागदात गाडून घेणे, पुन्हा संध्याकाळी ट्रेन पकडून घर गाठणे असं असतं. यात कला, सर्जनशीलता याचा; तसेच पुलं म्हणतात तसं माणसाने पोटासाठी नोकरी जरूर करावी; परंतु आयुष्यात एखादी कला जरूर जोपासावी. याचा अभाव असल्यामुळे त्याचं आयुष्य म्हणजे एक नीरस दिनक्रमाचा भाग असतं; परंतु काफ्काचं पात्र कदाचित याच अभावामुळे रूपांतरीत झालेलं असावं. कारण काही असो. या बदलामुळे त्याला घरच्यांचे स्वभाव जवळून कळू लागतात. माणूस जेव्हा कमकुवत होतो, तेव्हा समाज आणि जवळची माणसे कशी पाठ फिरवतात, याचं संवेदनशील, व्यावहारिक सूक्ष्म चित्रण या पुस्तकात आहे. नातेसंबंध स्वार्थावर किंवा उपयुक्ततेवर अवलंबून असतात का? असे अस्वस्थ करणारे प्रश्न ही लघुकथा उपस्थित करते. शेवटी नायक मरतो. सर्व प्रश्न अनुत्तरित ठेवून ही लघुकथा आपणास आत्मचिंतन करण्यास भाग पाडते.

मराठीतही काफ्काचं 'द मेटामॉर्फोसिस' या पुस्तकाचा अनुवाद उपलब्ध आहेत. काफ्काची कथा ही आपणा सर्वांची कथा आहे, म्हणून सर्वांनी वाचायला हवी, *जर आयुष्य यंत्रासारखं जगायचं नसेल तर...!*

**(अवर सचिव, महाराष्ट्र शासन.)**

# रोबोटिक्स आणि एआय : जेव्हा बुद्धिमत्तेला 'शरीर' मिळते!

प्रशांत वामन

आतापर्यंतच्या पाच भागांमध्ये आपण कृत्रिम बुद्धिमत्तेचा इतिहास, मशीन लर्निंग, डीप लर्निंग, भाषेचे ज्ञान (NLP) आणि यंत्रांची दृष्टी (Computer Vision) या विषयांवर सखोल चर्चा केली. हे सर्व विषय AI च्या 'मेंदू'शी संबंधित होते; पण विचार करा, जर तुमच्याकडे जगातील सर्वात प्रगत मेंदू असेल; परंतु तुमच्याकडे हात, पाय किंवा शरीर नसेल, तर तुम्ही त्या बुद्धिमत्तेचा वापर करून भौतिक जगात बदल करू शकाल का? उत्तर आहे, *नाही.*

जेव्हा आपण AI च्या या प्रगत मेंदूला एका यांत्रिक शरीराशी जोडतो, तेव्हा जो चमत्कार घडतो त्याला आपण 'रोबोटिक्स' (Robotics) म्हणतो. आजच्या सहाव्या भागात आपण पाहणार आहोत की, AI आणि रोबोटिक्सच्या संगमातून मानवी संस्कृती एका नवीन युगात कशी प्रवेश करत आहे.



## रोबोटिक्स म्हणजे काय?

रोबोटिक्स हे विज्ञानाचे असे क्षेत्र आहे, जे यंत्रांची रचना (Design), बांधणी (Construction) आणि त्यांच्या संचालनाशी (Operation) संबंधित आहे. एक साधा रोबोट केवळ दिलेल्या सूचनांचे पालन करतो (उदा. फॅक्टरीमधील वेल्डिंग करणारा हात); परंतु जेव्हा आपण त्यात AI समाविष्ट करतो, तेव्हा तो रोबोट 'स्मार्ट' होतो. तो केवळ हालचाल करत नाही, तर आपल्या सभोवतालच्या वातावरणाचे विश्लेषण करतो आणि बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःचे निर्णय स्वतः घेतो.

थोडक्यात सांगायचे, तर रोबोटिक्स म्हणजे AI चे भौतिक रूप (Physical Manifestation) आहे.

## रोबोट आणि AI मधील फरक समजून घेऊ या...

अनेकदा लोक या दोन संज्ञांमध्ये गोंधळ करतात. हे समजून घेण्यासाठी एक साधे उदाहरण घेऊ या :–

- **AI (मेंदू) :** चेस खेळणारा संगणक प्रोग्राम हा AI आहे. तो विचार करतो, चाल ठरवतो; पण तो प्रत्यक्षात प्यादे हालवू शकत नाही.
- **रोबोट (शरीर) :** फॅक्टरीमधील एक यांत्रिक हात जो एका ठिकाणाहून वस्तू उचलून दुसऱ्या ठिकाणी ठेवतो. जर त्याच्या समोर वस्तू नसेल, तरी तो आपली हालचाल करतच राहील, कारण त्याला विचार करण्याची क्षमता नाही.
- **AI-Powered Robot :** हा रोबोट चेसचा बोर्ड पाहतो (Computer Vision), सर्वोत्तम चाल निवडतो (AI) आणि आपल्या यांत्रिक हाताने प्रत्यक्ष प्यादे हालवतो (Robotics).

## रोबोट्सचे मुख्य घटक (Anatomy of a Smart Robot)

एक AI आधारित रोबोट प्रामुख्याने पाच भागांनी बनलेला असतो :–

- **सेन्सर्स (Sensors – ज्ञानेंद्रिये) :** रोबोटला बाह्य जगाची माहिती मिळवण्यासाठी कॅमेरे (दृष्टी), लिडार (Lidar – अंतर मोजण्यासाठी), स्पर्श सेन्सर्स आणि ध्वनी सेन्सर्सची गरज असते.
- **इफेक्टर्स आणि ॲक्च्युएटर्स (Effectors Actuators – स्नायू) :–** हे रोबोटचे हात, पाय किंवा चाके असतात. मोटार आणि इंजिनच्या मदतीने रोबोट हालचाल करतो.
- **प्रोसेसर (Processor – मेंदू) :** येथे AI अल्गोरिदम चालतात. सेन्सर्सकडून आलेली माहिती प्रोसेस करून काय कृती करायची, हे येथे ठरवले जाते.
- **पॉवर सोर्स (Power Source) :** बॅटरी किंवा इलेक्ट्रिसिटी, ज्यावर रोबोट चालतो.
- **कंट्रोल सिस्टिम (Control System) :** हा सॉफ्टवेअरचा तो भाग आहे जो मेंदू आणि शरीराचा ताळमेळ बसवतो.

## रोबोटिक्समधील AI चे महत्त्व

पूर्वीचे रोबोट्स एका ठरावीक वातावरणातच काम करू शकत होते. जर फॅक्टरीमध्ये एखादा अडथळा आला, तर ते थांबायचे; पण AI मुळे रोबोट्समध्ये खालील क्षमता आल्या आहेत :-

- **स्वायत्तता (Autonomy) :** रोबोट्स आता कोणाच्याही मदतीशिवाय स्वतःचे मार्ग शोधू शकतात (उदा. स्वयंचलित व्हॅक्युम क्लिनर).
- **मशीन लर्निंग :** रोबोट्स आता त्यांच्या चुकांतून शिकतात. जर एखादी वस्तू उचलताना ती सटकली, तर पुढच्या वेळी ती कशी घट्ट पकडायची, हे ते अनुभवाने शिकतात.
- **सहकार्य (Cobots) :** 'कोबॉट्स' (Collaborative Robots) हे मानवाच्या सोबतीने काम करतात. ते मानवाच्या हालचाली ओळखतात आणि अपघाताची शक्यता असल्यास स्वतःहून थांबतात.

## रोबोट्सचे विविध प्रकार आणि त्यांचे उपयोग

आज रोबोट्स केवळ कारखान्यांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. त्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल :-

- **इंडस्ट्रियल रोबोट्स (Industrial Robots) :** कार मॅन्युफॅक्चरिंग, वेल्डिंग, पेंटिंग आणि पॅकेजिंगमध्ये यांचा वापर होतो. हे २४ तास न थकता आणि अचूकपणे काम करतात.
- **सर्व्हिस रोबोट्स (Service Robots) :** हॉटेलमध्ये जेवण वाढणे, हॉस्पिटलमध्ये औषधे पोहोचवणे किंवा विमानतळावर प्रवाशांना माहिती देणे यासाठी यांचा वापर वाढतो आहे.
- **ह्युमनॉइड रोबोट्स (Humanoid Robots) :** हे दिसायला माणसासारखे असतात. 'सोफिया' (Sophia) किंवा टेस्लाचा 'ऑप्टिमस' (Optimus) ही याची उदाहरणे आहेत. हे रोबोट्स मानवाशी संवाद साधू शकतात आणि मानवी हावभाव करू शकतात.
- **लष्करी आणि शोध मोहीम रोबोट्स :** बॉम्ब निकामी करणे, शत्रूवर पाळत ठेवणे किंवा मंगळ ग्रहावर शोध घेणे (Mars Rover) यासाठी रोबोट्स वापरले जातात.
- **वैद्यकीय रोबोट्स (Medical Robots) :** 'दा विंची' (da Vinci) सारखे रोबोट्स अत्यंत सूक्ष्म शस्त्रक्रिया (Surgeries) करण्यासाठी डॉक्टरांना मदत करतात, जिथे मानवी हातांचा थरकाप होण्याची शक्यता असते.

## आव्हाने आणि भीती : काय रोबोट्स धोकादायक आहेत?

रोबोटिक्सच्या प्रगतीसोबतच काही गंभीर प्रश्नही निर्माण झाले आहेत :-

- **बेरोजगारीची भीती :** असे मानले जाते की साचेबद्ध कामे करणारे रोबोट्स मानवी कामगारांची जागा घेतील. यामुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्यांवर गदा येऊ शकते.
- **सुरक्षा आणि नैतिकता :** जर लष्करी रोबोट्सनी स्वतःहून गोळी झाडण्याचा निर्णय घेतला, तर त्याला जबाबदार कोण? 'किलर रोबोट्स' (Lethal Autonomous Weapons) हा जागतिक चिंतेचा विषय आहे.
- **हार्डवेअर मर्यादा :** सॉफ्टवेअरमध्ये प्रगती वेगाने होत असली तरी, मानवासारखे लवचिक आणि नाजूक हालचाली करू शकणारे यांत्रिक शरीर बनवणे अजूनही खूप महागडे आणि कठीण आहे.

## भविष्य : मानवी आणि यांत्रिक जगाचा संगम

भविष्यात 'एक्झोस्केलेटन्स' (Exoskeletons) येतील, जे एखादा माणूस अंगावर परिधान करेल आणि त्या रोबोटिक शरीरामुळे त्याची ताकद १० पटीने वाढेल. अपंग व्यक्तींना चालण्यासाठी रोबोटिक पायांचा वापर करता येईल. आपण अशा एका युगाकडे जात आहोत जिथे रोबोट्स केवळ यंत्रे नसून आपल्या कुटुंबाचा, कामाचा आणि समाजाचा एक भाग असतील.



## निष्कर्ष

रोबोटिक्स आणि AI च्या या मिलनाने मानवाचे श्रम कमी करण्याचे स्वप्न सत्यात उतरवले आहे. बुद्धिमत्तेला जेव्हा शरीर मिळते, तेव्हा ती केवळ विचार करत नाही, तर ती सृजनाचे काम करते. आपण अशा भविष्यात आहोत जिथे यंत्रे केवळ आपले काम करत नाहीत, तर ती आपल्याला आपल्या स्वतःच्या क्षमतांच्या पलीकडे नेण्यास मदत करत आहेत.

रोबोटिक्सच्या या यांत्रिक जगातून आता आपण पुन्हा एकदा आपल्या दैनंदिन डिजिटल जगाकडे वळणार आहोत. तुमच्या खिशात असलेला स्मार्टफोन किती 'स्मार्ट' आहे? त्यात कोणते अदृश्य AI दडलेले आहे?

हे आपण पुढच्या भाग ७ : आपल्या स्मार्टफोनमधील AI (AI in Smartphones) मध्ये सविस्तरपणे पाहणार आहोत.

**(कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन. मोबाइल क्र: ८९८३३४४३६७)**



# चंद्रप्रकाशातील जंगलरात्र

**अश्विनी धावणे**

तिरुपतीकडे जाण्याकरिता श्रीशैलमचे दर्शन घेऊन पुढे निघालो. श्रीशैलम येथे खूप भटकंती करून ही राहण्याची सोय झाली नसल्यामुळे पुढचा प्रवास करण्याचे ठरले. आम्ही निघालो, मात्र पुढे घनदाट जंगल असेल याचा अंदाज नव्हता. पुढचा रस्ता बंद करण्यात आला होता. जंगल हे फक्त मानवाचे नसून संपूर्ण प्राणी जातीचे आहे. त्यांनाही मुक्तपणे वावरता यावे किंवा प्रवाशांना जंगली प्राण्यांच्या हल्ल्यात हानी होऊ नये, यासाठी तो रस्ता बंद करण्यात येत असावा. मिट्ट काळोख, हिव भरवणारी थंडी, रात्रीचे जवळपास १२ वाजलेच होते. पूर्ण गोलाकार चंद्रमा काळ्या कुट्ट आकाशात स्वतःचे राज्य मिरवत होता. त्याचा तो मंद प्रकाश आणि किर्रर्र आवाज... घुबडासह इतर आवाज आणि पानांची सळसळ... भूताच्या मालिकेचं शूटिंग असावं असा तो scenerio... पूर्वी कधीही न पाहिलेली ती जागा होती. पलीकडे काय, वरती काय, बाजूला काय आहे, याचा काहीही थांगपत्ता नव्हता. फक्त तिथे जाऊन कारला break लावला. बाकी २ ते ३ चार चाकी त्या ठिकाणी होत्या. ती लोकं कारच्या आतच झोपणार असावीत, हे त्यांच्या हालचालींवरून जाणवत होतं. त्यांच्या कार्यालयाकडे जाता-जाता तिथले ऑफिसर बोलून गेले की, येथे रात्रीच्या वेळी जंगली प्राण्यांचा वावर असतो. माझ्या भित्र्या काळजात धडकी भरली. तरीही इतकी मोठी जोखीम घेऊन आम्ही झोपण्याचे सामान कारमधून काढले आणि तिथे पहुडलोच. आम्ही ४ आणि दुसरे २ लोक असे एकूण ६ जण तिथे पायऱ्यांवर झोपलो होतो. ऑफिसरच्या कार्यालयाकडे जाणाऱ्या या पायऱ्यांच्या वरती एक नजर टाकली तर तिथे झोपडी होती, तिला झोपडीसारखाच एक धक्का दिला, तर पडेल असा तकलादू दरवाजा होता. त्यामध्ये थकलेले आज्ञी-आजोबा दिसले आणि २ कुत्री होती. ती इकडे-तिकडे पाहून सारखीच भुंकत होती. त्यांच्या भुंकण्याची सुरुवातीला जरा भीतीच वाटली; पण नंतर जणू काय आमची राखण करण्याकरिता देवदूत बनून आले असावेत असे ते आमच्याजवळ येऊन बसले. त्यातला एक कुत्रा त्याला थंडी वाजत असावी म्हणून शेजारच्या व्यक्तीच्या पायाशी येऊन ब्लँकेटला चिकटून बसला. प्राणी किती प्रेमळ असतात. त्यांनाही प्रेम हवं असतं, हे तेव्हा मला जाणवलं. मात्र त्या व्यक्तीने त्याला हाड करून दूर केले. नंतर तो कुत्रा उठला आणि आम्ही झोपलो होतो, त्याच्याविरुद्ध बाजूने जाऊन फिरून आला. बहुतेक तिकडे कोणी जंगली प्राणी तर नाही, हे तपासून आला असावा, येऊन शेजारी परत बसला. दुसरा शुभ्रवर्णी कुत्रा मात्र खूप तीक्ष्ण नजरेचा होता. त्याची नजर सारखी भिरभिरत होती. झोपेत कोणाचा पाय थोडासा जरी हलला, तरी तो मागे वळून बघत असे आणि वर असणाऱ्या झोपडीकडे जात असे आणि तिथून आमच्या सगळीकडे नजर टाकत भुकंत असे. परत तो खाली आला आणि मधून-मधून त्या झोपडीच्या दिशेला पाहून भुंकत होता. बहुतेक त्या आजी-आजोबांना खात्री देत असेल की, मी इथेच आहे. सोबतचे ५ जणही झोपले. माझे पती बोलले की, तू झोप, मी ३ वाजेपर्यंत जागा राहतो, नंतर तुला उठवतो. मला मात्र ते जागी राहतील, याची खात्री होत नव्हती, कारण आम्हा दोघांकडेही मोबाइल नव्हता. मोबाइल बघत झोप येणार नाही. मी झोपत नाही पाहून पतीदेव स्वतःच झोपले. मला मात्र भीतीने पोटात गोळा येत होता आणि आश्चर्य वाटत होते की, जंगल बाजूला आहे, हे ठिकाण आपल्यासाठी पूर्णपणे अनोळखी आहे. याची आपल्याला काही माहिती नाही, तरीही बिनधास्त ही माणसं झोपली कशी काय! दात कुडकुडत होते. अंगावर २ ब्लँकेट घेतले होते. स्वच्छ पिठूर चंद्रप्रकाशातल्या अनेक रात्री मी शेतामध्ये अनुभवल्या होत्या. मात्र या रात्रीचा प्रत्येक प्रहर वेगळा भासत होता. संधिप्रकाश पडून रात्रीचा काळोख दाटेपर्यंतचा वेळ, अनेक वन्यजीव धास्तावत बाहेर पडण्याचा असतो. या काळात बिबट्याही दिवसभराच्या विश्रांतीचं ठिकाण सोडून गस्त घालायला, पाणी प्यायला व भक्ष्याच्या शोधात बाहेर पडतो, हे पुस्तकात वाचले होते. इकडे रातव्यांचे आवाज ऐकत रात्र संपत होती, एक घुबड जवळच्याच फांदीवर येऊन बसले. त्याने केलेला धुत्कार ऐकून अंगावर काटाच आला. कुत्रा जोरात वर

धावत गेला आणि तिथून त्याने मागच्या बाजूने आरोळी ठोकली. यावेळी कुत्र्याचा तो आवाज काही वेगळाच होता. हे सगळं होत असतानाही एक अनुभव गाठीशी जमा होत होता. हा अनुभव आपण सगळ्यांना शेअर करण्याकरिता जिवंत राहू का, याचाही विचार येत होता. *मन चिंती ते वैरी न चिंती*, म्हणतात ना तसे हे... भीती, आश्चर्य, आतुरता आणि आनंद... मी या सर्व निसर्गनादात पुरती हरवून गेले होते. नरडीभोवती स्कार्फ पूर्णपणे गुंडाळला होता. ऐकण्यात होते की, वाघ अगोदर नरडी पकडतो त्या भीतीने एकटी बसून होते आणि माझ्या जोडीला २ देवदूतरूपी कुत्रे सिक्युरिटी गार्डप्रमाणेच आमचं राखण करीत होते. मनोमन स्वामींचा धावा होता की, लवकर सकाळ होऊ दे आणि इथून सुखरूप बाहेर पडू दे. नजर चहूबाजूला भिरभिरत होती. मागच्या बाजूने काही येईल तर, पायऱ्यांच्या वरच्या बाजूने काही येईल तर मनात कितीतरी प्रश्न, शंका जत्रा करत होत्या. कडाक्याची थंडी होती, तरी थंडीत भीतीने घाम फुटत होता. २ वाजल्यानंतर भयाण शांतता झाली. फक्त पानांची सळसळ आणि किड्यांचे आवाज...कुठून तरी आवाज आला आणि कुत्रा धावतच भुंकत झोपडीजवळ गेला. तिथून त्याने चहूकडे नजर टाकली आणि परत खाली येऊन बसला. एक गाडी आली, त्यामध्ये ऑफिसर लोक होते, त्यांची राऊंड मारण्याची वेळ असावी, तेव्हा आजीने दरवाजा उघडला आणि काहीतरी इशारे केलेले दिसले. तेवढंच मनाला शांत वाटलं की, ऑफिसर गस्तीवर आहेत. गाडी पुढे निघून गेली आणि पुन्हा तीच भयाण शांतता. फक्त रोडवर लाईट आणि पायऱ्यांवर हलका उजेड. बाकी सगळीकडे किर्रर अंधार. त्या पलीकडे काही दिसत नव्हते. थोडावेळ गेला तसा आवाज आला खट खट...रोडवर काळवीट आले. त्याचा फोटो घ्यावा वाटत होतं; पण जवळ मोबाइलही नव्हता, त्याच्या पायाचा आवाज इतका घुमत होता की, असे वाटले याच्या मागे वाघ आला, तर आपण गेलोच... कोणाला उठवायचे नाही. आपण स्वतःहून वाघाला सरेंडर व्हायचं, असं मनाशी पक्क केलं. ते काळवीट माझ्याकडे टक लाऊन बघत होते, मलाही त्या जंगली प्राण्याला पाहून छान वाटले. हळूहळू काळवीट आमच्या दिशेने येत होते. मी माझ्या पतिदेवांना ते दाखविण्याकरिता उठवण्याचा प्रयत्न केला. ते असे गाढ झोपले होते. काळवीट परत रस्त्याच्या खालच्या बाजूने उतरले. रोडच्या खालच्या बाजूला काय होते, याचा रात्री अंदाज येत नव्हता. पतीदेवांना तेव्हा खात्री पटली की, रात्रीचे येथे जंगली प्राणी वावरतात. त्यानंतर आम्ही दोघे काय झोपलोच नाही. ४.३० – ५ वाजेदरम्यान रस्त्यावर गाड्यांची आवक वाढली. हळूहळू बऱ्याच चारचाकी येत होत्या. काही लोक झाडाच्या बुंध्याशी मोठमोठ्याने गप्पा मारत बसले होते, तर काही लोक गाडीमध्येच झोपत होते. त्यांचा आवाज ऐकून मला हायसं वाटत होतं. मानव संघ करून राहतो ते स्वतःच्या सुरक्षिततेसाठी हे लहानपणी शिकले होते, ते आता प्रत्यक्षात समजले. ती रात्र आणि तो थरार अनुभव मी मनाच्या कोपऱ्यात कायमचा कोरून ठेवला आहे.

**(पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

---

# फरमॅटचे अंतिम प्रमेय

महाराष्ट्र टाइम्समध्ये ३०० वर्षे सोडवता न आलेले गणितातील 'फरमॅट्स लास्ट थेरम' हे प्रमेय ऑक्सफर्ड विद्यापीठातील सर अँड्र्यू वाइल्स यांनी सोडवल्याचे वृत्त आहे. त्याकरिता त्यांना ४,९५,००० पाउंडचे बक्षीस मिळाले आहे.

## काय आहे हे प्रमेय?

हे प्रमेय 'Fermat's Last Theorem' तसेच पूर्वी 'Fermat's Conjecture' या नावाने ओळखले जात होते. हे प्रमेय पुढीलप्रमाणे आहे:

Fermat's Last Theorem states that no three positive integers a, b, c satisfy the equation a + b = c for any integer value of n greater than 2.

म्हणजेच, n ची किंमत 2 पेक्षा जास्त असेल, तर a + b = c या समीकरणाला धन पूर्णांक a, b, c यांचा कोणताही solution set (उकल संच) अस्तित्वात नसतो.

आपणास माहीत आहे की, n = 1 आणि n = 2 करिता a, b, c यांच्या अनेक किमती असतात.

उदा. n = 1 असताना a + b = c या समीकरणासाठी अनेक धन पूर्णांक किमती मिळू शकतात.

तसेच n = 2 असताना $a^2 + b^2 = c^2$ या समीकरणासाठीही a, b आणि c यांच्या अनेक किमती मिळू शकतात, ज्यामुळे दोन्ही बाजूंना समान उत्तर मिळते.




परंतु, n ची किंमत 2 पेक्षा जास्त असेल, तर दोन्ही बाजू समान ठरतील असे धन पूर्णांक उत्तर अस्तित्वात असू शकत नाही. फरमॅट यांनी या विधानाची सिद्धता मात्र दिली नव्हती.

१९३७ नंतर अनेक विद्वान मंडळी यावर विचारविनिमय करत होती. n च्या काही विशिष्ट किमतींसाठी सिद्धता मिळत होती; परंतु गणितात अनंत संख्यांसाठी सर्वसाधारण उत्तर मिळणे आवश्यक असते. सर्व कसोट्यांवर प्रमेय टिकणे महत्त्वाचे असते.

**टीम आपलं मंत्रालय**

# माझे आजोळ : एक प्रतिकात्मक पंढरपूर

**जयश्री चंद्रकांत नाफडे**

आज मी आपणा सर्वांना एका प्रतिकात्मक पंढरपूरची आणि तेथील दैवी माणसांची कथा सांगणार आहे. खानदेशच्या कुशीतले चिंचखेड खुर्द. शेती, माती आणि लोकपरंपरेने नटलेले हे छोटेसे गाव. तिथला नेमाडे वाडा माझ्या बालपणीच्या आठवणींमध्ये शिलान्यासाप्रमाणे कोरलेला आहे. आयुष्याच्या प्रवासातील माझा पहिला मैलाचा दगडही कदाचित तिथूनच सुरू झाला.

माझी आजी–आजोबा म्हणजे माझ्यासाठी विठोबा–रखुमाई. त्यांच्या भोवती सतत नात्यांची पावले पडत असतात. कुणाचे गाऱ्हाणे, कुणाची तक्रार, कुणाचे दुःख...; पण हे आराध्य दैवत दोन प्रेमाचे शब्द बोलते आणि मायेच्या परीसस्पर्शाने मनातील वैफल्य दूर होते.

आजी म्हणजे या घराचा पाया, नीव आणि स्तंभ; आजोबा म्हणजे या घराची जमीन आणि छत्रछाया. आजोबा शब्दांपेक्षा डोळ्यांनी, अश्रूंनी आणि हावभावांनी अधिक बोलतात. त्यामुळे त्यांच्या मुद्रा मनावर कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. मामा म्हणजे देवघर आणि मामी म्हणजे तुळशी वृंदावन. या घरात येणाऱ्या प्रत्येकाला स्नेहाचे तीर्थ आणि आपुलकीचा प्रसाद मिळतो.



बालपणापासून आजीच्या आपुलकीच्या रांजणात सुखाचे दही समाधानाच्या रवीने घुसळून आनंदाचे ताक आम्ही पीत आलो. आजोबांच्या हातचे ज्वारीच्या भाकरीसोबतचे रोडगे, पीठपोळ्या, गोटी आंब्यांचा रस, भोंगये लाडू... या सगळ्यांपेक्षा गोड होता तो नात्यांचा मुरांबा. या घरातील नात्यांचा उत्सव काही वेगळाच असतो. प्रत्येक जण आपापली दुःखे बाजूला ठेवून हास्याच्या मैफिलीत सूर मिसळतो. आणि एखाद्या मनातील दुःखाचा सूर उमटला, तर गंगा–जमुनांचे लोट उसळतात. त्या अश्रूंमध्ये दुःख वाहून जाते आणि उरते ती फक्त माणसांची ऊब. या घराच्या अंगणात आनंदाचे झाड आहे. तसेच दुःखाची वेलही आहे. गेल्या सहा दशकांत आजी–आजोबांनी असंख्य पेचप्रसंग, आनंद, उत्सव, विवाह आणि अटीतटीचे प्रसंग पाहिले; पण एकमेकांची साथ कधीही न सोडण्याच्या वृत्तीने प्रत्येक प्रसंग निभावला. विवाहाला साठ वर्षे पूर्ण केलेले हे जोडपे आजही चेहऱ्यावर विलक्षण तेज घेऊन उभे आहे. त्यांच्या त्या तेजाच्या प्रकाशात तिसरी पिढीही आपला मार्ग शोधत आहे.

बालपणीची उन्हाळ्याची सुट्टी म्हणजे मामाकडे जाणे. आजच्या मॉल, वॉटर पार्क किंवा इतर सुखसोयींच्या जगापेक्षा त्या सुट्ट्या कितीतरी समृद्ध होत्या. झाडाखाली पडलेले ताजे आंबे, अखोजीचे झोके, आजी–मामीच्या हातचे पदार्थ, आजोबांनी आणलेले भातके, रणरणत्या उन्हात गावात येणारा कुल्फीवाला, लग्नातील वांग्याची भाजी–बेसन, धान पेरणे, धान विसर्जन... प्रत्येक गोष्ट आनंदाची होती.

मावशी आणि माझ्यात आजीसोबत लग्नाला जाण्याची चढाओढ असायची. कारण रुखवताची पुडी आणि खाऊचा रुपया मिळायचा! त्या एका रुपयात जे समाधान होते, ते आज लाखो रुपयांतही सापडत नाही. म्हणूनच कदाचित मन म्हणते–बालपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा. मावशींच्या लग्नात नथ घालून, सुबक लुगडे नेसून लग्नाच्या सामानाच्या पेटीजवळ बसलेली आजी आजही डोळ्यांसमोर आहे. मुला–नातवंडांवर तिची नजर सीसीटीव्हीपेक्षाही तीक्ष्ण असायची. विवाहातील छोट्या–छोट्या परंपरांपासून प्रत्येकाच्या काळजीपर्यंत तिचे लक्ष असे आणि तिच्या सोबतीला पांढरा सदरा, फट्टक धोतर आणि काळी टोपी घातलेले अस्सल शेतकरी रूपातील आजोबा. देव शोधायला मंदिरातच जाण्याची गरज आहे का? कधी–कधी तो आपल्या अगदी जवळ उभा असतो.

गावाकडचे शेत, मळा, विहिरीच्या मोटारीच्या पाण्यातली आंघोळ, गाई–म्हशीचे दूध, उन्हाळ्यातील वाळवणाच्या गप्पा... त्या साध्या जगण्यातला आनंद आजच्या सुखसोयींमध्ये कुठेच सापडत नाही. झाडाखालच्या निंबोल्या वेचणे, बोरं जमा करून बोरकुट करणे, मेंदीचा पाला पाट्यावर वाटून हातावर काढणे, हापशीवरून पाणी आणणे, सारवण्यासाठी शेण गोळा करणे, कुड मातीने लिंपणे, चूल सारवणे, चुलीवर भाकरी करणे. या सगळ्या खट्याळ आठवणी आजही ओठांवर हसू आणतात. धानाची पूजा, शेतातील परंपरा, रोडगे, खिचडी, उसळ, कीर्तन, बारसे, पाचवी, ओटभरण, लग्नघाई या सगळ्या प्रसंगांतून नकळत आमच्या मनाला वळण मिळाले. पावसाची आतुरतेने वाट पाहणे आणि वाऱ्याने कुणाचे घर उडून गेले, तर आपल्या भाकरीतील चतकोर आणि घरातील उबदार कोपरा देणे. हीच तर त्या पिढीची खरी श्रीमंती होती.

आज त्या काळातील अनेक गोष्टी अस्तित्वात नाहीत; पण आठवणींच्या कप्प्यात त्यांचा सुगंध अजूनही ताजा आहे. मेंदीचा वास, चुलीचा धूर, मातीचा गंध, आंब्यांची चव, विहिरीच्या पाण्याची थंडगार धार आणि माणसांच्या मायेची ऊब. हे सगळे आजही मनाच्या कोपऱ्यात जिवंत आहे. बालपण हातातून निसटून गेले. एखाद्या वाळूच्या किल्ल्यासारखे; पण त्या किल्ल्याची माती अजूनही हाताला लागलेली आहे. म्हणूनच माझे आजोळ हे केवळ एक घर नाही. ते माझ्यासाठी एक प्रतिकात्मक पंढरपूर आहे. तिथे देव दगडात नाही; तो आजीच्या मायेतील स्पर्शात आहे, आजोबांच्या डोळ्यांत आहे, मामाच्या कर्तव्यभावनेत आहे, मामीच्या आपुलकीत आहे, मावशींच्या माहेरओढीत आहे आणि आम्हा नातवंडांच्या आठवणीत आहे.

*या पंढरपूरची वारी आयुष्यभर चालू राहावी, एवढीच इच्छा.*

**(स्वेच्छा सेवानिवृत्त प्रतिवेदक (वरिष्ठ), विधान भवन, मुंबई.)**

*'वेगळ्या वाटा' या सदरातून शासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या पाल्यांनी पारंपरिक करिअरच्या चौकटीबाहेर जाऊन विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा परिचय करून दिला जातो. 'वेगळ्या वाटे'वर यशस्वीपणे वाटचाल करणाऱ्या क्रांती पाटील या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात कार्यरत युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांच्या कन्या आहेत. त्यांनी मानसशास्त्रासारख्या संवेदनशील आणि माणसाच्या मनाचा वेध घेणाऱ्या क्षेत्राची निवड केली.*

# वेध मनाचा...

**क्रांती पाटील**



शासकीय सेवेत कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी पारंपरिक करिअरच्या चौकटीबाहेर जाऊन आपल्या आवडीच्या आणि कौशल्याच्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. अशाच 'वेगळ्या वाटे'वर यशस्वीपणे वाटचाल करणाऱ्या क्रांती पाटील या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात कार्यरत युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांच्या कन्या आहेत. त्यांनी मानसशास्त्रासारख्या संवेदनशील आणि माणसाच्या मनाचा वेध घेणाऱ्या क्षेत्राची निवड केली. सायकॉलॉजिस्ट म्हणून व्यावसायिक ओळख निर्माण करताना त्या सध्या ऑनलाइन समुपदेशनाच्या माध्यमातून विविध व्यक्तींना मानसिक व भावनिक समस्यांवर मार्गदर्शन करीत आहेत. त्याचबरोबर सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातून पीएच.डी.चे संशोधन सुरू असून, पुण्यातील नामांकित अशा आबासाहेब गरवारे महाविद्यालयात साहाय्यक प्राध्यापक म्हणून पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मानसशास्त्र विषय शिकवत आहेत. नुकत्याच त्या नेट परीक्षेत सहायक प्राध्यापक म्हणून पात्र झाल्या आहेत. त्यांच्याविषयी अधिक जाणून घेऊ या...

### प्रश्न : मानसशास्त्र हेच क्षेत्र करिअरसाठी निवडण्यामागची नेमकी प्रेरणा काय होती? पारंपरिक करिअरच्या वाटांपेक्षा वेगळी वाट निवडावी, असे कधी आणि का वाटले?

**क्रांती :** मानसशास्त्राकडे वळण्यामागे सर्वांत महत्त्वाची प्रेरणा म्हणजे माणसाला समजून घेण्याची माझी नैसर्गिक उत्सुकता. प्रत्येक व्यक्तीची विचार करण्याची पद्धत, भावनिक प्रतिक्रिया आणि परिस्थितीकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. बाहेरून एखादी व्यक्ती आनंदी किंवा आत्मविश्वासू दिसत असली, तरी तिच्या मनात नेमके काय सुरू आहे, हे आपल्याला नेहमीच कळत नाही. या 'मनाच्या जगाबद्दल' मला कायम कुतूहल वाटत आले.

करिअर निवडताना केवळ चांगली नोकरी किंवा निश्चित उत्पन्न यापेक्षा आपल्याला कोणते काम अर्थपूर्ण वाटते आणि त्या कामातून दुसऱ्यांच्या आयुष्यात काही सकारात्मक बदल घडवून आणता येतो का, हा विचार माझ्यासाठी महत्त्वाचा होता. त्यामुळे मानसशास्त्राची निवड केवळ 'वेगळी वाट' म्हणून केली नाही, तर माझ्या आवडीशी आणि व्यक्तिमत्त्वाशी जुळणारे क्षेत्र म्हणून केली.

आज एखादी व्यक्ती आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करू शकते, स्वतःकडे नव्या दृष्टिकोनातून पाहू लागते किंवा एखाद्या अडचणीचा सामना करण्यासाठी तिला दिशा मिळते, तेव्हा आपण निवडलेला मार्ग योग्य असल्याची जाणीव होते.

### प्रश्न : आपल्या करिअरच्या निर्णयाला कुटुंबीयांचा प्रतिसाद कसा होता? त्यांच्याकडून मिळालेला कोणता सल्ला किंवा प्रोत्साहन आपल्यासाठी महत्त्वाचे ठरले?

**क्रांती :** माझ्या करिअरच्या निर्णयाला कुटुंबीयांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. विशेषतः माझ्या वडिलांनी माझ्या निर्णयाकडे केवळ 'करिअरची निवड' म्हणून न पाहता, माझी आवड आणि क्षमता कोणत्या क्षेत्रात आहे, याला महत्त्व दिले. त्यांचा एक सल्ला मला नेहमीच महत्त्वाचा वाटतो. आपण कोणतेही क्षेत्र निवडले, तरी त्यात सातत्याने शिकत राहिले पाहिजे आणि आपल्या कामाशी प्रामाणिक राहिले पाहिजे. केवळ पदवी मिळवणे म्हणजे शिक्षण पूर्ण होणे नाही; प्रत्यक्ष जीवनातील अनुभवातून शिकण्याची प्रक्रियाही तितकीच महत्त्वाची आहे.

कुटुंबाकडून मिळालेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी ताकद होती. 'लोक काय म्हणतील?' यापेक्षा 'मला काय करायचे आहे आणि ते प्रामाणिकपणे कसे करता येईल?' याचा विचार करण्याचे स्वातंत्र्य मिळाले, हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचे ठरले.

### प्रश्न : मानसशास्त्रात करिअर करण्यासाठी बारावीनंतर कोणता शैक्षणिक मार्ग निवडता येतो?

**क्रांती :** बारावीनंतर मानसशास्त्र विषय घेऊन पदवीचे शिक्षण घेणे हा या क्षेत्रात प्रवेश करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. त्यानंतर मानसशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण घेऊन आपल्या आवडीच्या शाखेत विशेष अभ्यास करता येतो. मानसशास्त्र हे व्यापक क्षेत्र आहे. क्लिनिकल सायकॉलॉजी, काउंसलिंग सायकॉलॉजी, इंडस्ट्रियल/ऑर्गनायझेशनल सायकॉलॉजी, शैक्षणिक मानसशास्त्र अशा विविध शाखांमध्ये कामाच्या वेगवेगळ्या संधी आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ एखादा अभ्यासक्रम निवडण्यापेक्षा भविष्यात मानसशास्त्राच्या कोणत्या शाखेत काम करायचे आहे, हे आधी समजून घेणे महत्त्वाचे आहे.

तसेच व्यावसायिक क्षेत्रात प्रत्यक्ष काम करण्यापूर्वी संबंधित शैक्षणिक पात्रता, प्रशिक्षण आणि लागू असलेल्या व्यावसायिक व नियामक नियमांची माहिती घेणे आवश्यक आहे.

**प्रश्न : पदवीसोबत विद्यार्थ्यांनी कोणत्या अतिरिक्त कौशल्यांवर भर द्यावा?**

**क्रांती :** मानसशास्त्र हे केवळ पुस्तकी ज्ञानाचे क्षेत्र नाही. त्यामुळे पदवीसोबत प्रत्यक्ष कामासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ऐकण्याची क्षमता. समोरची व्यक्ती काय सांगतेय, एवढेच नव्हे तर ती काय सांगू शकत नाहीये, हेही समजून घेण्याचा प्रयत्न करावा लागतो. त्यासाठी संयम, सहानुभूती आणि कोणताही पूर्वग्रह न ठेवता समोरच्या व्यक्तीकडे पाहण्याची वृत्ती आवश्यक आहे.

यासोबतच संवादकौशल्य, निरीक्षणशक्ती, भावनिक बुद्धिमत्ता, विश्लेषणात्मक विचार, संशोधनाची सवय आणि सतत नवीन ज्ञान आत्मसात करण्याची तयारी या गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

आजच्या डिजिटल युगात ऑनलाइन संवादाचे कौशल्य, डिजिटल प्लॅटफॉर्मचा योग्य वापर आणि त्यासोबतच गोपनीयता व व्यावसायिक नैतिकतेची जाणीव असणेही तितकेच आवश्यक आहे.

**प्रश्न : 'सायकोलॉजिस्ट' आणि 'काउन्सेलर' या दोन्ही भूमिकांबाबत समाजात अनेकदा संभ्रम असतो. या दोन्हींमध्ये नेमका फरक काय आहे?**

**क्रांती :** दोन्ही क्षेत्रांचा केंद्रबिंदू माणसाचे मानसिक आणि भावनिक स्वास्थ्य असला, तरी त्यांच्या भूमिका आणि प्रशिक्षणात फरक असू शकतो. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, काउंसलिंगमध्ये व्यक्तीला तिच्या भावनिक, वैयक्तिक, शैक्षणिक, नातेसंबंधातील किंवा जीवनातील अडचणी समजून घेण्यास आणि त्यावर स्वतः उपाय शोधण्यास मदत केली जाते.

'सायकोलॉजिस्ट' ही व्यापक संज्ञा आहे. मानसशास्त्राचा अभ्यास केलेले व्यावसायिक त्यांच्या प्रशिक्षणानुसार समुपदेशन, मानसशास्त्रीय मूल्यमापन, संशोधन, अध्यापन, संस्थात्मक मानसशास्त्र अशा विविध क्षेत्रांत काम करू शकतात. मात्र प्रत्येक मानसिक समस्या केवळ काऊंसलिंगने सोडवता येते असे नाही. गंभीर मानसिक आजार किंवा अशा स्वरूपाच्या परिस्थितीत मानसोपचारतज्ज्ञ किंवा संबंधित पात्रताधारक मानसिक आरोग्य व्यावसायिकांची मदत घेणे आवश्यक असते. त्यामुळे आपल्या गरजेनुसार योग्य व्यावसायिकाकडे जाणे सर्वांत महत्त्वाचे आहे.

**प्रश्न : मानसशास्त्राच्या क्षेत्रात करिअरच्या संधी आणि भविष्यातील रोजगाराच्या शक्यता कशा आहेत?**

**क्रांती :** मानसशास्त्राच्या क्षेत्रात भविष्यात मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होत आहेत. पूर्वी मानसशास्त्र म्हटले की, रुग्णालय किंवा क्लिनिक एवढीच मर्यादित कल्पना होती. आता ही परिस्थिती बदलली आहे.

शाळा-महाविद्यालये, कॉर्पोरेट संस्था, मानवी संसाधन व्यवस्थापन, शिक्षण क्षेत्र, संशोधन, सामाजिक संस्था, पुनर्वसन, क्रीडा मानसशास्त्र, करिअर मार्गदर्शन आणि ऑनलाइन मानसिक आरोग्य सेवा अशा अनेक क्षेत्रांत मानसशास्त्राच्या ज्ञानाची गरज आहे.

आजच्या वेगवान जीवनशैलीत ताणतणाव, नातेसंबंधातील समस्या, करिअरविषयक संभ्रम, एकटेपणा, कामाचा ताण आणि भावनिक अडचणी याबाबत लोक अधिक मोकळेपणाने बोलू लागले आहेत. मानसिक आरोग्याबाबतची जागरूकता वाढत आहे आणि त्याबरोबर प्रशिक्षित व्यावसायिकांची गरजही वाढत आहे. मात्र या क्षेत्राकडे केवळ रोजगाराची संधी म्हणून न पाहता, त्यातील जबाबदारी आणि व्यावसायिक नैतिकता समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

**प्रश्न : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे मानसशास्त्राच्या क्षेत्रातील कामाच्या पद्धतींमध्ये कोणते बदल होत आहेत?**

**क्रांती :** डिजिटल तंत्रज्ञानामुळे मानसशास्त्र आणि समुपदेशनाच्या क्षेत्रात निश्चितच मोठे बदल होत आहेत. ऑनलाइन काऊंसलिंगमुळे भौगोलिक अंतराची अडचण कमी झाली आहे. एखाद्या व्यक्तीला प्रत्यक्ष भेटणे शक्य नसले, तरी योग्य परिस्थितीत डिजिटल माध्यमातून संवाद साधता येतो. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर भविष्यात संशोधन, माहितीचे विश्लेषण, प्रशासकीय कामे, नोंदी व्यवस्थापन आणि काही प्राथमिक डिजिटल साधनांमध्ये वाढू शकतो. त्यामुळे मानसशास्त्र क्षेत्रातील व्यावसायिकांनी तंत्रज्ञानापासून दूर राहण्याऐवजी ते समजून घेणे आणि त्याचा जबाबदारीने वापर करणे गरजेचे आहे; पण एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. एआय माणसाची जागा घेऊ शकत नाही, विशेषतः भावनिक समज, सहानुभूती, मानवी नातेसंबंध आणि व्यावसायिक निर्णयांच्या बाबतीत. तंत्रज्ञान हे साहाय्यक साधन असू शकते; मात्र अंतिम मानवी संवाद आणि व्यावसायिक जबाबदारीची जागा त्याने घेऊ नये.

ऑनलाइन समुपदेशन करताना गोपनीयता, माहितीची सुरक्षितता आणि व्यावसायिक मर्यादांचे पालन करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

**प्रश्न : पुढील काळात मानसशास्त्राच्या क्षेत्रात आपली कोणती स्वप्ने किंवा ध्येये आहेत? तसेच या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांना आपण काय संदेश द्याल?**

**क्रांती :** पुढील काळात मानसशास्त्राच्या क्षेत्रात अधिक सखोल ज्ञान आणि अनुभव मिळवणे हे माझे प्रमुख ध्येय आहे. ऑनलाइन समुपदेशनाच्या माध्यमातून वेगवेगळ्या पार्श्वभूमीच्या व्यक्तींशी संवाद साधताना मला खूप काही शिकायला मिळते. भविष्यात मानसिक आरोग्याबाबतची जागरूकता वाढवणे आणि लोकांना त्यांच्या भावनिक अडचणींबद्दल मोकळेपणाने बोलण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने काम करण्याची माझी इच्छा आहे. या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या तरुणांना मी एवढेच सांगेन की, करिअर निवडताना केवळ 'कुठे जास्त पैसा आहे?' हा प्रश्न विचारू नका; त्यासोबत 'मला कोणते काम मनापासून करावेसे वाटते?' हा प्रश्नही स्वतःला विचारा. वेगळी वाट निवडणे म्हणजे केवळ पारंपरिक वाट सोडणे नव्हे. आपल्या आवडीच्या क्षेत्रात सातत्याने शिकत राहणे, स्वतःची क्षमता विकसित करणे आणि त्या क्षेत्रात प्रामाणिकपणे योगदान देणे म्हणजे खऱ्या अर्थाने वेगळी वाट निवडणे.

मानसशास्त्र हे माणसाच्या मनाशी जोडलेले क्षेत्र आहे. त्यामुळे संवेदनशीलता, संयम, शास्त्रीय दृष्टिकोन आणि सतत शिकण्याची वृत्ती या चार गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आपल्या आवडीची दिशा स्पष्ट असेल आणि त्या दिशेने सातत्याने प्रयत्न करण्याची तयारी असेल, तर पारंपरिक चौकटीबाहेरची वाटही निश्चितपणे यशाची वाट ठरू शकते.

**शब्दांकन : शैलजा पाटील,** सहायक संचालक, महाराष्ट्र शासन.

# त्रिशुली आणि गंडकीच्या प्रलयाच्या निमित्ताने...

**ब्रिजकिशोर झंवर**

***नेपाळमधील नद्यांनी तिबेटच्या सीमेपासून अचानक घेतलेल्या रौद्ररुपाने प्रचंड हानी झाल्याची घटना नुकतीच घडली. या घटनेमुळे मे महिन्यातील आमच्या कौटुंबिक नेपाळ दौऱ्याची आठवण ताजी झाली, ज्या प्रवासात 'त्रिशुली' आणि 'गंडकी' नद्यांनीही आमच्यासोबत खेळकरपणे खळखळाट करत प्रवास केला होता. त्रिशुली आणि गंडकीच्या आताच्या या प्रलयाच्या निमित्ताने ही आठवण...***

वर्षातून एकदा कौटुंबिक सहल हा आमच्या कुटुंबाचा बंद पडलेला संकल्प कोरोनानंतर या वर्षी प्रथमच देशाबाहेरच्या पहिल्यावहिल्या नेपाळ दौऱ्याने पुन्हा सुरू झाला. मे महिन्यातील माझ्या लग्नाची वर्षपूर्ती याच प्रवासात कुटुंबासोबत साजरी करण्याचीही संधी या निमित्ताने दरवर्षी साधली जात होती. यावर्षी या प्रवासाची सुरूवात वर्षपूर्तीच्या दिवसाचा योग साधून आयुष्यातल्या पहिल्या विमान प्रवासाने केली. एरवी व्हीआयपींच्या स्वागत आणि निरोपासाठी एअरपोर्टवर जाणारा मी यावेळी मात्र स्वत:साठी व्हीआयपी झालो होतो. विमानात बसण्याचे स्वप्न पहिल्यांदा साकारत रनवेवरून धावणाऱ्या विमानातून टी-टूची इमारत मागे टाकत कधी आकाशात झेपावलो आणि जुहूचा समुद्र, गोराईचा पॅगोडा ही ओळखीची चिन्हे मागे सोडून कधी ढगांच्या पुंजक्यात शिरलो हे समजलेच नाही.



नेपाळला जवळ असलेले दरभंगा विमानतळ आणि तेथून कुटुंबातल्या २३ सदस्यांसोबत सुरू झालेला प्रवास जनकपूर आणि काठमांडूनंतर उंच डोंगर आणि खोल दऱ्यांमधून हृदयात एक एक आठवण कोरत पुढे सरकत होता. या प्रवासात काठमांडूनंतर आमची साथ द्यायला होती त्रिशुली नदी... हो तीच नदी, ज्या नदीने काही दिवसांपूर्वी नेपाळमध्ये आपल्यासोबत महाप्रलय आणला होता. मे महिना असल्याने आमच्या प्रवासात नदीचे पात्र पूर्ण भरलेले नसले तरीही तिच्या खळाळत्या आवाजाने तिने आम्हाला सोबत केली होती.

काठमांडू ते पोखरा या मार्गावरील बसच्या प्रवासात प्रत्येक वळणावर त्रिशुली आमच्याशी लपंडाव खेळत होती. काही ठिकाणी तर तिचे पात्र तिचा प्रचंड आवाका दाखवून देत होते. पाऊस पडल्यानंतर उंच डोंगर-कपाऱ्यांमधून वाहणारे पाणी जेव्हा या पात्रात मिसळले जाईल, तेव्हा याच नदीचे रूप कसे असेल, याची तेव्हाच कल्पना आली होती. या प्रवासादरम्यान मनोकामना देवीच्या दर्शनासाठी रोप-वेमधून जाताना उंचावरून पाहिलेले या नदीचे मोहक रूप तर मनात घर करून गेले होते. पुढे पश्चिमेकडे जाताना त्रिशुलीनंतर पोखराजवळ गंडकी नदीने त्रिशुलीची उणीव भासू दिली नव्हती. त्रिशुलीने नुकत्याच आणलेल्या विनाशामध्ये गंडकीनेदेखील थोडाफार हातभार लावला होता, हेही विशेष.

गंडकीचे आणखी एक रूप पोखरावरून उत्तरेकडे जॉमसम आणि पुढे मुक्तिनाथ क्षेत्राकडे जाताना पाहायला मिळाले. अन्नपूर्णा पर्वतरांगांमधील या नदीचे पाणी उगमापासूनच काळे आणि गढूळ असल्याने तिला 'काली गंडकी' नाव पडले आहे. या काली गंडकीच्या वेगवेगळ्या आख्यायिका असल्या तरीही तिचे अक्राळ-विक्राळ पसरलेले आणि काळ्या पाण्याचे रूप पाहून कुणाच्याही मनात धडकी भरल्याशिवाय राहत नाही. नेपाळमधील प्रवास जसा पर्वतरांगा आणि दऱ्याखोऱ्यांमधून होतो, तसाच तो या नद्यांच्या सहवासानेही सुखावह होतो; परंतु निसर्गाचे हे रूप आपल्याला जितके आकर्षित करून जाते, तितकेच ते भयावहदेखील वाटते.

या प्रवासात आणखी एक बाब सुखावह वाटली, ती म्हणजे पर्वतरांगा असूनही त्यातील रस्ते अनपेक्षित आणि कमालीचे चांगले बनवण्यात येत आहेत. स्थानिकांमध्ये या रस्त्यांसाठी चीनने किंवा जपानने मदत केली असल्याबाबत मतभेद आहेत. त्यामध्ये न जाता पर्यटकांच्या दृष्टिकोनातून मात्र ही सकारात्मक बाब आहे, असेच मी म्हणेन.

पूर्वी अतिशय कठीण समजला जाणारा नेपाळच्या पर्वतरांगांमधील प्रवास चांगल्या रस्त्यांमुळे आता जसा सुखकर होत आहे, तसाच भयावह ठरणाऱ्या नद्यादेखील आपले रौद्ररूप सौम्य करतील, अशी आशा करायला हरकत नाही. अर्थात, त्यासाठी आता झालेल्या विनाशाचे कारण लक्षात घेता आधी मानवालादेखील निसर्गाशी कसे वागावे, याची सुबुद्धी येईल, असा विश्वास आहे.

**(विभागीय संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन.)**

# पक्षी आपले सोबती...

**प्रशांत सातपुते**

माणूस आधी की, पक्षी आधी? या प्रश्नाचे उत्तरदेखील कोंबडी आधी की, अंडे आधी? याप्रमाणेच कदाचित असावे. माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. निसर्गाचा तो एक घटक आहे आणि पक्षी हे त्याचे सोबती आहेत. बालपणापासून एक घास चिऊचा या आईच्या भरविण्यापासून माणसाची पक्ष्यांबरोबरेची ओळख सुरू होते. ते माणूस गेल्यानंतर त्याच्या पिंडाला स्पर्श करण्यासाठीदेखील हुशार कावळा हादेखील पक्षीच लागतो. माणसाच्या घरात, परिसरात, त्याच्या वस्तीजवळ अनेक नेहमीचे सरावलेले पक्षी आढळतात. यात सर्वसाधारणपणे कावळा, चिमणी, कबुतर, पोपट, साळुंखी, घार, टिटवी या नेहमीच्या सोबत्यांबरोबर काही विविध रंगांचे पक्षीही दिसतात.

## रानपिंगळा

बहुतेकजण पिंगळ्यालाच घुबड मानतात. साक्षात लक्ष्मीमातेचे वाहन असणारे घुबड आजही अशुभ मानले जाते. घुबड, गव्हाणी घुबड, पिंगळा-रानपिंगळा हे मानवाचे विशेषतः शेतकऱ्यांचे मित्र आहेत. उंदीर हे यांचे आवडते खाद्य असल्याने मोठ्या प्रमाणात उंदरांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्याचे ते काम करतात. तसे तो पाली, सरडे याच्यावरही छान ताव मारतो. मादी ही नरापेक्षा मोठी असते. अंडी उबवून पिलांचे संगोपन दोघेही करतात.



खरंतर पिंगळा-रानपिंगळा हा घुबड संवर्गातील पक्षी! छोटेखानी घुबडच! घुबडापेक्षा आकाराने छोटा असतो. असो...

पिंगळ्याची जोडी नितांतपणे रात्रीच्या काळोखात भाकणूक करताना अनेकवेळा जाणवते. असे हे रानपिंगळे मला भटकंतीत अनेकवेळा आढळले आहेत. अगदी इंदोरजवळील शिरपूर तलावाला खास पक्षी निरीक्षण करताना, माणसाप्रमाणे डोळे मिचकवणारा रानपिंगळा पाहायला मिळाला. ग्रामसंस्कृती जागवणारे, कुडबुडे जोशी पिंगळे माझ्या लहानपणी गल्लीत यायचे. डोक्याला पटका, अंगात तीन बटणी शर्ट, त्यावर कळकटलेला कोट, खाली पांढरे पायघोळ धोतर, पायात जडशीळ कातडी वहाणा, काखेत धान्य गोळा करायला असणारी खास वाकळेच्या पांढऱ्या दोऱ्याने शिवलेली पिशवी आणि उजव्या हातात अगदी छोटा डमरू हे वाद्य असे. हा हातातील वाद्य वाजवत विशिष्ट लयीत भाष्य करत दारात आला, म्हणजे भीती वाटायची. घरात बाळंतीण असेल, तर आणखीनच पाचावर धारण बसायची. याविषयी विनाकारण त्यावेळी अनेक समजुती-गैरसमजुती होत्या.

पिंगळा पक्ष्याची भाषा याला म्हणे समजायची. त्यावरच हा मानवी वस्तीत येऊन भविष्य सांगून आपला उदरनिर्वाह करायचा, असे लहानपणी मोठ्या माणसांच्या तोंडातून अनेकदा ऐकलेले. शिवाय पिंगळ्या पक्षाला दारू पाजून त्याच्याकडून भविष्य काढून घेण्याची कला याला अवगत असायची म्हणे. यात जरा जरी चूक झाली वा ही कला उलटली तर, पिंगळ्याचा साक्षात मृत्यू ठरलेला. ही आख्यायिका आणि तोंडी लावायला वर सांगितली जायची. लहानपणी ऐकताना हे सारे खरे अन् भीतीदायक वाटायचे. असल्या गोष्टी सांगायला आणि ऐकायला रात्रच साक्षीला असायची. अगदी कधीतरी दिवा, चिमणी वा कंदील तेवढा बारीकपणे तेवत असायचा. विश्वाच्या परिवर्तनाच्या जगरहाटीत हा ग्रामीण संस्कृतीचा, लोकपरंपरेचा कला प्रकार केव्हाच गडप झाला.

इंदोरजवळील कनाडिया येथील एका शेतात फिरता-फिरता एक डेरेदार आंब्याचे झाड दिसले. खरंतर सूर्यास्त टिपायला मी सौ. बरोबर इथे आलो होतो; पण या झाडाजवळून जाताना कोणत्या तरी पक्ष्यांची फडफडाट ऐकू आली. या फांदीवरून त्या फांदीवर पाच-सहा पक्षी एकदम उडाले. जवळ जात अगदी झाडाच्या विरुद्ध दिशेला खोडांवर पाहिल्यावर समजले. या ढोलीत रानपिंगळ्यांची वस्ती नक्की असणार. बारकाईने पाहताच त्यांची संपूर्णपणे वसाहतच दिसली. पानांच्या, फांदीच्या आडोशाने माझ्याकडे नजर रोखून कितीतरी आई-बाबा पिलांना नवे प्रशिक्षण देत होते.

सूर्यास्त टिपून परतलो. उद्या दिवसाउजेडी पुन्हा भेट द्यायचे ठरवूनच! सकाळी उन्हात पुन्हा या रानपिंगळ्यांच्या वसाहतीला म्हणजेच आंब्याच्या झाडाला पाहायला आलो, तर चक्क सगळे उन्हं अंगावर घेत, खात पूर्वेकडे विविध ठिकाणी बसून होते. माझी चाहूल आधीच त्यांना लागलेली. कालच्या माझ्या भेटीने आज बहुतेक ते जरा सरावलेले दिसले. अगदी मोजकी हालचाल वगळता ते माझ्याकडे टवकारून फांदीवर बसून होते. मध्येच १८० अंश कोनात मान वळवून पुन्हा मान पुढे काढून माझ्यावर नजर ठेवून होते.

कितीतरी वेळ हा खेळ चालूच होता. एव्हाना दोन-चार खारुटी, एखादा राबीन आणि दोन-चार साळुंख्या हा मजेशीर डाव पाहत शांतपणे बसून होत्या. अचानकपणे मला निलपंखी दिसला तसा मी त्याच्यामागे धावलो. तसा सरावलेल्या रानपिंगळ्यांनी माझ्या बाजूच्या फांदीवर धाव घेत मला विशिष्ट साद घातली. कदाचित तेही फोटोसेशनसाठी आणखी उत्सुक असावेत.. असेच काहीसे म्हणा हवे तर..! काही का असेना... लक्ष्मीमातेचे वाहन असणाऱ्या या 'शुभ' पक्ष्याचे दर्शन व्हायलाही तेवढेच भाग्य लागते..एवढं नक्की!

## नीलिमा

साधारणपणे चिमणीपेक्षा थोडा लहान आकाराचा हा पक्षी आहे. यातील नर पाठीकडून निळा असतो. पोटाकडे पांढरा, गळा व छातीचा भाग तांबूस, खांद्यावरचा काही भाग आणि भुवया आकाशी रंगाच्या असतात. मादी ही नरापेक्षा फिकट रंगाची असते. सतत जागोजागी

फिरत राहण्याच्या सवयीमुळे याला नर्तक पक्षी म्हणूनही ओळखतात. भारतासह श्रीलंका, म्यानमार, इंडोनेशिया देशातही आढळतो. रंग आणि आकाराच्या तपशीलात थोडा फरक असलेल्या याच्या उपजाती आहेत. दमट पानगळीची जंगले, सदाहरित जंगले, लहान झुडपी जंगले आणि बांबूच्या जंगलात वास्तव्य असते. उडते कीटक खाण्यात हा पटाईत आहे.



## प्रवासातील पक्षी अन् वृक्ष

माता वैष्णोदेवीच्या यात्रेबरोबरच काश्मिर पर्यटनात असेच आपले सोबती मला भेटले. इंदोर ते जम्मू रेल्वे प्रवासात हिंदी चित्रपटातून नेहमीच पाहिलेली पिवळी जर्द 'सरसों की खेती' असावी असे वाटत होते; परंतु ती सूर्यफुलाची शेती पाठीमागे धावत होती. जम्मू येथे सुरुवातीलाच काली माता मंदिर परिसरात वानरसेनेने सलामी देत आमचे स्वागत केले होते. अगदी वाहनाच्या टपावरील प्लास्टिक कागद उचकटून! कुठेही पर्यटनाला जा, तेथे हे आपले वंशज आपल्या स्वागताला दत्त असतातच. हा अनुभव नवा नाही.

पर्वत शृंखलेत उंच सरळ रेषेत वाढलेला देवदार हा तेथील कामन वृक्ष आढळतो. त्यापासून बट बनवली जाते. शिवाय डेरेदार पसरलेला चिनार हादेखील नित्याचाच बनलेला. फर, पाईन ही वृक्षसंपदाही सोबतीला ठरलेली आहे. सफरचंदाची शेती ही तेथील प्रमुख उत्पन्न देणारी शेती आहे. झाडावर लगडलेली लाल सफरचंद पाहायचा खरा हंगाम सप्टेंबर-ऑक्टोबरचा असतो. सफरचंदाच्या या बागेत फोटो घेण्यासाठी शेतकरी १०-२० रुपये शुल्क आकारतो. केशराच्या प्रत्येक फुलातील पुंकेसर म्हणजेच केशर होय. या महागड्या केशरने मोठा रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

इमारतीच्या प्रांगणात वा अन्य रस्त्यांकडेला विविध रंगांचे कश्मिरी गुलाब हे आणखी एक इथलं वैशिष्ट्य आहे. दल सरोवराच्या भोवतीने हे पांढरट, पिवळसर, गुलाबी टपोऱ्या गुलाबांचे ताटवेच्या ताटवे दिसतात.

शंकराचार्यांच्या मंदिराकडे जाताना अशाच गुलाबातील मकरंद गोळा करताना मधमाशी दिसली. पुढे ती मुघल गार्डनमधील टुलीपवर्गीय फुलातील मकरंद घेतानाही आढळली.



ज्यावेळी मधमाशी या जगातून संपेल, त्यानंतर अवघ्या चार वर्षांनंतर मनुष्य जातीचे अस्तित्वच संपुष्टात येईल. असे अल्बर्ट आइनस्टिन म्हणतो. सपुष्प वनस्पतींना मधमाशीचा होणारा स्पर्श हा परिस स्पर्शापेक्षा कमी नसतो. फल धारणेसाठी पर परागीकरणात महत्त्वाची भूमिका पार पाडत असते.

हे मंदिर उतरून येताना जापनीज टीट हा पक्षी दिसला. डोके, गळा आणि छाती पूर्ण काळे तर, चेहऱ्याच्या दोन्ही बाजू पांढऱ्या शुभ्र होत्या. पंख, शेपूट अणि पाठीकडील भाग राखाडी तर, पोटाकडील भाग पांढरट होता. मानेभोवती काळी कडा होती.

शासनाच्या फूलशेती विभागाच्या नेहरू स्मारक वनस्पती बागेच्या दारातच गरूड फांदीवर बसलेला. शिकाऱ्यातून दल सरोवराचा फेरफटका मारतानाही घार आणि गरूड पाहायला मिळालेत. अगदी तेथील पाणकोंबडींच्या पिलांवर नजर ठेवून असलेले.

दल सरोवर हे पक्ष्यांची मेजवानी ठरलेले. ध्यानस्तपणाचे सोंग घेतलेले गायबगळे इथेही दिसले. बदक आणि पाणकोंबड्या आपल्या पिलांसह विहरताना अन्न साखळीतील टपलेल्या घारी आकाशात घरघरत होत्या, तर हाऊसबोटीत आपल्या हालचालीने जागे करणारी बर्न स्वालो अर्थात निळी, जांभळी, तपकिरी, काळसर, राखाडी, पांढरट छटेची आणि शेपटीला दोन तारा असणारी पाकोळी भेटली. उगीचच इकडून तिकडे पाण्यावर भिरभिरत होती. सूर्योदयात ती अधिक चमकदार दिसत होती.



सिंधू नदीच्या काठावर चहा-पानसाठी थांबल्यावर जंगली मैना अर्थात साळुंखी बिनधास्तपणे जवळून कटवाक करत होती. कोवळ्या आक्रोडाची झाडे तर, हॉटेलभोवतीच पाहायला मिळालीत.

पश्मिना बकरा गुणी 'सलमान'सोबत फोटोसेशनसाठी आम्ही पर्यटक पैसे देत उत्सुकलेलो. कटरा येथे माता वैष्णोदेवीच्या दर्शनाला जाताना पुन्हा वानरसेना होतीच. शिवाय ती बिनधास्तपणे यात्रेकरूंजवळ वावरत होती.

या ठिकाणी हरीण आणि जंगलात राहणारा हिमालयीन कालीज तितर दिसला. तकतकीत निळसर-काळा पिसारा असलेला, डोक्यावर तुरा, डोळ्याभोवती लाल रंग, पोट अणि छातीकडे पांढरट राखाडी पिसांचा देखणा तितर प्रथमच कितीतरी वेळ पाहत होतो.

कटराहून इंदोरकडे परतीच्या प्रवासात विशेष करून पंजाबमधून जाताना विशिष्ट झाडांची शेती केल्याचे दिसले. काही ठिकाणी मध्यम वाढीची ही झाडे पाहून ती पेरुची असावीत असे सुरुवातीला वाटले; पण ती सरळ उंच वाढलेली झाडे पाहून पेरुची बाग नसून, सागाची असावी, असे वाटले. त्याविषयी इतर सहप्रवाशांना खास करून सरदारजींना विचारले असता, ती सफेदाची शेती असल्याचे म्हणाले. आपल्याकडे जशी सागवान शेती करतात, तशीच ही सफेदाची फायदेशीर शेती असल्याची माहिती मिळाली. शिवाय तेथील रोप वाटिकेमधून सर्वत्र रोपे पाठवली जात असल्याचे त्यांनी सांगितले. फर्निचरसाठी याचा मोठा वापर होतो. एकूण या पर्यटनातील हे 'सांगाती' ज्ञानात नवी भर घालून तर गेलेच, अन् आठवणींच्या पटलावर स्मृती कायम कोरून राहिल्या त्या वेगळ्या!

## कोतवाल

कोट म्हणजे किल्ला, दुर्ग आणि त्याचा रक्षणकर्ता म्हणजेच 'कोटपाल' त्यापासून 'कोतवाल' हा सध्याचा प्रचलित असा शब्द रुढ झाला. नगररक्षकांचा मुख्याधिकारी, शहरचा मुख्य संरक्षक अधिकारी, फौजदार असा या 'कोतवाल' शब्दाचा अर्थ आहे. आकाराने बुलबुलपेक्षा मोठा, काळ्या रंगाचा, सडपातळ बांध्याचा, खोलवर दुभंगलेली शेपटी असलेल्या एका पक्ष्याला कोतवाल हे नाव पडले आहे. त्याच्या कृत्यावरून हे नामकरण झालेले दिसते.



हा पक्षी आपले कान व डोळे सतत सतर्क ठेवून असतो. इतर मोठ्या शिकारी पक्ष्यांची चाहूल लागताच बाकीच्या पक्ष्यांना त्याची आगाऊ सूचना देतो. विशिष्ट आवाज काढून केवळ सूचना न देता, तो प्रसंगी चोचीने त्यांच्यावर वार करून त्यांना हुसकावून लावतो. हा उत्तम नकलाकार समजला जातो. अन्य पक्ष्यांचे आवाज काढण्यात तरबेज असतो. काही पक्षी वा प्राणी आपले भक्ष्य खाताना तसेच तोंडात पकडून येताना दिसल्यास तो त्यांना खोटी चेतावणी देण्यासाठी ओरडतो. त्यावरही संबंधित पक्षी वा प्राणी आपले भक्ष्य टाकून न गेल्यास पुन्हा त्यांच्या आवाजाची नक्कल करून खोटा इशारा देऊन पळायला लावतो. संबंधित सोडलेल्या त्या भक्ष्याला आपलेसे करतो.

असा हा कोतवाल आपल्या अवतीभोवती आढळतो. याच्या विविध जाती आहेत. राखाडी, काळा कोतवाल सर्रास आढळतो. काहीवेळेला rockettaildrongo अर्थात रॉकेटसारखी शेपूट असणारा कोतवालही आढळतो. हा कीटकभक्ष्यी आहे. गुरांच्या अंगावरील गोचिड खातो. काहीवेळेला 'रक्षका'चे काम सोडून 'भक्षक' होतो. छोट्या पक्ष्यांवर ताव मारतो. माळरानावर, मोकळ्या जागी राहतो.

## नारिंगी डोक्याचा भू-कस्तूर

हे पक्षी जगभर आढळतात. हा साळुंकीएवढा गुबगुबीत पक्षी भारतीय उपखंडातील जंगल आणि बागांमध्ये आढळणारा एक सामान्य पक्षी आहे. हे सहसा थव्यांतून आढळत नाहीत.



मोठ्या पक्ष्यांच्या आणि पिल्लांच्या पिसाऱ्यावर सामान्यत: ठिपके असतात. पंख साधारणपणे लांब व टोकदार चोच, मजबूत रंग, तपकिरी, करडा, निळा, हिरवट किंवा तांबूस हे बहुवंशी भूचर आहेत; पण काही वृक्षवासी असतात. फळे, किडे, कृमी आणि गोगलगाई हे यांचे अन्न होय.

घरटे बांधणे व अंडी उबविणे ही कामे मादी करते. नर व मादी दोघेही पिल्लांना भरवितात. घरटे वाटीसारखे किंवा सपाट असून चिखलात मुळ्या, शेवाळ, गवत वगैरे मिसळून त्यांचे बनविलेले असते. मादी ३-५ अंडी घालते. मे ते आगस्ट या विणीच्या हंगामात नर मंजूळ स्वरात गातो.

## कोकीळ

तसं म्हटलं तर 'तोच' गातो, पण 'तिचं' नाव होतं असतं, कारण विणीच्या हंगामात त्यालाच कंठ फुटलेला असतो. असा हा कोकीळ कावळ्यापेक्षा लहान असतो. नराचा रंग काळा-कुळकुळीत असतो. मादी नरापेक्षा आकाराने मोठी राखट करडी रंगाची त्यावर पांढरे ठिपके असतात. दोघांचेही डोळे गुंजेसारखे लाल असतात. चोच पिवळट असते. हा अत्यंत लाजाळू पक्षी आहे. तो जमिनीवर नसतो. नेहमी झाडावर इकडून तिकडे रसाळ फळांच्या झाडावर असतो.

हा आपल्या मधूर गायनाने आपणास परिचित आहे. फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान याच्या गायनाने याचे अस्तित्व सर्वत्र जाणवते. हिवाळ्यात नराला कंठ नसल्याने तो गायब झाल्याचे वाटते. केसाळ सुरवंट आवडते खाद्य. शिवाय रसदार फळेही! ती आपली अंडी इतर पक्ष्यांच्या घरट्यात घालते. शिवाय अंड्यातून बाहेर पडणारी तिची पिल्लेही घरट्यातील इतर अंडी वा इतर पक्ष्यांच्या पिल्लांना घरट्यातून बाहेर ढकलून देतात. अगदी डोळे न उघडलेली कोकिळेची पिले हे काम चोखपणे बजावतात व आपले उदरभरण करून दुसऱ्या पक्ष्याच्या पालन-पोषणावर स्वतः मोठी होतात. याबाबतचे संशोधन यु-ट्यूबवर उपलब्ध आहे. कावळ्याशी भांडण काढूनही त्याला त्याच्या घरट्यातून दूरवर नेतो. त्यानंतर त्याच्या घरट्यात मादी आपली अंडी घालते, हे कसब या दोघांचेही असते.



## स्वर्गीयनर्तक

याची मादी आणि युवा नर तांबूस, डोके काळ्या रंगाचे असते. डोक्यावर तुरा असतो. नराला फूटभर लांबीची शेपूट असते. तीन वर्षानंतर या प्रौढ नराला पांढरा रंग येतो. डोके काळे त्यावर तुरा आणि चमकदार पांढऱ्या रंगाच्या नराची शेपूट लांबलचक असते. यालाच दूधराज म्हणूनही ओळखतात. तर, काही जातीतील प्रौढ नर हे तांबूस विटकरीच असतात. मादी बुलबुलसारखी असते. सवयीदेखील त्याच्यासारख्या असतात. रंग विटकरी तांबूस असून डोक्यावर काळा तुरा असतो. मादीचे पोट, गळा राखाडी असतो.



कीटक, फूलपाखरे हे याचे अन्न आहे. यांचा विणीचा

हंगाम मार्च ते जुलै काळात असतो. या काळात मादीला शीळ घालून नर आकर्षित करतात. लांबलचक शेपूट हेदेखील आकर्षण बनते. कोळ्याच्या जाळ्याचे धागे आणि काटक्या वापरून घरटे बनवतात. नर घरट्याचे राखण करतो. अंडी उबवण्याचे आणि पिलांचे संगोपन नर-मादी दोघेही मिळून करतात. महाराष्ट्राचा जसा हरियाल हा राज्यपक्षी आहे, तसा मध्य प्रदेश राज्याचा हा राज्यपक्षी आहे. हिंदीत याची सुलताना बुलबुल अशी ओळख आहे.

## सोनपाठी सुतार

मराठीत याला सोनपाठी सुतार पक्षी असे म्हणतात. हिंदीत याला सुनहरा कठफोडा, तर संस्कृतमध्ये काष्ठकूट असे म्हणतात. इंग्रजीत Golden-backed Woodpecker सोनपाठी सुतार पक्ष्याच्या पाठीच्या सोनेरी रंगावरून याचे नाव पडले आहे. याचा रंग आणि आकारावरून किमान चार उपजाती आहेत. नर सोनपाठी सुताराच्या पाठीचा रंग सोनेरी पिवळा, माथा व तुरा लाल, डोळ्याजवळ काळे-पांढरे पट्टे, फिकट पांढऱ्या रंगाचे पोट व गळ्यापासून पोटाच्या मध्य भागापर्यंत काळे-पांढरे ठिपके असतात. त्याची शेपटी काळ्या रंगाची असते. मादी नरासारखीच असते.



हा विरळ आणि झुडपी जंगलात तसेच शेतीजवळच्या प्रदेशात राहतो. झाडाच्या सालीत लपलेले कीटक पकडण्यासाठी हा वेगाने झाडाच्या खोडात छिद्र पाडतो. कीटकांशिवाय मध आणि पिकलेली फळेही याला आवडतात. उडताना बहुतेक वेळा हा कर्कश आवाजात ओरडतो आणि यावरून त्याला जंगलात सहजपणे शोधता येते. मार्च ते ऑगस्ट हा याचा विणीचा हंगाम असून याचे घरटे जमिनीपासून २ ते १० मी. उंच झाडाच्या ढोलीत असते. मादी एकावेळी २ ते ३ चमकदार पांढऱ्या रंगाची अंडी देते. नर आणि मादी मिळून पिल्लांची देखभाल करतात. झाडांच्या खोडातील कीटक, अळ्या, किडे खाऊन हा झाडांना निरोगी ठेवण्याचे महत्त्वाचे काम करतो. एका अर्थी पर्यावरण समतोल राखण्याचे काम करतो.

## सोनकपाळी पर्णपक्षी

हिरवा बुलबुल, नीळपोपट अशा नावाने हा ओळखला जातो. नराचा मुख्य रंग गवतासारखा हिरवा असून माथा सोनेरी रंगाचा, हनुवटी आणि गळ्याचा भाग जांभळ्या आणि काळ्या अशा दोन उठावदार रंगाचे असतात. मादी नरासारखीच असते फक्त रंग फिकट असतात.

## हरेवा

घनदाट जंगलात तसेच शेतीजवळच्या दाट झाडांमध्ये राहणे पसंत करतो. पानांच्या रंगासोबत हरेवाचा हिरवा रंग मिसळून जातो व तो झाडांच्या पानात दिसेनासा होतो. त्यामुळे हा अनेकदा दिसण्यापेक्षा ऐकू जास्त येतो. तो एक उत्तम नकलाकार आहे, बुलबुल, कोतवाल, दयाळ या स्थानिक पक्ष्यांसह स्थलांतर करून येणाऱ्या पक्ष्यांचेही हुबेहूब



आवाज काढतो. फुलातील मध, फळे, कीटक आणि कोळी हे याचे खाद्य आहे. मे ते ऑगस्ट हा विणीचा हंगाम असून त्याचे घरटे उथळ, गवत, काटक्या, झाडाची कोवळी मुळे वापरून बनविलेले असते. उंच झाडावर, व्यवस्थित लपविलेले असते. मादी एकावेळी सहसा २ अंडी देते.

## दयाळ

झाडीत बसून सुरेख आवाज काढतो. शीळ घातल्याप्रमाणे आपल्याला वाटते. हा छोटे कीटक भक्ष्य करतो. निसर्गातील तसे जवळपास सर्वच पक्षी छोटे-मोठे कीटक खात असतात. याचा फायदा झाडांवर विशेषतः शेती पिकांवर पडलेला रोग कमी करण्यासाठी होतो; परंतु आज रोग घालवण्यासाठी फवारण्यात येणाऱ्या औषधांमुळे हे पक्षी देखील कमी होत आहेत.

## भांगपाडी मैना

आकाराने साळुंखीपेक्षा थोडा लहान असणारा हा पक्षी आहे. डोक्यावरील पिसाऱ्यांमुळे हा पक्षी पटकन ओळखता येतो. चापून-चोपून भांग पाडावा, अशी डोक्यावरील काळी पिसे असतात. मानवी वस्तीजवळ सर्वत्र आढळतो. रंगाने फिकट तपकिरी-भुरकट, डोक्यावर काळसर, शेपटी काळसर, तर चोच निमुळती पिवळी डोळ्याजवळ सुरुवातीला सफेद जांभळी असते. नर-मादी एकसारखे दिसतात. ही जोडी आयुष्यभर टिकते. कुटुंबवत्सल पक्षी असून घरटे बांधणे, पिल्लांचे संगोपन दोघे मिळून करतात. हे पक्षी गटाने तसेच जोडीने वावरताना दिसतात. मंजूळ तसेच कर्कश आवाज काढतो. हा मिश्रहारी असून काटेसावर, पळस, पांगिराच्या फुलातील मकरंद खातो. तसेच कीटकाचाही अन्नात समावेश असतो.



## धीवर पक्षी

अतिशय रंगीबेरंगी असणारा हा धीवर पक्षी माझ्या चौथीच्या बालभारती कवितेतून सर्वप्रथम माझ्याशी जवळ आला. जयसिंगपूर नगरपरिषदेच्या मराठी शाळेत सुंदर चाल लावून शिकवलेली, तळ्याकाठी गाथी लाटा..लाटांमध्ये उभे झाड..झाडावर धिवराची हाले चोच लाल जाड.. ही कविता आजही त्याला पाहताच मनात उमटते.

खंड्या हा ओरोसमध्ये विविध आकारात, विविध रंगात अवती-भोवती मोठ्या संख्येने पाहायला मिळाला. याच्या आवाजावरून याला हिंदीत किलकिल्या म्हणतात, इंग्रजीत White throated kingfisher म्हणतात. म्हणजेच पांढऱ्या छातीचा धीवर होय. कवितेत वर्णन केल्याप्रमाणे शुभ्र छाती, पिंगट पोट, निळे पंख अशा या सुंदर पक्ष्याची शेपूट अखूड असते. बाह्यरूपावरून नर व मादी दोघेही दिसायला एकसारखे असतात.



पाण्यात निळे पंख मिटून चपळाईने सूर मारून तो आपल्या लालसर, जाड, टोकदार, आणि लांब चोचीत मासे पकडतो. त्याशिवाय बेडकांची पिल्ले, इतर कीटक, तुडतुडे हे त्याचे खाद्य आहे. मार्च ते जून हा त्याच्या विणीचा हंगाम असतो. पाणथळ, सरोवर, नदीकाठी तो आपले घरटे करतो. नर व मादी दोघे मिळून अंडी उबवण्याचे आणि पिलांना भरवण्याचे काम करतात.

जपानमध्ये १५० ते २०० मैल प्रतितास धावणारी बुलेट ट्रेन बनवली गेली; परंतु टनेलमधून बाहेर पडताना तिच्या होणाऱ्या प्रचंड आवाजाच्या लहरी स्थानिक निवासी आणि इमारतींसाठी समस्या बनल्या होत्या. तांत्रिक अभियंत्यांसाठी हे मोठे आव्हान होते. त्यासाठी बुलेट ट्रेनच्या डिझाईनमध्ये बदल करणे आवश्यक होते. मानवनिर्मित समस्येवर निसर्गातच उपाय होता. तो शोधण्यासाठी १९९७ साली संचालक इजी नाकात्सू यांनी पक्षी निरीक्षणावर भर दिला. धीवर पक्षी लांब, जाड व टोकदार चोचीने २५ मैल प्रतितास पाण्यात सूर मारून मासे पकडतोय, या निरीक्षणातून त्यांनी बुलेट ट्रेनचे नवे डिझाईन त्याच्या चोचीसारखे बनवले आणि आवाजाची समस्या चुटकीसरशी निकालात निघाली. असा हा आपल्या अवती-भोवती वावरणारा वैशिष्ट्यपूर्ण असणारा खंड्या पक्षी आहे.

## शिक्रा

तीक्ष्ण नजरा, टोकदार आणि बाकदार चोच असल्याने 'शिकारी पक्षी' अशी याची खास ओळख आहे. लहान पक्षी, पाली, कोंबडीची पिल्ले, इतर पक्ष्यांची अंडी हे याचे खाद्य आहे. गडद तपकिरी, फिकट करडा आणि पोटाकडील भागावर पिवळसर मधूनच काळसर पट्टे असतात. मार्च ते जून हा त्याचा विणीचा हंगाम असतो. याच दरम्यान



तो घरटे बांधतो. मादी ही नरापेक्षा मोठी असते. हवेत सूर मारून विविध प्रकारचे खेळ करत एकमेकांचा पाठलाग करत प्रणयक्रीडा करतात. यावेळी टीटवीसारखा विशिष्ट आवाजदेखील काढतात. या शिकारी पक्ष्याची चाहूल लागताच, इतर छोटे पक्षी इतरांना सावध करणारे आवाज करतात.

## सुगरण

ती सुगरण bayaweaver असली तरी घरटं तो बांधतो! खोप्यामध्ये खोपा सुगरणीचा चांगला.. पाहा पिलासाठी तिने झोका झाडाले टांगला.. बहिणाबाईंच्या या कवितेची अनुभूती जागोजागी पाहायला मिळते.

सुगरण पक्ष्यातील राखाडी रंगाचा नर हा विणीच्या हंगामात पिवळसर दिसू लागतो. मुळात सुगरण हा स्त्रीलिंगी शब्द असल्याने आपल्या पिल्लांसाठी 'ती' घरटं बांधत असेल, असा समज आहे; परंतु नर हा सुंदर घरटं विणायला सुरुवात करतो. अर्धवट विणलेलं घरटं घेऊन तो 'तिला' रिझवतो, आकर्षित करतो. मग 'ती' आकर्षित होऊन त्या घरट्याकडे येते. त्याने बांधलेलं घरटं कसं आहे? सुरक्षित आहे का? याची अक्षरशः पाहणी करते. जर तिला ते घरटं आवडलं, तरच ती मीलनाला तयार होते, अन्यथा नाही. अशी बरीच अर्धवट घरटी आपणाला दिसतात. ते म्हणजे घर बसण्यापूर्वीचे उजाडलेपण होय!



मीलन झाल्यानंतर नर आणि मादी हे विणलेल्या घरट्यात आपल्या पिल्लांना भरवण्याचे काम दोघे मिळून करतात. याच दरम्यान तो नर पुन्हा नवे घरटं बांधून दुसऱ्या मादीला आकर्षित करतो आणि हा सिलसिला पुढे असाच सुरू राहून एकाच जागी पाच-सहा घरट्यांची चांगली वसाहत निर्माण होते. पुन्हा हे सोडून दिलेले घरटे काहीवेळेला अन्य पक्षी वापरत असतात. त्यामुळे अशी घरटी आपल्या घरच्या शोभेसाठी मानवाने आणू नये. शिवाय हे 'त्या' नराचे कौशल्य असते. याचे भानही ठेवायला हवे.

याबरोबरच वेडा राघू, टकाचोर, टिटवी, खाटीक, उघड्या चोचीचा करकोचा, समुद्रकाठी सँडपाईपर, सुबक, शिंजीर, तांबट, तपकिरी डोक्याचा तांबट, निळपंखी, मुनीया, राखी वटवट्या, हळद्या, सातभाई, तुरेवारा सर्प गरुड, गपगीदास, शामा, होला, हरियाल, कापसी घार, ब्राह्मणी घार, गोमेटा असे असंख्य पक्षी आपल्या अवतीभोवती सोबतीला असतात. ते ओळखण्यासाठी आपणही त्यांचे सोबती बनायला हवे.

**(जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी, महाराष्ट्र शासन.)**

# कराओके म्हणजे काय?

कराओके हे मनोरंजनाचे एक मजेदार आणि लोकप्रिय साधन आहे. यामध्ये एखाद्या गाण्याचे मूळ संगीत (म्युझिक ट्रॅक) वाजवले जाते, मात्र त्या गाण्याचा मूळ गायकाचा आवाज त्यात नसतो. म्हणजेच फक्त संगीताची धून, वाद्यांची साथ आणि ताल उपलब्ध असतो. त्या संगीतावर आपण स्वतः गाण्याचे बोल पाहून गाणे गाऊ शकतो.

'कराओके' हा शब्द जपानी भाषेतून आला आहे. 'कारा' म्हणजे रिकामे आणि 'ओके' म्हणजे ऑर्केस्ट्रा. त्यामुळे कराओकेचा अर्थ 'रिकामा ऑर्केस्ट्रा' असा होतो. म्हणजेच गायकाशिवाय फक्त संगीताची साथ असलेले गाणे.




कराओकेमध्ये गाणे गाण्याची पद्धत अतिशय सोपी असते. समोर टीव्ही स्क्रिन, मोबाइल, संगणक किंवा प्रोजेक्टरवर गाण्याचे शब्द (Lyrics) दिसत असतात. हे शब्द गाण्याच्या तालानुसार एकामागून एक स्क्रिनवर येतात. गाणाऱ्या व्यक्तीने मायक्रोफोन हातात घेऊन त्या संगीताच्या साथीने आणि स्क्रिनवर दिसणाऱ्या शब्दांनुसार गाणे म्हणायचे असते.

यामध्ये गाण्यासाठी व्यावसायिक गायक असण्याची गरज नसते. आपल्याला आवडणारे गाणे निवडून प्रत्येकजण आपल्या आवाजात ते सादर करू शकतो. त्यामुळे कराओके हा केवळ गायनाचा प्रकार नसून आत्मविश्वास वाढवणारा आणि आनंद देणारा अनुभव आहे.

आजकाल कराओकेचा वापर घरगुती कार्यक्रम, वाढदिवसाच्या पार्ट्या, मित्र–मैत्रिणींचे मेळावे, हॉटेल्स, क्लब; तसेच विविध मनोरंजनाच्या कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. अनेक जण आपल्या आवडत्या जुन्या–नव्या गाण्यांवर कराओकेच्या माध्यमातून गायनाचा आनंद घेतात.

मराठी गाण्यांचेही अनेक कराओके ट्रॅक आता उपलब्ध आहेत. भावगीते, चित्रपट गीते, भक्तिगीते, लोकगीते अशा विविध प्रकारच्या मराठी गाण्यांवर लोक कराओके गातात. यु–ट्यूब, विविध मोबाइल ॲप्स आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून घरबसल्या मराठी; तसेच हिंदी, इंग्रजी आणि इतर भाषांमधील गाणी कराओके स्वरूपात गाता येतात.

थोडक्यात सांगायचे तर, कराओके म्हणजे स्वतःच्या आवाजात आवडते गाणे सादर करण्याची एक आनंददायी संधी. यात संगीताची साथ असते, शब्दांची मदत असते आणि गायक आपण स्वतः असतो. त्यामुळे कराओके हे संगीतप्रेमींसाठी आनंद, उत्साह आणि सर्जनशीलतेचे एक सुंदर माध्यम बनले आहे.

**टीम आपलं मंत्रालय**

# महाराष्ट्राच्या पशुवैभवाचा राष्ट्रीयस्तरावर दुहेरी सन्मान

नंदकुमार वाघमारे

महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेल्या उमरडा या गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून, तर 'माडग्याळ' प्रजातीच्या मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र व अधिकृत प्रजाती (ब्रीड) म्हणून मान्यता मिळाली आहे. यामुळे राज्यातील उमरडा या स्थानिक गोवंशाचे व माडग्याळ या मेंढी प्रजातीचे संवर्धन, जतन व आनुवंशिक सुधारणा कार्यक्रमांना मोठी चालना मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्युरो, करनाल (हरियाणा) या संस्थेला पाठवलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ही नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. 'भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या' (आयसीएआर) राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्युरो, करनाल (हरियाणा) चे संचालक डॉ. एन. एच. मोहन यांनी याबाबतचे अधिकृत पत्र जारी केले आहे. ७ ऑगस्ट २०२६ रोजी पार पडलेल्या 'आयसीएआर ब्रीड रजिस्ट्रेशन कमिटी'च्या १४व्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

महाराष्ट्राच्या मातीत विकसित झालेल्या उमरडा गाईला आणि माडग्याळ मेंढीला मिळालेली राष्ट्रीय मान्यता ही राज्यासाठी अभिमानाची बाब आहे. या मान्यतेमुळे पारंपरिक पशुधनाच्या संवर्धनाला शास्त्रीय बळ मिळून पशुपालकांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. स्थानिक पशुधनाचे जतन, उत्पादकता आणि आनुवंशिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शासन आवश्यक उपाययोजना करेल, असा विश्वास पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

## उमरडा गोवंशाविषयी...

अमरावती जिल्ह्याचे ब्रिटिशकालीन गॅझेटमधील (१९१०) नोंदीवरून उमरडा गोवंश गेल्या शतकापासून आपले अस्तित्व राखून असल्याचे सिद्ध होत आहे. बंजारा समाजाव्यतिरिक्त स्थानिक पशुपालकांकडूनदेखील उमरडा गोवंशाचा सांभाळ केला जात आहे. पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्हा व लगतच्या अमरावती आणि वाशीम जिल्ह्यात अंगकाठीने उंचपुरी, पांढऱ्याशुभ्र रंगाच्या गोधनाचा सांभाळ बंजारा समाजाकडून पारंपरिक पद्धतीने होत असून त्यांना उमरडा गोवंश म्हणून ओळखले जाते.

वाशीम जिल्ह्यातील 'उंबर्डा बाजार' या पशुधन बाजारपेठेवरून 'उमरडा' हे नाव स्थानिक गोवंशाला प्राप्त झालेले असून यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस तालुक्यावरून या गोवंशाला 'दिग्रस' किंवा बंजारा समाजावरून 'बंजारा गोवंश' म्हणूनदेखील संबोधले जाते. यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस, दारव्हा, आर्णी तालुके, वाशीम जिल्ह्यातील मानोरा, मंगरुळपीर, कारंजा (लाड) हे तालुके आणि अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर या तालुक्यात मोठ्या संख्येने उमरडा गोवंश आढळून येतो.



## माडग्याळ मेंढी प्रजातीविषयी...

मुख्यतः धनगर आणि रामोशी समाजातील मेंढपाळ/शेतकरी या मेंढ्या पाळतात. मेंढ्यांचे कळप स्थलांतरित आहेत. विषम हवामानात परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता, उत्तम रोगप्रतिकारशक्ती, जलद वजन वाढवण्याची क्षमता, कोकरू जगण्याची अधिक क्षमता, मातृत्वाची चांगली प्रवृत्ती आणि चांगला कळप आणि मटण उत्पादनासाठी फायदेशीर अशा गुणवैशिष्ट्यांमुळे माडग्याळ मेंढ्या दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहेत.



मेंढपाळांच्या मते माडग्याळ मेंढीची उत्पत्ती सुमारे १०० वर्षांपूर्वी सांगली जिल्ह्यातील माडग्याळ आणि सनमाडी गावात स्थानिक मेंढीपालकांनी निवड पैदास पद्धतीने केली आहे. माडग्याळ मेंढ्या झपाट्याने वजन वाढवण्याची क्षमता दर्शवतात. माडग्याळ ही महाराष्ट्रातील मोठ्या आकाराची आणि मटणासाठी विशेष लोकप्रिय मेंढी आहे. प्रामुख्याने पांढऱ्या रंगावर तपकिरी ठिपके आढळतात, तर काही मेंढ्या तपकिरीदेखील दिसतात.

(विभागीय संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन.)

# मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य

## मतदार याद्यांचे
## विशेष सखोल पुनरीक्षण 2026

# प्रारूप मतदार यादीत आजच आपले नाव तपासा




electoralsearch.eci.gov.in वर
1. मतदार ओळखपत्र क्रमांक
2. वैयक्तिक माहिती अथवा
3. मोबाईल क्रमांक वापरून शोधा

voters.eci.gov.in वर
PDF स्वरूपातील प्रारूप मतदार यादी उपलब्ध

नमुना क्र. 6

प्रारूप मतदार यादीमध्ये आपले नाव नसल्यास किंवा आपण नवमतदार असल्यास **नमुना क्र. 6 (घोषणापत्रासह)** भरा.

**ONLINE** — http://voters.eci.gov.in या संकेतस्थळावर किंवा **ECINET** मोबाईल ॲपवर

**OFFLINE** — **मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात** कार्यालयीन वेळेत किंवा **BLO** कडे

## अर्ज स्विकारण्याकरीता मतदान केंद्रावर विशेष मोहिम

| शनिवार | रविवार | शनिवार | रविवार |
| --- | --- | --- | --- |
| दि. 19 सप्टेंबर | दि. 20 सप्टेंबर | दि. 26 सप्टेंबर | दि. 27 सप्टेंबर |

मतदार मदत क्र. 1800 22 1950

Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO Maharashtra | CEO_Maharashtra

# लिहिते व्हा... आपलं मंत्रालय



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित ‘आपलं मंत्रालय’ हे गृहपत्रिका करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, विशेष छायाचित्रे, व्यंगचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती या संदर्भातील साहित्य (युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात) खालील दिलेल्या ई-मेलवर पाठवावेत.


















## आपलं मंत्रालय

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, १७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई. ई-मेल : aaplemantralay@gmail.com